नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १६४ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




मंगळवार, दि. १९ मे २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# 'नीट' पेपरफुटी प्रकरणात
# प्रा. शिवराज मोटेगावकर अटकेत

## विशेष सीबीआय न्यायालयाकडून ९ दिवस कोठडी



पुणे : (स. गांवकरी)

देशभरात गाजत असलेल्या 'नीट' पेपरफुटी प्रकरणात लातूरमधील 'आरसीसी क्लासेस' या शिकवणी वर्गाचे संचालक प्रा. शिवराज मोटेगावकर याला केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाकडून (सीबीआय) सोमवारी अटक करण्यात आली. या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या प्रा. मोटेगावकर याला नऊ दिवस 'सीबीआय' कोठडीत ठेवण्याचे आदेश विशेष न्यायालयाने दिले.

'पेपरफुटी प्रकरणात प्रा. मोटेगावकर याची रविवारी दिवसभर चौकशी करण्यात आली. पेपरफुटी प्रकरणात यापूर्वी अटक करण्यात आलेला मुख्य सूत्रधार आरोपी पी. व्ही. कुलकर्णी हा परीक्षाप्रक्रियेशी संबंधित होता. प्रा. मोटेगावकर याचे लातूरमधील कार्यालय, तसेच निवासस्थानी सीबीआयच्या पथकाने छापे टाकले. तेव्हा रसायनशास्त्र विषयाशी संबंधित प्रश्नसंच सापडले. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्न ३ मे रोजी पार पडलेल्या 'नीट'च्या प्रश्नपत्रिकेत होते. पेपरफुटी प्रकरणात प्रा. मोटेगावकर सामील असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर अटक करण्यात आली', अशी माहिती 'सीबीआय'कडून देण्यात आली.

प्रा. मोटेगावकर याची रविवारी पुण्यातील 'सीबीआय' कार्यालयात चौकशी करण्यात आली. 'नीट' पेपरफुटी प्रकरणाच्या अनुषंगाने 'सीबीआय'च्या पथकाने लातूरमध्ये 'आरसीसी क्लासेस'चे कार्यालय आणि मोटेगावकर यांच्या निवासस्थानी छापे टाकले. तेथे शोधमोहीम राबविली. प्रा. मोटेगावकर याचे कार्यालय, निवासस्थानातून कागदपत्रे, लॅपटॉप, मोबाइल संच जप्त करण्यात आले, असे 'सीबीआय'च्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

प्रा. मोटेगावकर याला अटक करण्यात आल्यानंतर पुण्यातील विशेष न्यायालयात हजर करण्यात आले. प्रा. मोटेगावकर याचे कार्यालय आणि निवासस्थानातून कागदपत्रे, लॅपटॉप, मोबाइल संच जप्त करण्यात आले आहे आहेत. इलेक्ट्रॉनिक उपकरणाची तांत्रिक तपासणी करायची आहे. या प्रकरणाचा सखोल तपास करायचा आहे. तपासासाठी मोटेगावकर याला 'सीबीआय' कोठडी देण्यात यावी, अशी विनंती 'सीबीआय'च्या अधिकाऱ्यांनी न्यायालयात केली. या प्रकरणात अटक करण्यत आलेल्या मोटेगावकर याची प्रवासी कोठडी (ट्रान्झिट रिमांड) मिळवण्यात आली असून, पुढील तपासासाठी मोटेगावकर याला तपासासाठी दिल्लीतील सीबीआय कार्यालयात नेण्यात येणार आहे.

## आतापर्यंत दहा आरोपी अटकेत

'सीबीआय'ने देशातील वेगवेगळ्या भागांत छापे टाकले. कागदपत्रे, मोबाइल संच, तसेच अन्य इलेक्ट्रॉनिक उपकरणे जप्त करण्यात आली होती. जयपूर, गुरुग्राम, नाशिक, पुणे, अहिल्यानगर, लातूर परिसरातून आतापर्यंत दहा आरोपींना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणात दहा आरोपी अटक करण्यात आली असून, त्यांची चौकशी सुरू असल्याची माहिती 'सीबीआय'ने दिली आहे.

सांगली -सातारा स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीत

# महायुती विरुद्ध महाविकास आघाडीत लढतीची चिन्हे




सांगली : (स. गांवकरी)

सांगली-सातारा स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषदेची निवडणूक आज जाहीर झाल्यानंतर राजकीय हालचाली गतीमान झाल्या असून ही निवडणूक महायुती विरूध्द महाविकास आघाडी अशीच रंगण्याची चिन्हे आहेत. ५ डिसेंबर २०२२ मध्ये या मतदार संघातून मोहनराव कदम यांनी काँग्रेसच्या उमेदवारीवर प्रतिनिधीत्व केले होते. सांगली-सातारा स्थानिक स्वराज्य संस्था गटातून विधान परिषदेवर निवडून द्यायच्या एका जागेसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. या निवडणुकीची अधिसूचना दि. २५ मे रोजी प्रसिध्द होणार असून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत १ जून आहे. तर उमेदवारी अर्जाची छाननी दि.२ जून रोजी होणार आहे. उमेदवारी माघारीची मुदत ४ जून आहे. मतदान दि. १८ जून व मतमोजणी दि. २२ जून रोजी आहे. सांगली – सातारा जिल्ह्यातील जिल्हा परिषदेचे सदस्य, महापालिका, नगरपालिका सदस्य आणि पंचायत समिती व नगरपंचायतीचे सभापती हे या निवडणुकीतील मतदार असून जिल्हा परिषद, नगरपालिका व महापालिका निवडणुकाच झालेल्या नव्हत्या. यामुळे विधान परिषदेतील जागा रिक्त होती. निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर राज्यातील १६ जागांसाठी निवडणूक आज जाहीर करण्यात आली असून या ठिकाणी आजपासून आचारसंहिता लागू झाली आहे. गेल्या निवडणुकीवेळी काँग्रेसचे मोहनराव कदम व राष्ट्रवादी काँग्रेसचे शेखर मोरे यांच्यात लढत झाली होती.

## थोडक्यात...

### भोंदूबाबाला १० वर्षे सक्तमजुरी

अहिल्यानगर (स. गांवकरी) : काळीजादू करून पैशांचा पाऊस पाडतो असे आमिष दाखवून ५.५ लाख रुपयांची फसवणूक केली तसेच अल्पवयीन पिडीतेवर अत्याचार केल्याच्या आरोपावरून जिल्हा सत्र न्यायालयाने महादेवनाथ बाबा उर्फ ज्ञानदेव तुकाराम कांबळे (वय ४२, शिर्सुफळ, आटोळेवस्ती, बारामती, पुणे) यास विविध कलमान्वये दोषी धरून १० वर्षे सक्तमजुरी, ४३ हजार रुपये दंड व दंड न भरल्यास कैद अशी शिक्षा ठोठावली. सध्या अहिल्यानगर जिल्ह्यात भोंदूबाबांचे पेव फुटले आहे. गुन्हेही दाखल झाले आहेत. या पार्श्वभूमीवर हा निकाल महत्त्वाचा मानला जातो. जिल्हा सत्र न्यायाधीश श्रीमती एम. एस. भदाणे यांनी या खटल्याचा निकाल दिला. सरकारतर्फे अतिरिक्त सरकार अभियोक्ता अनिल ढगे यांनी युक्तिवाद केला. या गुन्ह्याचा तपास पारनेर पोलीस ठाण्यातील तत्कालीन उपनिरीक्षक एच. एन. उगले यांनी केला व दोषारोपपत्र दाखल केले होते. खटल्याच्या सुनावणीत पोलीस उपनिरीक्षक संजय चव्हाण, पैरवी अधिकारी आर. डी. अडसूळ यांनी मदत केली.

### नीट पेपरफुटीतील मनीषा मांढरे निलंबित

पुणे (स. गांवकरी) : नीट पेपरफुटी प्रकरणात सीबीआयने अटक केलेल्या मनीषा मांढरे यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाने मांढरे यांच्यावर निलंबनाची कारवाई केली आहे. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. निवेदिता एकबोटे, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्यवाह प्रा. शामकांत देशमुख, सहकार्यवाह प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांनी या बाबतची माहिती प्रसिद्धिपत्रकाद्वारे दिली. मनीषा मांढरे या पुण्यातील शिवाजीनगर येथील मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागात शिक्षिका म्हणून सन २००२ पासून महाविद्यालयात कार्यरत आहेत. गेली २४ वर्षे अकरावी, बारावीच्या विद्यार्थ्यांना जीवशास्त्र विषयाचे अध्यापन करत आहेत. त्यांचा अध्यापनातील अनुभव लक्षात घेऊन नॅशनल टेस्टिंग एजन्सीने (एनटीए) NEET परीक्षेसंदर्भातील काही गोपनीय कामकाजासाठी त्यांची नियुक्ती केली होती. या नियुक्तीबाबत संस्था आणि मॉडर्न महाविद्यालयाचा दूरान्वये संबंध नाही. त्यांचे कार्य पूर्णतः गोपनीय स्वरूपाचे असून, संबंधित व्यक्ती आणि एनटीए यांच्यातील पत्रव्यवहार, सूचना थेट मनीषा मांढरे यांना देण्यात येत होत्या. त्यामुळे या प्रक्रियेशी महाविद्यालय प्रशासन अथवा संस्थेचा दूरान्वये संबंध नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

### भाविकांवर काळाचा घाला; जागीच मृत्यू

सोलापूर (स. गांवकरी) : जिल्ह्यातील कोंडी इथं धक्कादायक घटना घडली. स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी पुण्याहून अक्कलकोटला निघालेल्या कुटुंबावर काळानं घाला घातला आहे. कोंडी अथं झालेल्या भीषण अपघातात दीड वर्षाच्या चिमुकल्यासह दोन महिलांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर दोघेजण गंभीर जखमी झाले आहेत. धावत्या ट्रकला भरधाव कारने पाठीमागून जोरदार धडक दिल्याने हा भीषण अपघात झाला आहे. या भीषण अपघातानंतर परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेनंत पोलीस घटनास्थळी दाखल झाले होते. पुण्याच्या देहूरोड येथील रवी खंडागळे यांचे कुटुंब अक्कलकोटला दर्शनासाठी जात होते. या अपघातात सिंधू रवी खंडागळे (वय 42), त्यांची बहीण नंदा भाऊराव हाताळकर (वय 45) आणि दीड वर्षाचा रुद्राक्ष मोरे यांचा जागीच मृत्यू झाला आहे.

# विमान निर्मितीच्या जागतिक नकाशावर पुणे! मोठ्या गुंतवणुकीची घोषणा

पुणे : (स. गांवकरी)

विमान निर्मिती क्षेत्राच्या जागतिक नकाशावर पुण्याचे स्थान आता बळकट होणार आहे. जीई एरोस्पेस कंपनीने पुण्यातील उत्पादन प्रकल्पात १०० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याची घोषणा केली आहे. यामुळे कंपनीच्या भारतातील उत्पादन क्षमतेचा विस्तार होणार आहे. ही गुंतवणूक वेल्डिंगचे नवीन तंत्रज्ञान, प्रगत तपासणी उपकरणे, अचूक साधने आणि अतिरिक्त पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी वापरली जाईल. जीई एरोस्पेस कंपनीने पुण्यातील उत्पादन प्रकल्पातील एकूण गुंतवणूक ५१० कोटी रुपयांहून अधिक झाली आहे. याआधीची गुंतवणूक प्रामुख्याने उत्पादन प्रक्रिया प्रगत करणे, स्वयंचलित यंत्रणा आणि पुढील पिढीतील विमान इंजिनांच्या सुट्या भागांची क्षमता वाढवण्यावर केंद्रित होती. नव्या सुधारणांमुळे या सुविधेच्या क्षमतांचा



अधिक विस्तार होईल. जीई एरोस्पेसच्या जीई९०, जीईएनएक्स, जीई९एक्स आणि सीएफएम इंटरनॅशनलच्या लीप इंजिनसाठी लागणाऱ्या सुट्या भागांच्या उत्पादनास पाठबळ मिळेल. याबाबत जीई एरोस्पेसच्या पुणे प्रकल्पाचे व्यवस्थापकीय संचालक विश्वजित सिंग म्हणाले की, या सातत्यपूर्ण गुंतवणूकीमधून जीई एरोस्पेसची भारताप्रती असलेली दीर्घकालीन कटिबद्धता दिसून येते. आमच्या जागतिक उत्पादन साखळीत पुणे प्रकल्प महत्वपूर्ण भूमिका बजावत आहे. पुण्यातील प्रकल्पाच्या विस्तारामुळे रोजगाराच्या अधिक संधी निर्माण होत आहेत.

# संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनतर्फे भव्य रक्तदान शिबीर

- ७५ भाविकांनी केले रक्तदान
- "अध्यात्म केवळ वर्षांचे नाही, तर अंतरीच्या प्रवासाचे' – सोहन इंगवले जी

ओतूर : (स. गांवकरी)

'नर सेवा,नारायण पूजा' आणि 'रक्त नाड्यांमध्ये वाहावे, नाल्यांमध्ये नाही' या संत निरंकारी मंडळाच्या ब्रीदवाक्याला जागून, संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या वतीने ओतूर येथे भव्य रक्तदान शिबीर आणि आध्यात्मिक सत्संग सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात ७५ निरंकारी भक्तांनी आणि नागरिकांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले.

या रक्तदान शिबिराचे उद्‌घाटन श्री. मोहित दादा ढमाले व श्री. प्रवीण शेठ भांबुर्डेकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी बोलताना प्रविण शेठ भांबुर्डेकर यांनी संत निरंकारी मिशन नेहमीच संकट काळात समाजाच्या पाठीशी उभे राहिले आहे मिशनच्या सामाजिक कार्याचे कौतुक यावेळी केले. या शिबिरात संकलित झालेले ७५ युनिट रक्त 'संत निरंकारी ब्लड बँक, विलेपार्ले' (मुंबई) यांच्या वैद्यकीय पथकाद्वारे संकलित करण्यात आले.




अध्यात्म ही अंतरीच्या प्रवासाची कसोटी रक्तदान शिबिरानंतर सायंकाळी संत निरंकारी आध्यात्मिक सत्संग सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात मुंबईवरून लाभलेले प्रचारक श्री. सोहन इंगवले जी यांनी उपस्थित भाविकांना संतवाणी अतिशय सोप्या शब्दांत समजावून सांगितली.

"अध्यात्म केवळ वर्षांचे नाही, तर तो अंतरीच्या प्रवासाचा मार्ग आहे," असे प्रतिपादन करत सोहन इंगवले जी पुढे म्हणाले की, "आपण अध्यात्माच्या मार्गावर १०, २०, ३० किंवा ४० वर्षांपासून चालत आहोत यापेक्षा, आपण देवाच्या किती जवळ पोहोचलो आहोत हे पाहणे अधिक महत्त्वाचे आहे. अध्यात्मात घालवलेली वर्षे मोजण्यापेक्षा, आपल्यात झालेला अंतर्गत बदल आणि ईश्वराशी जोडलेले नाते महत्त्वाचे आहे."

सद्गुरू माता सुदीक्षा जी महाराज यांच्या दिव्य शिकवणीचा दाखला देत त्यांनी सांगितले की, "आपण ज्या घरात राहतो,तिथे पत्नी आणि मुलांमध्ये आपल्याला तो विठ्ठल (परमात्मा) दिसतो का? किंवा आपण जे काम करतो, त्या कामात त्याची जाणीव होते का? हीच खरी अध्यात्माची कसोटी आहे."

"सर्व सजीवांमध्ये आणि कर्मांमध्ये भगवंताचे रूप पाहण्यासाठी ब्रह्मवेत्त्या सद्गुरूंची नितांत गरज असते. सद्गुरूंच्या माध्यमातून जेव्हा 'आत्मस्वरूप' परमात्म्याचे ज्ञान (ब्रह्मज्ञान) प्राप्त होते, तेव्हाच ही समतेची आणि प्रेमाची जाणीव शक्य होते," कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशाल डोके यांनी केले तर उपस्थित रक्तदात्यांचे व सत्संग साठी आलेल्या भक्तांचे आभार मनोज तांबे यांनी मानले

# उपसा सिंचन योजना 'ठिबक'वर आणणार

## सहकार विभागाचा निर्णय ठरणार महत्त्वाकांक्षी

मुंबई : (स. गांवकरी)

राज्यातील सहकारी तत्वावरील सर्व उपसा सिंचन योजना ठिबक सिंचनावर आणण्याचा सहकार विभागाचा विचार आहे. उपलब्ध पाण्याचा शास्त्रशुद्ध वापर करून कमी पाण्यात जास्तीत – जास्त उत्पादन घेण्यासाठी आणि पाणी बचतीसाठीचा दीर्घकालीन उपाय म्हणून सहकार विभागाकडून हा निर्णय घेण्याच्या हालचाली सुरू आहेत.

यंदाच्या पावसाळ्यावर एल निनोचे सावट आहे. त्यामुळे पावसाळ्यात सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. कमी पावसाचा शेतीला मोठा फटका बसतो. त्यात ऊस पिकाला जास्त पाणी लागते, त्यामुळे उसाच्या उत्पादनाला मोठा फटका बसण्याची भीती व्यक्त केली जात आहे. राज्याच्या विविध भागांत सहकारी साखर कारखान्यांच्या पुढाकाराने उपसा सिंचन योजना कार्यरत आहेत.

या सिंचन योजनांच्या पाण्यावर प्रामुख्याने उसाचे उत्पादन घेतले जाते. काही अपवाद वगळता बहुतेक सर्व ठिकाणी उसाला पारंपरिक पद्धतीने पाटाने पाणी दिले जाते. पाटाने पाणी दिल्यामुळे पाण्याचा अपव्यय होतो, शिवाय अपेक्षित उत्पादनही मिळत नाही. काही कारखान्यांनी उसाला उपसा सिंचनाचे पाणी ठिबक सिंचन पद्धतीने दिल्यामुळे उत्पादनात चांगली वाढ झाली आहे. शिवाय आहे, त्याच पाण्यावर जास्तीत – जास्त क्षेत्रावर ऊस लागवड करता आली आहे. त्यामुळे कमी पाण्यावर जास्त क्षेत्रावर लागवड होऊन उत्पादनातही मोठी वाढ झाली आहे. राज्यात सहकारी तत्वावरील उपसा सिंचन योजनांची संख्या सुमारे २,२०० आहे. पुणे, सातारा, सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यात सिंचन योजनांची संख्या सुमारे १,२०० इतकी आहे. एका कोल्हापूर जिल्ह्यातील सिंचन योजनांचे सभासद तीन लाखांहून जास्त आहेत. प्रामुख्याने ऊस आणि अन्य पिके उपसा सिंचनाच्या पाण्यावर अवलंबून आहेत. या उपसा सिंचन योजनांना सहकार विभागाचे अनुदान मिळालेले आहे. आताही ठिबक सिंचनावर आण्यासाठी सहकार विभाग अनुदान देण्याच्या विचारात आहे.



## भौगोलिक स्थितीचा विचार करा

सांगली, सातारा, कोल्हापुरात सर्वात जास्त उपसा सिंचन योजना आहेत. या योजना ठिबक सिंचनावर आणण्याचा निर्णय चांगला आहे. पण, पश्चिम महाराष्ट्रात शेतकऱ्यांची जमीन धारणा कमी आहे. त्यामुळे हा निर्णय घेताना लहान शेतकऱ्यांची गरज, पीक पद्धती, भौगोलिक स्थितीचा विचार घेऊन निर्णय घेतला जावा, अशी मागणी कोल्हापूर जिल्हा इरिगेशन फेडरेशनचे अध्यक्ष विक्रांत पाटील यांनी केली.

दिवसोंदिवस पाण्याचा तुटवडा वाढत आहे. ठिबक सिंचनामुळे उसासह अन्य पिके, फळपिकांच्या उत्पादनात मोठी वाढ झाली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील जवहार सहकारी कारखान्याने उपसा सिंचन योजना ठिबक सिंचनावर आणून क्रांतिकारी बदल घडवून आणला आहे. ऊस उत्पादन प्रति एकर दहा टनांनी वाढले आहे. द्राक्ष, डाळिंब सारख्या फळपिकांना ठिबक सिंचन फायद्याचे ठरले आहे. त्यामुळे उपसा सिंचन योजना ठिबकवर आणण्याचा विचार सुरू आहे. मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून त्यासाठी अनुदान देण्याचा निर्णय घेतला जाईल, अशी मागणी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिली.

# गिरणी कामगारांना मुंबईतच घरांच्या पर्यायासाठी उच्चस्तरीय समिती

मुंबई : (स. गांवकरी)

गिरणी कामगारांना मुंबई महानगर क्षेत्रात ठाणे, नवी मुंबई, रायगड या भागांत घरे देण्याचा पर्याय ठेवण्यात आला होता. मात्र या पर्यायाला गिरणी कामगारांचा विरोध असल्याने आता मुंबईतच गिरणी कामगारांना घरे उपलब्ध व्हावीत यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. दीड लाख गिरणी कामगारांपैकी आतापर्यंत १५ हजार गिरणी कामगारांनाच गिरण्यांच्या जागेवर घरे मिळाली असून उर्वरित गिरणी कामगारांना घरे देण्यासाठी जागांचा पर्याय शोधण्यासाठी राज्य सरकारकडून नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव असिम गुप्ता यांच्या अध्यक्षतेखालील ही उच्चस्तरीय समिती अहवाल देणार आहे. सन १९८२ च्या ऐतिहासिक गिरणी संपानंतर मुंबईतील ५८ कापड गिरण्या बंद पडल्या. त्यानंतर हजारो गिरणी कामगारांच्या पुनर्वसनाचा आणि घरांचा प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित आहे. आतापर्यंत केवळ १५ हजार गिरणी कामगारांना घरे देण्यात सरकारला यश आलेल आहे. अनेक गिरणी मालकांनी गिरणी कामगारांच्या घरांच्या बांधकामासाठी एकूण बांधकामाच्या २५ टक्के जागाच शिल्लक न ठेवल्याने आणि



त्यावर सरकारने कोणतीही कारवाई न केल्याने या कामगारांच्या अद्यापपर्यंत घरे उपलब्ध झालेले नाही. ही घरे मिळावीत यासाठी विविध आंदोलने, मोर्चे आणि पाठपुरावे केल्यानंतरही सरकारकडून ठोस उपाययोजना करण्यात आलेले नाही.

या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तथा गृहनिर्माण मंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात गिरणी कामगारांच्या घरासंदर्भात गिरणी कामगार संघटना आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांची महत्वपूर्ण बैठक पार पडली होती. दरम्यान, गिरणी कामगारांना मुंबईतच घरे देण्यासाठी विविध पर्यायांचा अभ्यास करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती गठीत केली आहे. नगरविकास, वित्त, कामगार विभागातील वरिष्ठ अधिकारी तसेच म्हाडाच्या अधिकाऱ्यांचा या समितीत समावेश करण्यात आला आहे.

# देशातील सर्वात मोठ्या संरक्षण कारखान्याचे २३ मे रोजी संरक्षणमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन !

शिर्डी : (स. गांवकरी)

- जिल्ह्यात संरक्षण उत्पादन क्षेत्राला मोठी चालना !
- १५५ मिली मीटरचे प्रतिवर्षी पाच लाख तोफगोळे तयार होणार




अहिल्यानगर जिल्ह्यात प्रथमच मोठ्या प्रमाणावर संरक्षण साहित्य उत्पादन उद्योग उभा राहत असून, शिर्डी येथील सावळीविहीर औद्योगिक वसाहतीत उभारण्यात आलेल्या तोफगोळा उत्पादन प्रकल्पाचे उद्घाटन येत्या २३ मे रोजी संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांच्या हस्ते होणार आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपस्थित राहणार असून, या प्रकल्पामुळे जिल्हा देशातील महत्त्वाचे संरक्षण उत्पादन केंद्र म्हणून विकसित होणार असल्याची माहिती जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील व ग्लोब फोर्ज लिमिटेडचे संचालक तथा चेअरमन रविकांत यांनी आज येथे पत्रकार परिषदेत दिली. या प्रकल्पामध्ये १५५ मिलीमीटर क्षमतेच्या तोफगोळ्यांचे उत्पादन करण्यात येणार असून, प्रतिवर्षी पाच लाख तोफगोळे तयार करण्याची क्षमता या कारखान्याची असेल. खाजगी क्षेत्रातील तोफगोळा उत्पादनाची ही देशातील सर्वात मोठी क्षमता मानली जात असून, संपूर्ण उत्पादन तंत्रज्ञान व कच्चा माल स्वदेशी आहे. हा प्रकल्प अवघ्या एका वर्षात उभारण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'आत्मनिर्भर भारत', 'मेक इन इंडिया' व 'मेक फॉर द वर्ल्ड' या संकल्पनांना बळ देणारा हा महत्त्वाचा प्रकल्प असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. शिर्डी औद्योगिक वसाहतीतील सुमारे दोनशे एकर क्षेत्रावर विविध संरक्षण प्रकल्प विकसित करण्यात येत आहेत. यामध्ये रॉकेट लॉंचर, लांब पल्ल्याच्या रॉकेटचे सुटे भाग, स्वयंचलित ड्रोन व विविध इलेक्ट्रॉनिक यंत्रणांच्या चाचणी सुविधा विकसित केल्या जात आहेत. या प्रकल्पांसाठी सुमारे एक हजार कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित असून, त्यापैकी सहाशे कोटी रुपयांची गुंतवणूक पूर्ण झाली आहे. या माध्यमातून सुमारे दोन हजार नागरिकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध होणार आहे. याच दिवशी प्रतिदिन पंधरा टन क्षमतेच्या बायो-सीएनजी प्रकल्पाचेही उद्घाटन करण्यात येणार आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी येथे राज्य शासनाने उपलब्ध करून दिलेल्या सुमारे सहाशे एकर जागेवर भव्य दारूगोळा निर्मिती संकुल उभारण्यात येत आहे. या संकुलात टीएनटी, आरडीएक्स, एचएमएक्ससारखी विविध स्फोटके व प्रणोदक तयार करणारे कारखाने उभारले जात असून, त्यासाठी सुमारे दोन हजार कोटी रुपयांची अतिरिक्त गुंतवणूक प्रस्तावित आहे. दरवर्षी वीस हजार टन टीएनटी उत्पादनाची क्षमता येथे निर्माण होणार असून, सरकारी व खासगी क्षेत्रातील ही देशातील सर्वात मोठी क्षमता ठरणार आहे. टीएनटी व आरडीएक्स निर्मितीचे कारखाने पूर्णपणे स्वदेशी तंत्रज्ञानावर आधारित असून, त्यांचे उद्घाटन व सादरीकरण लवकरच होणार आहे. शिर्डी येथे तयार होणाऱ्या तोफगोळ्यांमध्ये स्फोटके भरण्याचे महत्त्वाचे काम अहिल्यानगर येथील प्रस्तावित कारखान्यात केले जाणार आहे. सर्व प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरू झाल्यानंतर जिल्ह्यातील सुमारे चार ते पाच हजार तरुणांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध होणार असल्याचे पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी सांगितले. जिल्ह्यातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांनाही या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध होणार आहेत.

अहिल्यानगर जिल्ह्याला संरक्षण क्षेत्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली असून, रणगाडा प्रशिक्षण केंद्र, के.के. रेंजेस व मेकॅनाईज्ड इन्फंट्री रेजिमेंटल सेंटरमुळे जिल्ह्याला आधीपासूनच संरक्षण क्षेत्रातील महत्त्व आहे. नव्या प्रकल्पांमुळे या ओळखीला अधिक बळ मिळणार असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले. शिर्डी हे धार्मिक स्थळ असल्याने प्रदूषणाचा धोका टाळण्यासाठी हा प्रकल्प विशेष रासायनिक क्षेत्रात उभारण्यात आला आहे. स्थानिक युवकांना रोजगारासाठी सक्षम करण्याच्या उद्देशाने उद्योगांच्या गरजेनुसार कौशल्य विकासावर विशेष भर देण्यात येत आहे. रतन टाटा ट्रस्टच्या सहकार्याने औद्योगिक वसाहतीमध्ये विशेष इनोव्हेशन सेंटर सुरू करण्यात येत असून, त्यासाठी दोनशे कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. एमआयडीसीकडूनही पन्नास कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. राहाता येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे स्थलांतर एमआयडीसी परिसरात करण्यात आले असून, भविष्यातील विस्तारासाठी सुपे परिसरात संरक्षण विभागाच्या जमीन अधिग्रहणाची प्रक्रिया प्राथमिक स्तरावर सुरू असल्याची माहितीही देण्यात आली.

या उद्घाटनाच्या निमित्ताने २३ व २४ मे रोजी विशेष संरक्षण प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. देशातील प्रमुख संरक्षण उत्पादन कंपन्या व शंभरहून अधिक सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग या प्रदर्शनात सहभागी होणार आहेत. जिल्हाभरातून नागरिक या प्रदर्शनाला भेट देतील व तरुणांसाठी संरक्षण क्षेत्रातील संधी जाणून घेण्याची ही मोठी संधी ठरणार असल्याचे पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी सांगितले.

## थोडक्यात पण महत्वाचे




### कर्करोग जनजागृतीसाठी 'वीरा मिस अँड मिसेस महाराष्ट्र' फॅशन शो

पुणे (स. गांवकरी) : वीरा मिस अँड मिसेस महाराष्ट्र आणि द डार्क शॅडो मोशन पिक्चर्स यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य फॅशन शोचे आयोजन करण्यात आले आहे. सामाजिक बांधिलकी जपत कर्करोग जनजागृती तसेच कर्करोगाशी झुंज देणाऱ्या रणरागिणी महिलांना समर्पित असलेला हा विशेष उपक्रम पुण्यात मोठ्या दिमाखात पार पडणार आहे. या पत्रकार परिषदेत आयोजकांनी शोची संकल्पना, उद्दिष्टे आणि कार्यक्रमाची रूपरेषा याविषयी माहिती दिली. ३० आणि ३१ मे रोजी ग्रँड तमन्ना हॉटेल, फेज २, हिंजवडी येथे हा भव्य फॅशन शो मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आला असून, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून अनेक स्पर्धक या स्पर्धेत सहभागी होणार असल्याची माहिती आयोजक डॉ. अंजली आवटे आणि रामकुमार शेडगे यांनी दिली. फॅशन, आत्मविश्वास आणि सामाजिक जाणीव यांचा सुंदर संगम घडवणारा हा शो महिलांच्या संघर्षाला सलाम करणारा ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. कर्करोगाबाबत जनजागृती निर्माण करण्यासोबतच कर्करोगाशी लढणाऱ्या महिलांच्या जिद्दीला व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. पत्रकार परिषदेला प्रसिद्ध मॉडेल व स्किनतज्ज्ञ डॉ. अंजली आवटे, डॉ. संदीप आवटे, चित्रपट लेखक-दिग्दर्शक रामकुमार शेडगे, पायल प्रामाणिक, डॉ. प्रीती गुप्ते, डॉ. प्रतिभा लबडे, डॉ. जबीन पठाण, सारिका बोऱ्हाडे, डॉ. अश्विनी नवले, नितीन झगरे, आकाश जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. या शो बद्दल पुणेकरांमध्ये उत्सुकता निर्माण झाली असून हा फॅशन शो सामाजिक संदेश देणारा वेगळा उपक्रम ठरणार असल्याची चर्चा आहे.

### ग्रामपंचायत सिंगापूरची तालुकास्तरीय पडताळणी

ठाणे (स. गांवकरी) : मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान सन २०२५-२६ अंतर्गत तालुकास्तरीय पडताळणी समितीचा दौरा दि. १४ मे, २०२६ रोजी ग्रामपंचायत सिंगापूर, ता. मुरबाड, जि. ठाणे येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या दौऱ्यादरम्यान ग्रामपंचायतीमार्फत राबविण्यात आलेल्या विविध विकासकामांची व नाविन्यपूर्ण उपक्रमांची समितीने सविस्तर पाहणी केली. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत सुशासनयुक्त ग्रामपंचायत, सक्षम पंचायत, जलसमृद्ध, स्वच्छ व हरित गाव, मनरेगा व इतर योजनांचे अभिसरण, गावपातळीवरील संस्था सक्षमीकरण, उपजीविका विकास, सामाजिक न्याय, लोकसहभाग व श्रमदानातून लोकचळवळ निर्माण करणे तसेच नाविन्यपूर्ण उपक्रम या विविध निकषांच्या आधारे ग्रामपंचायतीच्या कामकाजाचे मूल्यांकन करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत सिंगापूरने राबविलेल्या वाचनालय उपक्रम, सौर पथदिवे उभारणी, सर्व शासकीय इमारतींवर सोलर नेट मीटर जोडणी, वृक्षलागवड व वृक्षसंवर्धन या उपक्रमांची समितीने विशेष दखल घेतली. ग्रामपंचायतीने पर्यावरणपूरक व शाश्वत विकासाच्या दृष्टीने केलेली कामे उल्लेखनीय असल्याचे मत समिती सदस्यांनी व्यक्त केले. तसेच ग्रामविकासासाठी राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांबाबत समाधान व्यक्त करून ग्रामपंचायतीला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या तालुकास्तरीय पडताळणी समितीत समिती प्रमुख श्री. डी. जी. जाधव (गटविकास अधिकारी, पंचायत समिती भुसावळ, जि. जळगाव), श्री. गौतम वाडे (विस्तार अधिकारी पंचायत), श्री. संजय भारंबे (ग्रामपंचायत अधिकारी), श्री. सुनील मोरे (केंद्रप्रमुख), श्री. सी. पी. पाटील (आरोग्य सहाय्यक) तसेच श्री. हर्षल येवले (डेटा ऑपरेटर) यांनी सहभाग घेतला. याप्रसंगी ग्रामपंचायत सिंगापूरचे सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी, मुख्याध्यापक, पोलीस पाटील, आशा सेविका, सीआरपी, अंगणवाडी सेविका व मदतनीस, गावपातळीवरील कर्मचारी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### युरिया खताचा काळाबाजार रोखण्यासाठी चेकनाके उभारणार

ठाणे (स. गांवकरी) : खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात युरिया खताचा काळाबाजार, अवैध साठेबाजी आणि बेकायदेशीर वाहतूक रोखण्यासाठी कृषी विभाग व पोलीस प्रशासनामार्फत संयुक्त विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. या अंतर्गत जिल्ह्याच्या सीमेलगत असलेल्या प्रमुख मार्गांवर विशेष चेकनाके उभारून संशयित वाहनांची तपासणी करण्यात येणार असल्याची माहिती कृषी विभागाकडून देण्यात आली आहे. जिल्ह्यात शेतकऱ्यांना योग्य वेळी व योग्य दरात खत उपलब्ध व्हावे, तसेच कृषी उपयोगासाठी असलेले निमकोटेड युरिया खत इतर औद्योगिक वापरासाठी वळवले जाणार नाही यासाठी प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत. काही ठिकाणी युरिया खताची अवैध साठेबाजी, परराज्यात अथवा इतर जिल्ह्यांमध्ये बेकायदेशीर वाहतूक, जादा दराने विक्री आणि अनधिकृत वितरण होत असल्याच्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर ही मोहीम अधिक तीव्र करण्यात आली आहे. या मोहिमेदरम्यान कृषी विभाग व पोलीस प्रशासनाचे अधिकारी संयुक्तपणे वाहनांची तपासणी करून युरिया खत वाहतूक करणाऱ्या वाहनांची कागदपत्रे, परवाने, बिल व साठा यांची पडताळणी करणार आहेत.

## अँडव्होकेट जितेंद्र जोशी यांच्या पाठपुराव्याला यश

टिटवाळा : (स. गांवकरी)

ठाणे ग्रामीण पोलीस दलात वाहतूक व्यवस्थापन अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले असून वाहतूक शाखेसाठी तब्बल ४५ पोलिस कर्मचाऱ्यांचे संलग्नीकरण करण्यात आले आहे. या निर्णयामुळे ठाणे ग्रामीण परिसरातील वाहतूक नियंत्रण अधिक प्रभावी होणार असल्याचे बोलले जात आहे. त्यातच कल्याण तालुका वाहतूक शाखेसाठी सात पोलीस कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येणार असल्याने या निर्णयामागे टिटवाळ्यातील अँडव्होकेट जितेंद्र जोशी यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला यश आल्याची चर्चा आहे. त्यांनी ठाणे ग्रामीण भागातील वाढती वाहतूक कोंडी, अपघातांची वाढती संख्या आणि वाहतूक शाखेची गरज लक्षात घेऊन राज्याचे गृहमंत्री तसेच पोलिस महासंचालकांकडे लेखी मागणी केली होती. या मागणीची दखल घेत ठाणे ग्रामीण पोलीस प्रशासनाने वाहतूक शाखा बळकट करण्यासाठी विविध पोलीस ठाण्यांमधून ४५ पोलिस कर्मचाऱ्यांचे संलग्नीकरण केले आहे. या नव्या नियुक्त्यांमुळे कल्याण तालुका टिटवाळा येथे सात,भिवंडी तालुका सहा, शहापूर येथे पाच,मुरबाड येथे तीन,कसारा येथे तीन,गणेशपुरी येथे तीन,टोकावडे येथे दोन,वासिंद येथे तीन किन्हवली येथे एक,कुळगाव येथे एक,पडघा येथे चार, वाहतूक शाखा ठाणे ग्रामीण एक,जिल्हा वाहतूक शाखा (इंटर सेप्टर वाहन) साठी तीन,असे एकूण 45 जणांची टीम संपूर्ण जिल्हा भरात कार्यरत होणार आहे. त्यामुळे या भागांतील वाहतूक नियंत्रण अधिक शिस्तबद्ध होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. सदर आदेश अपर पोलीस अधीक्षक ठाणे ग्रामीण अनमोल मित्तल यांच्या स्वाक्षरीने जारी करण्यात आला आहे.

## देवस्थान इनाम निर्मूलन कायद्याविरोधात मंदिरे एकवटली !

पुणे : (स. गांवकरी)




महाराष्ट्राची सांस्कृतिक अस्मिता आणि कोट्यवधी हिंदूंचे श्रद्धास्थान असलेल्या अष्टविनायक देवस्थानांच्या शेकडो एकर जमीनीला धोका पोहोचवणारा 'महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप अधिनियम, २०२६' कोणत्याही अटीशिवाय राज्य सरकारने तात्काळ मागे घ्यावा, अशी एकमुखी मागणी आज येथे आयोजित अष्टविनायक मंदिरांच्या विश्वस्तांनी संयुक्त पत्रकार परिषदेत केली. महसूल व वन विभागाने पुढे सरकवलेला हा मसुदा म्हणजे हिंदू मंदिरांची स्वायत्तता आणि त्यांच्या उत्पन्नाचे ऐतिहासिक स्रोत मुळापासून मोडीत काढण्याचे पद्धतशीर कारस्थान आहे. एका बाजूला अल्पसंख्याकांच्या संस्थांना कायदेशीर अभेद्य कवच द्यायचे आणि दुसऱ्या बाजूला हिंदूंच्या पवित्र मंदिरांची मालमत्ता व्यक्तींच्या खाजगी घशात घालायची, हा सरकारी दुजाभाव अष्टविनायक मंदिरे कदापि सहन करणार नाही, सर्व अष्टविनायक मंदिरांचा या प्रस्तावित कायद्याला तीव्र विरोध आहे, अशी स्पष्ट भूमिका 'चिंचवड देवस्थान ट्रस्ट'चे विश्वस्त श्री. केशव विद्वांस यांनी अष्टविनायक मंदिरांच्या संयुक्त पत्रकार परिषदेद्वारे मांडली.

पुणे येथे झालेल्या पत्रकार परिषदेला अष्टविनायक मंदिरे समितीच्या वतीने श्री मयुरेश्वर (मोरगांव), श्री चिंतामणी (थेऊर), श्री सिद्धिविनायक (सिद्धटेक), श्री मोरया गोसावी संजीवन समाधी मंदिर आदीचे व्यवस्थापन पहाणारे चिंचवड देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त श्री. केशव विद्वांस, श्री बल्लाळेश्वर देवस्थान (पाली) ट्रस्टचे श्री. जितेंद्र गद्रे, उपाध्यक्ष श्री. वैभव आपटे, श्री विघ्नहर गणपती देवस्थान ट्रस्ट ओझरचे अध्यक्ष श्री. बाळकृष्ण कवडे, श्री गणपती देवस्थान महडचे विश्वस्त श्री. किरण काशीकर आणि महाराष्ट्र मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक श्री. सुनील घनवट हे उपस्थित होते. राज्यातील सर्वच देवस्थानांना ग्रासणाऱ्या या संभाव्य संकटामुळे आता महाराष्ट्राचे सांस्कृतिक आणि धार्मिक वैभव असलेली पवित्र अष्टविनायक मंदिरेही या विरोधात पुढे आली असून त्यांनी या कायद्याला कडाडून विरोध दर्शवला आहे. चिंचवड देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त श्री. केशव विद्वांस म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज, पेशवे आणि ऐतिहासिक राजघराण्यांनी मोरगाव, सिद्धटेक, पाली, महाड, थेऊर, लेण्याद्री, ओझर आणि रांजणगाव या अष्टविनायकांच्या मंदिरांमध्ये त्रिकाळ पूजा-अर्चा, महाप्रसाद, अखंड अन्नछत्र, नैवेद्य आणि वार्षिक उत्सव अविरत चालण्यासाठी शेकडो एकर जमिनी 'इनाम' म्हणून दिल्या आहेत. कायदेशीर नियमांनुसार मंदिराची 'मूर्ती' हीच एक 'कायदेशीर व्यक्ती' असून या जमिनींची एकमेव मालक आहे; परंतु या प्रस्तावित कायद्याच्या कलम ३ आणि ४ मुळे एका झटक्यात ही ऐतिहासिक इनामे रद्द होऊन, देवतेच्या जमिनी वहिवाटदार, मिरासदार किंवा पुजारी यांच्या नावे खाजगी मालमत्ता म्हणून वर्ग केल्या जातील.

## कळवण तालुक्यासह कनाशीत घरगुती गॅसचा तीव्र तुटवडा

कनाशी : (स. गांवकरी)



- बुकिंग करूनही आठवडाभर सिलेंडर नाही, चुलीवर लाकडे फुंकताहेत महिला

### हेच का अच्छे दिन?

कनाशी येथील सामाजिक कार्यकर्ते निवृत्ती बागुल यांनी संताप व्यक्त करताना सांगितले, २०१४ पूर्वी आम्ही चुलीवर स्वयंपाक करायचो. मोदी सरकारने उज्वला आणली, आम्हाला वाटले अच्छे दिन आले. पण आज परिस्थिती अशी आहे की गॅस बुक करूनही १० -१० दिवस मिळत नाही. महिला पुन्हा धुरात खोकताहेत. अनुदानही कमी झाले, भावही वाढले आणि आता सिलेंडरच गायब. शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे ग्रामीण महिलांना पुन्हा अंधारयुगात ढकलले जात आहे. हेच का अच्छे दिन?" दरम्यान, संतप्त महिलांनी पुढील आठवड्यात कळवण तहसील कार्यालयावर रिकामे सिलेंडर घेऊन मोर्चा काढण्याचा इशारा दिला आहे. वेळेत गॅस पुरवठा सुरळीत न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

कळवण तालुक्यासह कनाशीत गेल्या महिनाभरापासून घरगुती गॅस सिलेंडरचा तीव्र तुटवडा निर्माण झाला आहे. गॅस एजन्सीकडे बुकिंग करूनही ८ ते १० दिवस सिलेंडर मिळत नसल्याने सर्वसामान्य जनतेचे, विशेषतः महिलांचे हाल होत आहेत. शासनाच्या चुकीच्या वितरण धोरणामुळे ग्रामीण भागातील जनता पुन्हा चुलीकडे वळली असून, लाकडाच्या धुराने महिलांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. "हेच का मोदींचे अच्छे दिन?" असा संतप्त सवाल गावकरी उपस्थित करत आहेत. कनाशीत भारत गॅस एच पी गॅस हे एकमेव गॅस एजन्सीवर कनाशी, खिर्डी, मोहनपाडा, बोरगावसह 40 हून अधिक गावांचा भार आहे. मात्र पुरवठा अत्यंत अनियमित झाला आहे. ग्राहकांनी ऑनलाइन किंवा फोनवरून बुकिंग केल्यानंतर ८ ते १० दिवस वाट पाहावी लागत आहे. काही वेळा तर "स्टॉक नाही" असे सांगून बुकिंग रद्द केले जात आहे. गंगापूर येथील गृहिणी म्हणाल्या, "गेल्या सोमवारी सिलेंडर बुक केला. आज आठ दिवस झाले, तरी गॅस आला नाही. एजन्सीत विचारले तर 'गाडी आली नाही' हेच उत्तर मिळते. घरात लहान मुले आहेत. रोज सकाळी चुलीवर लाकडे फुंकून स्वयंपाक करावा लागतो. डोळ्यांतून पाणी येते, धुराने छाती भरते. तर उज्वला योजनेतून गॅस जोडणी मिळालेल्या कुटुंबांची अवस्था तर अधिक बिकट आहे. सिलेंडर परवडत नसल्याने अनेकांनी तो वापरणे बंदच केले होते. आता ज्यांना परवडतो, त्यांनाही गॅस मिळेनासा झाला आहे. त्यामुळे कनाशीसह संपूर्ण तालुक्यातील आदिवासी पाड्यांवर पुन्हा चुली पेटू लागल्या आहेत. "सरकारने आम्हाला गॅस दिला, फोटो काढले, पण सिलेंडरच मिळत नसेल तर त्या गॅसचा उपयोग काय? लाकडे गोळा करायला जंगलात जावे लागते. पावसाळ्यात तर आणखी पंचाईत होते. धुरामुळे दमा, खोकला वाढला आहे," अशी व्यथा गंगापूर येथील रंजना देशमुख यांनी मांडली. ग्रामस्थांचा आरोप आहे की किरकोळ पुरवठा होणारे सिलेंडरही हॉटेल व व्यावसायिकांना चढ्या भावाने विकले जात आहेत. घरगुती ग्राहकांना मात्र हप्ता हप्ता वाट पाहावी लागते. शासनाच्या वितरण व्यवस्थेवर नियंत्रण नसल्याने ग्रामीण भागातील ग्राहक वाऱ्यावर सोडले गेले आहेत.

## प्रतीक्षा यादी टप्पा क्र. ०१ मधील पात्र बालकांच्या प्रवेश प्रक्रियेस प्रारंभ

ठाणे : (स. गांवकरी)

बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रिया सन २०२६-२७ अंतर्गत निवड यादीतील प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाली असून आता प्रतीक्षा यादी टप्पा क्र. ०१ मधील पात्र विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेस प्रारंभ करण्यात आला आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये बुधवार, दि. १४ मे, २०२६ पासून प्रतीक्षा यादी टप्पा क्र. ०१ मधील विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेस सुरुवात करण्यात आली आहे. या टप्प्यामध्ये ठाणे जिल्ह्यातील एकूण १९५६ बालकांची निवड करण्यात आली असून संबंधित पालकांना दि. १५ मे, २०२६ पासून एसएमएसद्वारे माहिती पाठविण्यात येत आहे. शाळांमधील उपलब्ध रिक्त जागांनुसारच प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांच्या पालकांना एसएमएस पाठविण्यात येणार असल्याने पालकांनी केवळ एसएमएसवर अवलंबून न राहता आरटीई पोर्टलवरील "Application Status" या टॅबमध्ये आपल्या बालकाचा अर्ज क्रमांक टाकून अर्जाची सद्यस्थिती नियमितपणे तपासावी, असे आवाहन शिक्षण विभागामार्फत करण्यात आले आहे. प्रतीक्षा यादीतील पात्र बालकांच्या पालकांनी आपल्या बालकाचे ॲलॉटमेंट लेटर आरटीई पोर्टलवरून डाउनलोड करून त्याची प्रिंट काढावी. सदर ॲलॉटमेंट लेटरसह आवश्यक कागदपत्रे घेऊन विहित मुदतीत जवळच्या पडताळणी केंद्रावर उपस्थित राहून पडताळणी समितीकडून कागदपत्रांची तपासणी करून घ्यावी. दि. १५ मे, २०२६ ते दि. २३ मे, २०२६ या कालावधीत कागदपत्रांची पडताळणी करून ऑनलाईन प्रवेश निश्चित करणे आवश्यक आहे. प्रवेश निश्चित झाल्यानंतर पालकांनी त्याची पावती घेऊन संबंधित शाळेत जाऊन अंतिम प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी.

## प्रधानमंत्री जनआरोग्य योजना सर्वसामान्यांना दिलासादायक

### ना. राधाकृष्ण विखे पा.

टाकळी ढोकेश्वर : (स. गांवकरी)

प्रधानमंत्री जनआरोग्य योजना तसेच राज्य सरकारची महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना सर्वसामान्य तसेच गोरगरीब जनतेसाठी दिलासादायक असल्याचे प्रतिपादन जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले. टाकळी ढोकेश्वर येथील साई सावली मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल येथे विविध शासकीय आरोग्य योजना व हिमोफोलिया ट्रीटमेंट सेंटरचा लोकार्पण सोहळा ना. राधाकृष्ण विखे पा.यांचे हस्ते पार पडला त्यावेळी ते बोलत होते.अध्यक्षस्थानी आमदार काशिनाथ दाते होते.यावेळी बोलताना विखे पा.यांनी साईसावली हॉस्पिटलच्या माध्यमातून टाकळी ढोकेश्वर सारख्या ग्रामीण भागात प्रधानमंत्री जनआरोग्य विम्यामुळे गोरगरीब जनतेला मोफत आरोग्य सेवा तसेच हिमोफोलिया ट्रीटमेंट सेंटरच्या माध्यमातून हिमोफोलिया रुग्णांसाठी औषधउपचार उपलब्ध होणार असल्याचे सांगितले.साई सावली हॉस्पिटल सर्वसामान्यांना भविष्यकाळात निश्चितच आधार ठरेल असे त्यांनी सांगितले. यावेळी आ.काशिनाथ दाते यांनी मुख्यमंत्री गरीब सहायता निधी योजनेतुन तालुक्यातील अनेक गरजू रुग्णांना मोठया प्रमाणात फायदा मिळवून दिला असल्याचे सांगितले. प्रास्ताविक व स्वागत डॉ.भाऊसाहेब खिलारी यांनी केले.यावेळी जिल्हा मराठा संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त सीताराम खिलारी,डॉ.भाऊसाहेब खिलारी,डॉ.स्वाती खिलारी,ॲड. रघुनाथ खिलारी,शिवाजीराव खिलारी,डॉ. बाळासाहेब बांडे,विनायक देशमुख,विश्वनाथ कोरडे, वसंतराव चेडे,राहुल पाटील शिंदे,बबनराव पायमोडे, डॉ.विजय पुरी,डॉ.जयवंत निमसे,डॉ.तुषार धुमाळ,डॉ संतोष ढवळे,डॉ.अनिकेत भालसिंग,डॉ प्रदीप दाते, दादा भालेकर, प्रशांत गायकवाड,सुभाष दुधाडे, विलासराव झावरे,बापूसाहेब रांधवन,दत्ता आवारी,डॉ दत्ता दातीर व वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.प्रा.भाऊसाहेब हिंगडे यांनी सूत्रसंचालन केले तर शिवाजीराव खिलारी यांनी आभार मानले. पारनेर तालुक्याच्या जिव्हाळ्याचा असलेल्या पाणीप्रश्नावर बोलताना ना.विखे पाटील म्हणाले की, पारनेर तालुक्यातील पठार भागातील दुष्काळ कायमस्वरूपी हटवण्यासाठी तालुक्यातील विविध पाणी योजनांचे सर्वेक्षण सुरु आहेत. मांडओहोळ धरण योजनेत गोदावरी खोऱ्यातून मिळणारे अतिरिक्त पाणी उपलब्ध करून देण्यास कटिबद्ध असल्याचे सांगितले.



### पारनेच्या विकासासाठी ना. विखे यांचे मोलाचे सहकार्य : आ. काशिनाथ दाते

पारनेर तालुक्यातील विकासकामांसाठी ना. विखे यांचे नेहमीच मोलाचे सहकार्य असून तालुक्याच्या दळणवळनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असणारा वाडेगव्हाण फाटा ते चंदनापुरी घाट रस्ता कामास मंजुरी व धोत्रे येथे २२८ के.व्ही सबस्टेशन मंजुरीसाठी ना.विखे यांनी सहकार्य करावे अशी मागणी आ. दाते यांनी केली.

## थोडक्यात पण महत्वाचे



### कमळाबाई पाडळे यांचा प्रथम स्मृतिदिन सामाजिक उपक्रमांनी साजरा

श्रीगोंदा (स. गांवकरी) : तालुक्यातील शिरसगाव बोडखा येथे दिवंगत कमळाबाई तुकाराम पाडळे यांचा प्रथम स्मृतिदिन विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डिकसळचे माजी सरपंच ॲड. महेंद्र शिंदे होते. उबाळे, पाडळे आणि नेटवटे परिवाराच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला. सामाजिक बांधिलकी जपत रमेश पाडळे यांच्या पुढाकारातून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिरसगाव, देशमुखवस्ती आणि गोंटेवस्ती येथील विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले. तसेच गावातील वाचनालयासाठी कपाट व पुस्तके देण्यात आली. बौद्ध विहारासाठी भगवान बुद्धांची मूर्तीही भेट देण्यात आली. यावेळी राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक रामदास ठाकर, सामाजिक कार्यकर्ते सतीश ओव्हळ, लडकत आण्णा, संविधान प्रचारक रावसाहेब घोडके, दत्तात्रय सोनवणे, कोकण गावचे माजी सरपंच आबासाहेब राजपूत, संतोष भालेराव, दशरथ गायकवाड, शशिकांत जगताप, प्रमोद जाधव, भारत आल्हाट, मारुती वागस्कर, शिरसगावच्या सरपंच शारदा जाधव आणि शांताराम उबाळे यांनी दिवंगत कमळाबाई पाडळे यांच्या कार्याचा गौरव केला. प्रा. प्रशांत चव्हाण यांचे प्रबोधनपर व्याख्यानही यावेळी झाले. कार्यक्रमास सतीश जाधव, सोसायटीचे चेअरमन भानुदास सोमवंशी, उपसरपंच अमोल उबाळे, व्हा. चेअरमन जुबेर सय्यद, वीरपत्नी कांचनताई सरोदे, माजी व्हा. चेअरमन संजय उबाळे, पुणे उपसंचालक कार्यालयातील अधिकारी प्रशांत नेटवटे, बाळकृष्ण भापकर, सागर कसबे, सुनील उबाळे, दादासाहेब उबाळे, राहुल पाडळे, अमोल नेटवटे, डॉ. थोरात, सचिन उबाळे, लडकत आबा, लडकत नाना यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष उबाळे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार रमेश पाडळे यांनी मानले.



### श्रीगोंद्यात बाईक रॅलीने 'स्वाभिमान दिन' उत्साहात साजरा

श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : वंचितांच्या हक्कासाठी सातत्याने लढणारे नेते श्रद्धेय बाळासाहेब उर्फ प्रकाश आंबेडकर यांचा वाढदिवस श्रीगोंदा तालुक्यात 'स्वाभिमान दिन' म्हणून उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त काढण्यात आलेल्या भव्य मोटारसायकल रॅलीमुळे परिसर निळेमय झाला होता. वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष संतोष जौंजाळ यांच्या नेतृत्वाखाली म्हसे येथून रॅलीला प्रारंभ झाला. 'जय भीम'च्या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. विविध गावांतून मार्गक्रमण करत ही रॅली बेलवंडी येथे पोहोचली. यावेळी सामाजिक बांधिलकी जपत बेलवंडी पोलीस ठाण्यास भारतीय संविधानाची प्रस्तावना तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा भेट देण्यात आली. संविधान सन्मानाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक करण्यात आले. रॅलीच्या सांगता सभेत ज्येष्ठ नेते दत्तात्रय सोनवणे, संतोष भोसले, पांडुरंग साळवे व सुखदेव फाजगे यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी सामाजिक ऐक्य, संविधान मूल्ये आणि संघटन बळकटी यावर विचार मांडले. यानंतर वंचित बहुजन आघाडीचे तालुका महासचिव महेश रविंद्र पवार यांच्या निवासस्थानी कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत केक कापून बाळासाहेब आंबेडकरांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह दिसून आला. कार्यक्रमास महेंद्र थोरात, विठ्ठल हूलसर, रवींद्र जौंजाळ, सोमनाथ वंजारे, संतोष पठारे, अरुण पठारे, बापू गायकवाड, सोमनाथ पवार, रवींद्र चव्हाण, अक्षय फाजगे, बाबुराव शिंदे, तेजस जौंजाळ, आकाश गायकवाड, स्वप्नील जाधव, संदीप दिवटे, अनिल नेटवटे, बाबुराव रोकडे, ओम फाजगे, जगदीश गायकवाड, सागर गायकवाड, विशाल नेटवटे, पप्पू शिंदे, शेखर पवार यांच्यासह तालुक्यातील अनेक भीमसैनिक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नारायणगव्हाण ग्रामस्थांचा संताप

## प्रलंबित चौपदरीकरणाविरोधात जिल्हाधिकारी कार्यालयावर चाळीस डिग्रीच्या पुढील तापमानात डांबरी रस्त्यावर लोटांगण आंदोलन

पारनेर : (स. गांवकरी)

- रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करा, अन्यथा तीव्र आंदोलन.
- भूधारकांना मोबदला देण्याची मागणी
- निष्क्रिय अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करण्याची मागणी




नगर–पुणे महामार्गावरील नारायणगव्हाण येथील प्रलंबित चौपदरीकरणाचे काम तातडीने पूर्ण करावे, भूधारकांना योग्य मोबदला द्यावा तसेच वारंवार होणाऱ्या अपघातांना जबाबदार अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करावेत, या विविध मागण्यांसाठी नारायणगव्हाण येथील सामाजिक कार्यकर्ते सचिन बबन शेळके यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर चाळीस डिग्रीच्या पुढील तापमानात डांबरी रस्त्यावर लोटांगण आंदोलन करत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले.यावेळी शरद पवळे, शिवाजी नवले, संतोष कोहकडे, रमेश कोहकडे, रामचंद्र अवचिते, संजय साबळे, बबनराव गुंड, किरण ठुबे, बाजीराव जगदाळे, जनार्दन खोबरे, सचिन कांडेकर, गजेंद्र सरडे आदी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, नारायणगव्हाण येथील महामार्गाचे चौपदरीकरण अनेक वर्षांपासून अपूर्ण अवस्थेत आहे. वाढती वाहनसंख्या आणि अरुंद रस्ता यामुळे गाव परिसरात वारंवार अपघात होत असून शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि प्रवाशांना रस्ता ओलांडताना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. सातत्याने छोटे-मोठे अपघात घडत असल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

ग्रामस्थ व सामाजिक संघटनांनी वेळोवेळी आंदोलन आणि पाठपुरावा करून प्रशासनाचे लक्ष वेधले. सामाजिक कार्यकर्ते शरद पवळे यांच्या प्रयत्नांतून ९४५ मीटरपैकी ८१५ मीटर रस्त्याचे काम पूर्ण झाले. मात्र अद्याप १२० ते १५० मीटरचे काम प्रलंबित आहे. नारायणगव्हाण गाव रस्त्याच्या मध्यभागी असल्याने ग्रामस्थांचा या मार्गावर मोठ्या प्रमाणात दळणवळणासाठी वापर होत असतो. त्यामुळे अपघात टाळण्यासाठी उर्वरित चौपदरीकरण तातडीने पूर्ण करणे अत्यावश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

तसेच भूधारकांना योग्य मोबदला द्यावा, कामात दिरंगाई करणाऱ्या निष्क्रिय व कामचुकार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी आणि भविष्यात महामार्गावर कोणतीही दुर्घटना घडल्यास संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, नारायणगव्हाणसह नगर–पुणे महामार्गावरील प्रलंबित रस्त्याची कामे तातडीने पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल तसेच शासनाची अंत्ययात्रा काढण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

## खत विक्रीत लिंकिंग करणाऱ्यांवर कारवाईचा इशारा

ठाणे : (स. गांवकरी)

- खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर कृषी विभाग सतर्क
- "नो लिंकिंग" फलक लावण्याच्या सूचना

आगामी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना खतांचा सुरळीत, पारदर्शक व निर्बंधमुक्त पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी जिल्हा परिषद ठाणे कृषी विभागामार्फत कृषी निविष्ठा विक्रेत्यांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. खत विक्री करताना इतर कोणत्याही कृषी निविष्ठांची सक्तीने जोडणी (लिंकिंग) करणाऱ्या विक्रेत्यांवर कठोर प्रशासकीय व दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा कृषी विभागाने दिला आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या गरजेनुसार आवश्यक तेवढेच खत स्वतंत्रपणे खरेदी करण्याचा संपूर्ण अधिकार असून, खत खरेदीसाठी इतर बियाणे, औषधे किंवा कृषी साहित्य खरेदी करण्याची सक्ती करणे हा नियमभंग मानला जाणार आहे. अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्यास संबंधित विक्रेत्यांविरुद्ध परवाना निलंबन, परवाना रद्द करणे तसेच आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे. जिल्ह्यातील सर्व कृषी निविष्ठा विक्री केंद्रांवर "नो लिंकिंग" असे स्पष्ट फलक लावण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्यासाठीही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. खरीप हंगामासाठी जिल्ह्यातील गुणनियंत्रण यंत्रणा सज्ज करण्यात आली असून कृषी विभागाच्या भरारी पथकांमार्फत विविध कृषी निविष्ठा केंद्रांची नियमित तपासणी करण्यात येणार आहे.

## संजयजी भोकरे यांना 'Z+' दर्जाची पोलीस सुरक्षा देण्याची मागणी



श्रीगोंदा: (स. गांवकरी)

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या श्रीगोंदा शाखेच्या वतीने राज्य संघटक तथा अंबाबाई तालीम संस्थेचे अध्यक्ष आणि दैनिक जनप्रवासचे समूह संपादक संजयजी भोकरे यांना तातडीने 'Z+' दर्जाची पोलीस सुरक्षा देण्यात यावी, अशी मागणी श्रीगोंदा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, संजयजी भोकरे यांच्या हत्येचा कट रचल्याप्रकरणी पोलिसांनी काही आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून देशी बनावटीची पिस्तुले, जिवंत काडतुसे आणि धारदार शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. या घटनेमुळे पत्रकार संघटनेत तसेच परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे की, यापूर्वीही त्यांचा मुलगा डिजिटल मिडियाचे प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ भोकरे यांच्यावर जीवघेणा हल्ला झाला होता. त्यामुळे भोकरे कुटुंबाच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला असून या प्रकरणामागील सूत्रधारांचा शोध घेऊन कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच अंबाबाई तालीम संस्थेच्या जमिनीवर डोळा ठेवून काही समाजकंटकांकडून जीवे मारण्याचा कट रचला जात असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर संजयजी भोकरे यांना तातडीने 'Z+' दर्जाची सुरक्षा द्यावी, तसेच संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आली आहे.

यावेळी जिल्हा अध्यक्ष दत्ता पाचपुते, तालुकाध्यक्ष राजू शेख, शिवाजी साळुंखे, पीटर रणसिंग,राम सोनवणे, राम कोळपे, माधव बनसोडे, आप्पा चव्हाण, सुभाष शिंदे, उपाध्यक्ष विजय मांडे, अंकुश शिंदे,दादा सोनवणे, अंकुश तुपे उपस्थितीत होते.

## राज्य शिक्षकेतर महासंघाचे प्रसिद्धी प्रमुख नंदकुमार कुरुमकर यांची कौठा माध्यमिक विद्यालयाला सदिच्छा भेट

श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)



कौठा माध्यमिक विद्यालय कौठा येथील विद्यालयाला राज्य शिक्षकेतर महासंघाचे प्रसिद्धी प्रमुख नंदकुमार कुरुमकर यांच्यासह. चिभळे माध्यमिक विद्यालय चे मुख्याध्यापक श्री संजय कोथिंबीरे सर श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री भास्कर राव जगताप सर, न्यू इंग्लिश स्कूल पिंपळसूटी येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्री दिलीपराव देविकर सर यांनी आज सदिच्छा भेट दिली. या सर्व मान्यवरांचा सन्मान विद्यालयाच्या वतीने मुख्याध्यापक श्री दिलीपराव काटे सर यांनी केला. समवेत सर्व सहकारी सेवक मित्र उपस्थित होते. या भेटीदरम्यान राज्य शिक्षकेतर महासंघाचे प्रसिद्धी प्रमुख नंदकुमार कुरुमकर यांनी विद्यालयाच्या सर्वांगीण विकासाबाबत माहिती घेत विद्यालय हे सहकार व शिक्षण महर्षी शिवाजीराव नागवडे बापू यांनी ज्ञानदीप शिक्षण संस्थेच्या माध्यमातून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत उभा केले. या विद्यालयाचा दरवर्षी एसएससी परीक्षेचा निकाल अत्यंत उत्कृष्ट लागला जात आहे. सहकार महर्षी बापूंच्या सूचनेनुसार विद्यालयाला नूतन इमारत लाभली अत्यंत प्रशस्त वातावरणात हे विद्यालय विद्यार्थ्यांसाठी परवणी ठरले आहे. या विद्यालयात सर्व वातानुकूलित व्यवस्था विद्यार्थ्यांसाठी आनंददायी शिक्षणासाठी पोषक वातावरण असून या खेडेगावात विद्यार्थ्यांना दहावीपर्यंत शिक्षण मिळते हे कौठा ग्रामस्थ व विद्यार्थ्यांचे भाग्य आहे सहकार महर्षी नागवडे कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र दादा नागवडे व संस्थेच्या अध्यक्षा सौ अनुराधाताई नागवडे यांच्या मार्गदर्शनाखाली या विद्यालयाची मोठी प्रगती होताना दिसते. असे सांगून श्री कुरुमकर यांनी विद्यालयाच्या पुढील जडणघडणीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत. प्रास्ताविकात मुख्याध्यापक दिलीपराव काटे यांनी विद्यालयाच्या प्रगतीचा आढावा सांगितला. आभार विद्यालयाचे जेष्ठ शिक्षक श्री साळुंखे सर यांनी उपस्थित आमचे आभार मानले यावेळी नागवडे कारखान्याचे संचालक डी आर आबा काकडे हे उपस्थित होते.

# सात दिवसांचा सांस्कृतिक सप्ताह



## खासदार नीलेश लंके यांची घोषणा : शिव-शाहू-फुले-आंबेडकरी विचार जनतेपर्यंत पोहोचविणार

कान्हूर पठार : (स. गांवकरी)

कान्हूर पठार येथे छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त आयोजित संयुक्त जयंती महोत्सवात खासदार नीलेश लंके यांनी पुढील वर्षापासून पारनेर तालुक्यातील प्रत्येक गावात सात दिवसांचा सांस्कृतिक सप्ताह आयोजित करण्यात येणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणा केली. नीलेश लंके प्रतिष्ठानच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या या सांस्कृतिक सप्ताहात इतिहास जागर, शिवव्याख्याने, कीर्तन, समाजप्रबोधनपर कार्यक्रम, युवकांसाठी मार्गदर्शन शिबिरे, कला-सांस्कृतिक स्पर्धा, महिला सहभाग उपक्रम तसेच सामाजिक ऐक्य वृद्धिंगत करणारे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. "महाराष्ट्र हा छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आहे. समाजात द्वेषाचे नव्हे तर विचारांचे राजकारण रुजले पाहिजे. गावागावांत सांस्कृतिक सप्ताहाच्या माध्यमातून पुरोगामी विचारांची पेरणी केली जाईल," असे खासदार लंके यांनी सांगितले. युवकांना केवळ राजकीय कार्यक्रमांपुरते मर्यादित न ठेवता त्यांना रोजगार, कौशल्य विकास, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन आणि स्वावलंबनाकडे नेण्यासाठी प्रतिष्ठानच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमात शिवव्याख्याते यशवंत यांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या इतिहासावर प्रभावी व्याख्यान देत उपस्थितांना प्रेरित केले. यावेळी मारुतीशेठ रेपाळे, सुदाम पवार, सतीश भालेकर, कांतीलाल भोसले, अर्जुन भालेकर, संजय लाकूडझोडे, बाळासाहेब कावरे, योगेश मते, गुंडा भोसले, रवींद्र राजदेव, लखन ठाणगे, अनिल गंधाक्ते, रामेश्वर निमसे, साळवे सर, किरण ठुबे, चंद्रभान ठुबे, धनंजय ठुबे, गणेश तांबे, राजू ठुबे सर, धनंजय व्यवहारे यांच्यासह संपूर्ण कान्हूर पठार टीम आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**रयत शिक्षण संस्थेचे महादजी शिंदे विद्यालय श्रीगोंदा ता - श्रीगोंदा जि - अहिल्यानगर.**

**-: टेडर नोटीस :-**

**लेबर कॉन्ट्रॅक्टर व मटेरियल सप्लायर नेमणेबाबत.**

आमच्या विदयालयाच्या जुना वाडा इमारतीची दक्षिण बाजूची जुनी संरक्षण भिंत पाडून त्या जागी नवीन भिंत बांधकाम करण्यासाठी अनुभवी लेबर कॉन्ट्रॅक्टर कडुन खोदाई करणे, आर.सी.सी, विट बांधकाम, प्लास्टर ई. सर्व सिव्हील कामे करणे यासाठी अनुभवी लेबर कॉन्ट्रॅक्टर कडुन रेट बंद लिफाफ्यामध्ये महादजी शिंदे विद्यालय श्रीगोंदा ता - श्रीगोंदा जि - अहिल्यानगर येथे देण्यात यावेत. सदर कामाचे कोरे टेंडर फॉर्म विद्यालय कार्यालयात किंवा ओम साई कन्सल्टंटस् आर्किटेक्टस् इंजिनिअर्स, १/२, गोवर्धन अपार्टमेंट आंबेडकर रोड अहिल्यानगर यांचे कार्यालयात दि. १९/०५/२०२६ ते २३ /०५/२०२६ पर्यंत रु. ५००/- भरुन मिळतील व भरलेले टेंडर फॉर्म दि. २५/०५/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत महादजी शिंदे विद्यालय श्रीगोंदा ता - श्रीगोंदा जि - अहिल्यानगर यांच्या ऑफिसमध्ये स्विकारण्यात येतील. टेंडर जमा करताना त्यासोबत रु. ३०००/- बयाना रक्कम भरावी लागेल वरील काम पुर्ण करण्याचा कालावधी १ महिने राहिल.

१) बांधकामासाठी लागणारे मटेरियल उदा :- वाळू, खडी, सिमेंट, स्टिल, विटा, पाणी, विदयालय पुरविणार आहेत.

२) बांधकामासाठी लागणारे मटेरियल :- वाळू, सिमेंट, स्टिल, विटा, खडी इत्यादीचे रेट बंद पाकीटामध्ये दयावेत.

३) कोणतेही टेंडर मंजूर करणे अथवा कारण न देता सर्व टेंडर नाकारणे याबाबत सर्व अधिकार रयत शिक्षण संस्थेने राखुन ठेवले आहेत.

**मुख्याध्यापक**
महादजी शिंदे विद्यालय श्रीगोंदा
ता - श्रीगोंदा जि - अहिल्यानगर
मोबाईल नंबर - ९४२३४६२७५८

# पावन गणपती मंदिरात महिलांचे ज्ञानेश्वरी पारायण सुरु

## आमदार विठ्ठलराव लंघे यांनी दिली भेट


नेवासा : (स. गांवकरी)

दर तीन वर्षांनी येणाऱ्या पुरुषोत्तम आधिक मासाच्या पवित्र महिन्याच्या निमित्ताने नेवासा येथील नेवासाफाटा रस्त्यावर असलेल्या जागृत अशा पावन गणपती मंदिरामध्ये पावन गणपती महिला भजनी मंडळाच्या वतीने ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायणाला भक्तिमय वातावरणात प्रारंभ करण्यात आला.यावेळी आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांनी भेट देऊन पारायणाला शुभेच्छा दिल्या. महिलांच्या ज्ञानेश्वरी पारायणाच्या निमित्ताने सर्व वाचक महिलांच्या हस्ते पावन गणपती बाप्पाच्या मूर्तीचे पूजन करून आरतीने ज्ञानेश्वरी पारायणाला शुभारंभ करण्यात आला.या पारायण सोहळयाच्या शुभारंभ प्रसंगी नेवासा तालुक्याचे आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांनी भेट देऊन महिलांच्या पारायण सोहळयाला शुभेच्छा दिल्या.यावेळी पावन गणपती देवस्थानचे अध्यक्ष



अँड.सुखदेव वाखुरे यांच्या हस्ते आ. लंघे यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी देवस्थानचे विश्वस्त व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते

सौ.विद्या कुलकर्णी,सौ.उज्वला कडू,सौ.मंजूळा झिंजुर्डे,ज्योती धाडगे,सौ.कुसुमताई चंद,सौ.शैला डिके, सौ.स्वाती चौधरी,श्रीमती कुमदिनी तांबे,श्रीमती इंदुमती राजगिरे,श्रीमती आशाबाई शिंदे,सौ.प्राजक्ता धाडगे या सर्व पावन गणपती महिला मंडळाच्या सेवेकरी पारायणाचे नेतृत्व करत आहे. आमदार लंघे यांच्या भेटी प्रसंगी दत्तात्रय महाराज व्यवहारे, जेष्ठ नेते शंकरराव लोखंडे,नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले पाटील,देवस्थान विश्वस्त अँड. अण्णासाहेब अंबाडे,संभाजीराव पवार,कडू पाटील,अँड.राहुल मुंगसे, नगरसेवक अंकुश म्हस्के,नगरसेवक महेश लोखंडे, नगरसेवक प्रविण सरोदे,कृष्णा परदेशी,संदीप सरकाळे, अनिल पवार यांच्यासह पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पावन गणपती मंदिराचे सेवेकरी दत्तात्रय गायकवाड यांनी उपस्थित भाविकांचे आभार मानले.



सापुतारा टेबल पॉइंट येथे रविवारी पर्यटकांच्या कारला अपघात झाल्याची घटना घडली. या अपघातात दोन लहान मुलांसह सात पर्यटकांचा सुदैवाने बचाव . मिळालेल्या माहितीनुसार, सुरत हून सुट्टीचा आनंद घेण्यासाठी सापुताऱ्यात आलेले पर्यटक कार क्रमांक GJ-19-BJ-9161 मधून टेबल पॉइंटकडे जात होते. टेबल पॉइंटच्या कठीण घाट चढणीवर कार अचानक पुढे जाऊ शकली नाही आणि रिव्हर्समध्ये मागे सरकू लागली.कार अचानक मागे येऊ लागल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि कार रस्त्यावरच पलटी झाली. अपघातानंतर परिसरात काही काळ गोंधळ आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

## थोडक्यात बातम्या...



### एस.बी.आय भिवंडी शाखेच्या तत्परतेमुळे विधवा महिलेला मिळाला विमा निधी

भिवंडी (स. गांवकरी) : पतीच्या दुर्दैवी निधनानंतर निराधार झालेल्या श्रीमती संगीता अंकुश म्हात्रे यांना स्टेट बँक ऑफ इंडिया, भिवंडी शाखेच्या तत्पर सेवेमुळे प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना (PMJJBY) व प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना (PMSBY) अंतर्गत विमा दावा रक्कम मिळाली आहे. कै. अंकुश म्हात्रे यांच्या आकस्मिक निधनानंतर त्यांच्या पत्नी श्रीमती संगीता म्हात्रे यांनी SBI भिवंडी शाखेशी संपर्क साधला. शाखेचे मुख्य व्यवस्थापक पवन सिंग निगम व उपशाखा व्यवस्थापक मनिषा अंशुमन घोलप यांनी तातडीने कागदपत्रांची पूर्तता करून घेऊन दोन्ही विमा योजनांचे दावे दाखल केले. बँकेच्या सहकार्यामुळे PMJJBY व PMSBY या दोन्ही योजनांची एकूण दावा रक्कम वारसदार संगीता म्हात्रे यांच्या खात्यात जमा झाली आहे. यावेळी संगीता अंकुश म्हात्रे यांनी SBI भिवंडी शाखेचे मुख्य व्यवस्थापक पवन सिंग निगम आणि उपशाखा व्यवस्थापक मनिषा अंशुमन घोलप यांचे आभार मानले. "दुःखाच्या काळात बँकेने माणुसकी दाखवून तत्पर मदत केली. त्यांच्या सहकार्यामुळे मला मोठा आधार मिळाला," अशी भावना त्यांनी व्यक्त केली.



### धन निरंकार सेवा सोहळ्यात डॉ. विश्वासराव आरोटे यांचा सत्कार!

ओतूर (स. गांवकरी) : पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील ओतूर येथे आयोजित करण्यात आलेल्या धन निरंकार सेवा सोहळ्यात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी सेवेकरी भक्त संप्रदाय व कार्यक्रमाचे आयोजक मनोज तांबे यांच्या हस्ते हा सत्कार करण्यात आला. समाजकार्य, पत्रकारिता आणि जनजागृती क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल डॉ. आरोटे यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमास निरंकारी भक्त, नागरिक व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### माळशेज नागरी सहकारी पतसंस्थेच्या देवठाण शाखेस मान्यवरांची सदिच्छा भेट

अकोले (स. गांवकरी) : राज्यातील सहकार क्षेत्रात नावलौकिक प्राप्त असलेल्या माळशेज नागरी सहकारी पतसंस्थेच्या देवठाण शाखेस काँग्रेसचे नेते तथा अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण समितीचे सभापती अजय फटांगरे, शरद पवार गट राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष चंद्रकांत घुले तसेच प्रगतशील शेतकरी मोहन फटांगरे यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी पतसंस्थेच्या वतीने मान्यवरांचा शाल, पुष्पगुच्छ व हरिपाठ देऊन सन्मान करण्यात आला. प्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष हरिभक्त परायण डुंबरे महाराज, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा प्रगतशील शेतकरी राजाभाऊ वाकचौरे उपस्थित होते. तसेच पतसंस्थेचे शाखाधिकारी भास्कर पथवे, समशेरपूर शाखाधिकारी राहुल आरोटे, गणोरी शाखाधिकारी प्रतिभा कदम, गुणवंत कर्मचारी गोकुळ येलमामे व बाळासाहेब मेंगाळ यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. सदिच्छा भेटीदरम्यान सहकार क्षेत्रातील विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

# उत्कृष्ट समाज घडवण्यासाठी 'पंच परिवर्तना'ची गरज : अतुल अग्निहोत्री

श्रीरामपूर : (स. गांवकरी)

"राष्ट्राचा आणि समाजाचा सर्वांगीण विकास साधायचा असेल, तर केवळ विचार करून चालणार नाही, तर प्रत्यक्ष कृतीची गरज आहे. आजचा समाज अधिक प्रगल्भ, संवेदनशील आणि सुदृढ बनवण्यासाठी 'पंच परिवर्तन' ही काळाची गरज आहे," असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत प्रचार प्रमुख अतुल अग्निहोत्री यांनी येथे केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त 'संघशताब्दी मंथन - परिवर्तनाच्या दिशेने' या जिल्हास्तरीय प्रमुखजनसंवाद कार्यक्रमाचे आयोजन रविवारी (ता. १७) श्रीरामपूर येथील निर्मळ संकुलात करण्यात आले होते. या वेळी मुख्य वक्ते म्हणून अतुल अग्निहोत्री ते बोलत होते. व्यासपीठावर संघाचे ज्येष्ठ प्रचारक लक्ष्मीनारायण भाला (दिल्ली) आणि उत्तर अहिल्यानगरचे जिल्हा



संघचालक किशोर निर्मळ उपस्थित होते. अग्निहोत्री यांनी आपल्या संबोधनात पंच परिवर्तनातील सामाजिक समरसता, पर्यावरण संवर्धन, कुटुंब प्रबोधन, स्व-बोध (स्वत्वाचा भाव) आणि नागरी शिष्टाचार या पाच मुख्य सूत्रांवर प्रकाश टाकला. हे विषय केवळ उपदेशाचे नसून, दैनंदिन जीवनात आणि समाजात त्यावर प्रत्यक्ष कृती कशी करता येईल, याची उदाहरणे त्यांनी दिली. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात त्यांनी उपस्थित मान्यवरांशी संवाद साधत विविध शंकांचे निरसन केले.

ज्येष्ठ प्रचारक लक्ष्मीनारायण भाला यांनी संघाच्या कार्यपद्धतीचा आणि विविध आयामांचा आढावा घेतला. भारतीय संस्कृतीतील 'वसुधैव कुटुंबकम्' या संकल्पनेचा संदर्भ देत त्यांनी देशाच्या उभारणीसाठी आणि प्रगतीसाठी प्रत्येक नागरिकाने राष्ट्रकार्यात सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. प्रारंभी, दीपप्रज्वलन आणि भारतमाता पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. उत्तर अहिल्यानगरचे जिल्हा प्रचार प्रमुख मंगेश भिडे यांनी प्रास्ताविक व उपस्थितांचे स्वागत केले. श्रीरामपूर तालुका प्रचार प्रमुख महेश तारगे यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला. या 'शताब्दी मंथन' कार्यक्रमाला उत्तर अहिल्यानगर जिल्ह्यातील पत्रकार, संपादक, साहित्यिक, शास्त्रज्ञ, कलावंत, कायदेतज्ज्ञ आणि सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्स मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हा संपर्कप्रमुख डॉ. प्रणव जोशी यांनी सूत्रसंचालन केले. मंगेश भिडे यांनी आभार मानले. जिल्हा सह बौद्धिक प्रमुख विजयराव ढोले व वाद्यवृंदाच्या सामूहिक 'वंदे मातरम' गायनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# तालुका प्रमुखपदी विजय गव्हाणे



राहुरी : (स. गांवकरी)

कट्टर शिवसैनीक विजय गव्हाणे यांची आज शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे)पक्षाचे राहुरी तालुक्याचे प्रभारी तालुका प्रमुख नियुक्ती करण्यात आली. या निवडीचे पत्र आज जिल्हाप्रमुख श्री राजेंद्र दळवी यांनी श्री विजय गव्हाणे यांना सुपुर्त केले. विजय गव्हाणे हे १९९३ पासुन शिवसैनीक म्हणुन काम केले असुन त्यांनी शहराध्यक्ष राहुरी कारखाना तसेच देवळाली प्रवरा ३२ गावे तालुकाप्रमुख म्हणुन काम पाहिले आहे. अंत्यत निष्ठावान,धाडसी तसेच लोकांचे मदतीला धावुन जाणारे व्यक्तीमत्व म्हणुन विजय गव्हाणे यांचा नावलौकिक आहे. त्यांची निष्ठा व काम लक्षात घेवुन त्यांची निवड केल्याचे जिल्हाप्रमुख श्री राजेंद्र दळवी यांनी नमुद करत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. श्री विजय गव्हाणे यांचे निवडीने निष्ठावंताला न्याय मिळाल्याचा भावना शिवसैनीक व्यक्त करत असुन संघटनेत नवचैतन्य निर्माण झाले आहे. या निवडीचेवेळी शिवसेनेचे दत्ता कडुपाटील , राहुल चौथे, बाळासाहेब शिंदे, सचिन लाटे विजय कुमावत तसेच सचिन मोरे हे उपस्थित होते. पक्ष बांधणी व पक्षसंघटन मजबुत करुन सर्वसामान्यांच्या मदतीसाठी अहोरात्र काम करण्याचे श्री विजय गव्हाणे यांनी यावेळी बोलताना सांगितले.

# वादळी वाऱ्याचा फटका; ९ पैकी २ सोलर पाट्या फुटल्या

वैजापूर : (स. गांवकरी)

वैजापूर तालुक्यातील लाख खंडाळा गावातील गट नंबर ७१ मधील शेतकरी इस्माईल गुलजार पठाण यांच्या शेतामध्ये बसविण्यात आलेल्या Shakti Pumps कंपनीच्या सोलर पाट्यांना जोरदार वाऱ्याचा फटका बसून ९ पैकी २ पाट्या फुटल्याची घटना १२/०५/२०२६ मंगळवार रोजी घडली. या घटनेमुळे शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून सौरऊर्जेवर चालणारी शेतीची व्यवस्था विस्कळीत झाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, परिसरात अचानक जोरदार वारे व ढगाळ वातावरण निर्माण झाले होते. वाऱ्याचा वेग वाढल्याने शेतातील सोलर पाट्यांच्या संरचनेला धक्का बसला. यामध्ये दोन सोलर पाट्या पूर्णपणे फुटल्या असून काही पाट्या हलल्या असल्याचेही सांगण्यात आले. तसेच लोखंडी फ्रेम व वायरिंगचे किरकोळ नुकसान झाले आहे. सदर सोलर यंत्रणा शासनाच्या योजनेअंतर्गत उभारण्यात आली होती. शेतकऱ्याने स्वतःचे आर्थिक योगदान देऊन ही सुविधा उभी केली



होती. मात्र नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्याने शेतकरी चिंतेत पडला आहे. सध्या उन्हाळी हंगामातील शेतीकामे सुरू असताना सौर पंप बंद पडल्याने पिकांच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. घटनेची माहिती संबंधित विभाग व कंपनी प्रतिनिधींना देण्यात आली असून नुकसानग्रस्त पाट्यांची पाहणी करून तातडीने नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी इस्माईल गुलजार पठाण यांनी केली आहे. ग्रामस्थांनीही घटनास्थळी भेट देऊन नुकसानाची पाहणी केली.

## धुळ्यात सलग दुसरे दुहेरी हत्याकांड

# भोंदूगिरीच्या नादात दोघांचा बळी?

धुळे : (स. गांवकरी)

धुळे जिल्ह्यातील साक्री तालुका पुन्हा एकदा दुहेरी हत्याकांडाने हादरला आहे. निजामपूर-जैताणे पोलीस स्टेशन हद्दीतील वर्धने-उभरांडी शिवारात दोन जणांचे मृतदेह आढळून आल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. प्राथमिक माहितीनुसार, या दुहेरी हत्याकांडामागे भोंदूगिरीचा प्रकार असल्याची चर्चा सुरू असून पोलिसांनी एका भोंदूबाबाला ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक १६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळच्या सुमारास भडगाव-वर्धाने टेंबे फाट्याजवळ एका विवाहितेचा मृतदेह आढळून आला. मृतदेहावर एमएच १८ सीएफ ८१५१ क्रमांकाची ॲक्सेस १२५ दुचाकी टाकण्यात आली होती. महिलेच्या तोंडाला रुमाल बांधलेला असल्याने प्रथमदर्शनी हा अपघात असल्याचा पोलिसांचा अंदाज होता. घटनास्थळी तपास करताच मृत महिलेची ओळख जयश्री रजनीकांत



काकुस्ते (वय २५, रा. कासारे) अशी पटली. जयश्री या बचत गटामार्फत बजाज फायनान्स कलेक्शनचे काम करत होत्या. घटनेपूर्वी रात्री त्यांचे पतीशी संभाषण झाल्याची माहिती समोर आली आहे. घटनास्थळी मोबाईल आणि पर्स आढळून आल्याने हा प्रकार लुटमारीसाठी नसल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

दरम्यान, निजामपूर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत काही मिनिटांतच योगेश भैय्या बापू खैरनार (रा. जैताणे) याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान संशयिताने दिलेल्या कबुलीत धक्कादायक माहिती समोर आली. “एका व्यक्तीकडून महिलेचा खून होत असल्याचे दिसल्याने मी तिला वाचवण्याचा प्रयत्न केला, त्यात त्या व्यक्तीचा माझ्याकडून खून झाला,” असे त्याने सांगितले.

संशयिताच्या कबुलीनुसार पोलिसांनी उमरांडी-जैताणे गोशाळा मठाजवळील टेकडीवरील निर्जन ठिकाणी शोधमोहीम राबवली. तेथे पुरलेला एका तरुणाचा मृतदेह हस्तगत करण्यात आला. मृत तरुणाची ओळख अक्षय सोनवणे (रा. भांडणे) अशी पटली.

संशयिताकडून मिळणारी उडवाउडवीची उत्तरे, महिलेच्या तोंडाला बांधलेला रुमाल, घटनास्थळी आढळलेली पर्स आणि दुचाकी या पुराव्यांमुळे पोलिसांचा संशय अधिक बळावला. या संपूर्ण प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन एसीपी अजय देवरे यांनी स्वतः घटनास्थळी लक्ष ठेवले होते.

फॉरेन्सिक टीम, एलसीबी, डॉग स्कॉड आणि निजामपूर पोलिसांच्या संयुक्त तपासातून या दुहेरी हत्याकांडाचा उलगडा झाला असून, भोंदूगिरीच्या अंधश्रद्धेतून हा प्रकार घडल्याचा संशय अधिक गडद झाला आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

# पित्याकडून शरणपूर वृद्धाश्रमातील वृद्धांना धोंडयाचे मिष्टान्न

नेवासा : (स. गांवकरी)

नेवासा तालुक्यातील देवगडफाटा येथील संतसेवक राजेंद्र गीते यांची पुणे येथील कन्या दीपालीताई गीते यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने स्त्री जन्माचे स्वागत उपक्रम म्हणून पित्याने रांजणगावदेवी फत्तेपुर रस्त्यावर असलेल्या शरणपूर वृद्धाश्रमातील वृद्धांना धोंड्या निमित्त मिष्टान्न भोजन देऊन आपल्या मुलीचा वाढदिवस साजरा केला.आजच्या काळात असे उपक्रम पुण्य प्राप्तीचे साधन असून याप्रसंगी वृद्धांनी दीपालीच्या दीर्घायुष्य जीवनासाठी प्रार्थना केली. शरणपूर येथे झालेल्या धोंडा जेवण कार्यक्रमात मातापिता



समान असलेल्या ३५ वृद्धांना यावेळी धोंडयासह मिष्टान्न भोजन देण्यात आले.यावेळी राजेंद्र गीते,युवा कार्यकर्ते स्वप्नील गीते,वृद्धाश्रमाचे संपर्क प्रमुख पत्रकार सुधीर चव्हाण,वृद्धाश्रम चालक रावसाहेब मगर,व्यवस्थापक संतोष मगर,पत्रकार बाळासाहेब पंडित,भोजन कक्ष प्रमुख सौ.ज्योतीताई मगर उपस्थित होते.

वृध्दाश्रम चालक रावसाहेब मगर म्हणाले की सद्याचे वाढदिवस तोफांची सलामी देत फटाक्यांची आतषबाजीने साजरे होतात मात्र राजेंद्र गीते व त्यांच्या परिवाराने वायफट खर्च बाजूला सारून कुटुंबातील भूषण असलेल्या दीपालीताई गीते यांचा जन्मदिन स्त्री जन्माचे स्वागत म्हणून अन्नदानाच्या माध्यमातून साजरा केला याबद्दल कौतुक केले. आपल्या कार्य कर्तृत्वाने दीपालीताई गीते यांनी पुणे मुळशी येथे डेव्हलपर्स कंपनीच्या माध्यमातून उंच भरारी घेतली ही बाब पित्यासाठी निश्चितच कौतुकास्पद असल्याचे पत्रकार सुधीर चव्हाण यांनी या उपक्रम प्रसंगी बोलतांना सांगितले. शासन अनुदान नसलेल्या व लोक सहभागातून मगर यांनी चालवलेल्या या वृद्धाश्रमाला दात्यांनी सढळ हाताने मदत करावी असे आवाहन यावेळी बोलतांना केले.व्यवस्थापक संतोष मगर यांनी आभार मानले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अॅड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

## थोडक्यात पण महत्वाचे




### खाजगी रुग्णालयांमध्ये "रुग्ण हक्कांची सनद" लावण्याची मागणी

ठाणे (स. गांवकरी) : ठाणे महानगरपालिका हद्दीतील सर्व खाजगी रुग्णालयांमध्ये "रुग्ण हक्कांची सनद" (चार्टर ऑफ पेशंट राईट्स) तसेच दरपत्रक दर्शनी भागात लावणे सक्तीचे करण्यात यावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार विशाल शांताराम कुरकुटे यांनी ठाणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडे निवेदनाद्वारे केली आहे. दिनांक १८ मे २०२६ रोजी आरोग्य अधिकारी, ठाणे महानगरपालिका यांना देण्यात आलेल्या निवेदनात अनेक खाजगी रुग्णालयांमध्ये रुग्ण हक्कांची माहिती दर्शनी भागात लावलेली नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे सर्वसामान्य रुग्णांना त्यांच्या हक्कांची माहिती मिळत नसून उपचार शुल्काबाबतही पारदर्शकता राहत नसल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार प्रत्येक खाजगी रुग्णालयाने "चार्टर ऑफ पेशंट राईट्स" व दरपत्रक दर्शनी भागात लावणे आवश्यक असल्याचे निवेदनात म्हटले आहे. तसेच या नियमांची तात्काळ अंमलबजावणी करून जे रुग्णालय नियमांचे पालन करीत नाहीत त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. या संदर्भात ठाणे महानगरपालिकेने गंभीर दखल घेऊन आवश्यक कार्यवाही करावी, अशी अपेक्षा विशाल कुरकुटे यांनी व्यक्त केली आहे.


### प्रवेशासाठी सुविधा केंद्रास मान्यता

भानसहिवरे (स. गांवकरी) : भानसहिवरे येथील बेल्हेकर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट तंत्रनिकेतन मध्ये प्रथम वर्षासाठी प्रवेश प्रक्रियेसाठी सुविधा केंद्रास महाराष्ट्र तंत्र शिक्षण मंडळाकडून शैक्षणिक वर्ष २०२६- २७ करिता मान्यता मिळालेली आहे. यंदाच्या प्रथम वर्ष पॉलिटेक्निक प्रवेशासाठी २० मे पासून ऑनलाईन प्रवेश सुविधा केंद्र सुरु करण्यात आले आहे विद्यार्थ्यांनी २० मे ते २२ जून पर्यंत ऑनलाईन नोंदणी करावी तसेच कागदपत्रांची पडताळणी करून घ्यावी याची माहिती प्राचार्य एच. जे. आहिरे यांनी दिली. पदवीकाच्या प्रथम वर्ष प्रवेशासाठी या सुविधा केंद्रात विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेश नोंदणी तसेच अभ्यासक्रमाची निवड करता येईल. विद्यार्थांना रजिस्ट्रेशन करणे, कागदपत्र पडताळणी करून देणे, ऑपशन भरणे यासाठी ज्ञानेश्वर पॉलिटेक्निक मध्ये सुविधा केंद्र FC5248 सुरु झाले आहे, तसेच येथे अद्ययावत संगणकीय साधन सामुग्री, पुरेशा क्षमतेने इंटरनेट सुविधा, प्रशिक्षित व योग्य संवाद साधणारा प्राध्यापक वर्ग इत्यादी बाबी आहेत. विद्यार्थिना याकेंद्रामार्फत त्यांचा कल आणि सध्या मागणी असलेल्या पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे सखोल मार्गदर्शन करण्यात येणार आहेत. तज्ज्ञ प्राध्यापक वर्गमार्फत जातीनिहाय संवर्गनुसार आवश्यक कागदपत्रे या संदर्भात सखोल माहिती येथे मिळणार आहे. राज्य माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत करण्यात येणाऱ्या अंतर्गत गुण मूल्यमापनाचा आधारे प्रवेश देण्यात येणार आहे. दहावीचा निकाल जाहीर झाल्याने ऑनलाईन पद्धतीने नोंदणी करताना आसन क्रमांक अनिवार्य असेल. पॉलिटेक्निक प्रवेशासाठी कुठल्याही प्रकारची सी.ई.टी. परीक्षा नसेल इच्छुकांनी बेल्हेकर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट तंत्रनिकेतन भानसहिवरे नेवासा येथे संपर्क साधावा. प्रवेशाकरिता सुविधा केंद्रामार्फत आवश्यक असणारे कागदपत्रे व इतर माहितीसाठीचे वेळोवेळी मार्गदर्शन करण्यात येईल याच विद्यालयामध्ये यंत्र अभियांत्रिकी, स्थापत्य अभियांत्रिकी, संगणक अभियांत्रिकी व इलेक्ट्रॉनिक्स अँड टेली कम्युनिकेशन इत्यादी शाखा २००९ पासून उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी 8308341675 वर संपर्क साधावा.

### रील स्टारवर जीवघेणा हल्ल्याचा प्रयत्न

अहिल्यानगर (स. गांवकरी) : शहरातील कल्याण रोड परिसरात रील स्टार तसेच 'रुबाब मेन्स वेअर'चे मालक सनी जाधव यांच्यावर दोन जणांनी जीवघेणा हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पूर्वीच्या वैमनस्यातून हा हल्ला करण्यात आल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. आरोपींनी गावठी कट्ट्यातून गोळीबार करण्याचा प्रयत्न केल्याचे सांगितले जात आहे. मात्र, त्याचवेळी परिसरात असलेल्या स्थानिक गुन्हे शाखेच्या कर्मचाऱ्यांनी तत्काळ धाव घेत आरोपींना ताब्यात घेतल्याने मोठा अनर्थ टळला. या प्रकरणी पोलिसांनी रवी साळुंखे आणि निखिल चव्हाण (रा. बोल्हेगाव, अहिल्यानगर) या दोघांना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडे अधिक चौकशी सुरू आहे. घटनेनंतर कल्याण रोड परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.





महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई. चे संस्थापक व माजी अध्यक्ष मा. संजय जी भोकरे सर यांना जिवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. त्यांच्या जिवीतास धोका आहे. यास्तव त्यांना पोलीस संरक्षण मिळावे यासाठी जामखेड तालुका. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई. च्या वतीने मा. तहसीलदार साहेब यांना निवेदन देण्यात आले. या वेळी अध्यक्ष. अपाधयक्ष. सचिव. कोषाध्यक्ष. सर्व श्री दताञय राऊत. अशोक विर. सुदाम वराट. अविनाश बोधले. किरण रेडे. पप्पु सय्यद. अजय अवसरे. सुजीत धनवे. सैफ सय्यद. राजू भोगील. इत्यादी पत्रकार उपस्थित होते. या वेळी अध्यक्ष दत्तात्रय राऊत भाषणात म्हणाले की.. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई. चे संस्थापक व माजी अध्यक्ष संजय जी भोकरे यांना जिवै मारण्याची धमकी दिली गेली आहे. त्यांच्या जिवीतास धोका आहे. यास्तव त्यांना पोलीस संरक्षण मिळावे. असि आग्रही मागणी केली. जामखेड येथील पत्रकारांची मागणी मा. तहसीलदार यांनी मा. जिल्हाधिकारी साहेब यांच्या पर्यंत पोहचावी. असि पत्रकारांनी मागणी केली आहे.

# महागणपती मल्टीस्टेटचा 'आंबा महोत्सव' उत्साहात संपन्न!

## १५ हजार सभासदांना रत्नागिरी हापूस आंब्याची गोड भेट; सभासदांमध्ये आनंदाचे वातावरण!

कोतुळ : (स. गांवकरी)

महाराष्ट्र व कर्नाटक राज्य कार्यक्षेत्र असलेल्या महागणपती मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीतर्फे आयोजित करण्यात आलेला 'आंबा महोत्सव २०२६' मोठ्या उत्साहात आणि आनंददायी वातावरणात संपन्न झाला. संस्थापक अध्यक्ष विकास बेंगडे पाटील व सहसंस्थापिका नीलम बेंगडे पाटील यांच्या संकल्पनेतून हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला.

संस्थेच्या प्रेफरन्स शेअर्स धारक सुमारे १५ हजार सभासदांना मधुर व रसाळ रत्नागिरी हापूस आंब्याची पेटी भेट देण्यात आली. या उपक्रमामुळे सभासदांमध्ये समाधान व आपलेपणाची भावना निर्माण झाली असून संस्थेच्या कार्यपद्धतीचे सर्वत्र कौतुक होत आहे. महागणपती मल्टीस्टेटच्या




कोतुळ शाखेचे योगेश जाधव संचालक

महाराष्ट्र व कर्नाटकातील ३० शाखांमार्फत ४० हजारांहून अधिक ग्राहकांना सेवा दिली जात आहे. संस्थेने नुकताच २५० कोटी रुपयांच्या ठेवींचा टप्पा पार करत ४०० कोटी रुपयांहून अधिक संमिश्र व्यवसाय साध्य केला आहे. संस्थेमार्फत सभासदांसाठी विविध कल्याणकारी योजना सातत्याने राबविण्यात येतात. प्रेफरन्स शेअर्स धारक सभासदांना उन्हाळ्यात हापूस आंब्याची भेट, दिवाळीत पुरुष सभासदांना घरगुती फराळ, महिला सभासदांना आकर्षक पैठणी साडी, तसेच आरोग्यवर्धिनी योजना व अपघाती विमा सुविधांचा लाभ दिला जातो. १ मे २०२६ पासून संस्थेच्या सर्व शाखांमध्ये आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. प्रत्येक शाखेत सभासदांचे आदरपूर्वक स्वागत करून त्यांना रत्नागिरी हापूस आंब्याची भेट देण्यात आली. "महागणपती मल्टीस्टेट ही केवळ आर्थिक संस्था नसून आपल्या कुटुंबाप्रमाणे काळजी घेणारी संस्था आहे," अशा भावना अनेक सभासदांनी व्यक्त केल्या.

यावेळी संस्थापक अध्यक्ष विकास बेंगडे पाटील यांनी सभासद, ठेवीदार, खातेदार, संचालक मंडळ, मुख्य कार्यकारी अधिकारी व कर्मचारी वर्ग यांच्या सहकार्यामुळे हा उपक्रम यशस्वी झाल्याचे सांगितले. सभासदांनी संस्थेवर दाखविलेल्या विश्वासाबद्दल त्यांनी आभार मानले. भविष्यात आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अधिक अत्याधुनिक आर्थिक सेवा उपलब्ध करून देण्याचा संस्थेचा प्रयत्न राहील, असे त्यांनी स्पष्ट केले.

मुख्य कार्यकारी अधिकारी समाधान सन्नके यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण आंबा महोत्सवाचे नियोजन करण्यात आले. सर्व शाखा व्यवस्थापक व कर्मचारी वर्ग यांनी हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

कोतूळ शाखेतील कर्मचारी रेश्मा झोळेकर, विजय भुजबळ, अक्षय जाधव, सपना लोखंडे, किशोर शिंगवाल व दिपाली पापळे यांनीही या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला.

> "महागणपती मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या कोतूळ शाखेमार्फत सभासदांना उत्कृष्ट सेवा, विश्वासार्ह सुविधा आणि विविध लाभ योजनांचा अधिकाधिक फायदा मिळवून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. सभासदांचे समाधान हेच आमचे खरे बळ आहे,"
> — योगेश जाधव, संचालक, महागणपती मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी, कोतूळ शाखा

## रावेर येथे १८ दिव्यांग जोडपे विवाहबध्द

रावेर: (स. गांवकरी)

रावेर दिव्यांग जनकल्याण बहुउद्देशीय संस्थेतर्फे आयोजित केलेल्या पहिला दिव्यांग सामूहिक विवाह सोहळा दिनांक 17 /5/2026 रविवार रोजी दत्तगुरु हॉल माऊली फार्म हाऊस रावेर येथे संपन्न झाला . त्यावेळी उपस्थित मान्यवर आमदार श्री अमोल भाऊ जावळे , नंदकिशोर महाजन लोकसभा प्रमुख , डॉक्टर संदीप पाटील माऊली हॉस्पिटल योगिता संदीप पाटील ,उद्योजक श्रीराम पाटील कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती प्रल्हाद भाऊ पाटील , नगराध्यक्ष संगीता महाजन , पद्माकर महाजन , दिव्यांग प्रतिनिधी मुकुंद गोसावी , जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्रप्रमुख एस पी गणेश कर साहेब ,जी टी महाजन सर ,सी एस पाटील सर , त्याच प्रमाणे रावेरच्या तहसिलदार मॅडम व मान्यवर हजर होते . तसेच दिव्यांगावर प्रेम करणारे सर्व कार्यकर्ते व पदाधिकारी दिव्यांग जनकल्याण बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष संजय दिनकर बुवा , उपाध्यक्ष घनश्याम प्रभाकर हरणकर , खजिनदार रजनीकांत शामराव बारी सचिव विशाल कासार संदीप पाटील , प्रवीन धनगर , दिलीप जैन कैलास महाजन , ज्योती रजनीकांत बारी ,विजय वारी रमेश एकनाथ चौधरी , बाळू महाजन विनोद चव्हाण , महेश महाजन पुंडलिक महाजन, योगेश महाजन , महेश गजेश्वर गजानन बारी , नारायण लोणारी , भूषण महाजन, प्रदीप परदेशी एडवोकेट रमाकांत महाजन , एडवोकेट योगेश चौधरी , एडवोकेट विनोद चौधरी , अशोक पाटील ,नाना मोची नितीन महाजन, मुन्ना चौधरी ललित कोल्हे ,आधी सर्व मान्यवर उपस्थित होते .

केसरी कट्टा , मित्रपरिवार उमाइ फाउंडेशन , सूर्यवंशी बारी समाज , रावेर व रावेर शहर तेली समाज पंचमंडळ , आधी सर्व मान्यवर उपस्थित होते .

## प्रियदर्शिनीच्या वाढदिवसाने जपली सामाजिक बांधिलकी

### प्रबोधनात्मक कीर्तन, गुणवंतांचा गौरव आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश

बिलोली : (स. गांवकरी)

तालुक्यातील मौजे दौलापूर येथे शनिवार, दि. १६ मे रोजी हनुमान मंदिर परिसरात कु. प्रियदर्शिनी (साऊ) बालाजी येलगंदरे हिच्या पहिल्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेला प्रबोधनात्मक कीर्तन, गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळा व वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला. वाढदिवसाचे औचित्य साधत समाजप्रबोधन, शिक्षणाचा गौरव आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा हा उपक्रम उपस्थितांच्या विशेष कौतुकाचा विषय ठरला. केवळ वाढदिवस साजरा न करता सामाजिक बांधिलकी जपत समाजहिताचा संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला.




कार्यक्रमाच्या प्रारंभी कु. प्रियदर्शिनी (साऊ) हिच्या अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. उपस्थित मान्यवर, नातेवाईक, मित्रपरिवार व ग्रामस्थांनी साऊला शुभाशीर्वाद देत कुटुंबावर शुभेच्छांचा वर्षाव केला. यावेळी वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. यानंतर गावातील व परिसरातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. माननीय आमदार जितेश रावसाहेब अंतापूरकर यांनी पत्राद्वारे कु. प्रियदर्शिनी हिला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. जिल्हा परिषद सदस्य गणेश पाटील शिंपाळकर यांच्या शुभहस्ते विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छदेऊन गौरव करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या यशाचा सन्मान होत असल्याने पालक व ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमातील प्रमुख आकर्षण ठरलेल्या प्रबोधनात्मक कीर्तनातून संत-महापुरुषांचे विचार, शिक्षणाचे महत्त्व, सामाजिक एकता, संस्कार आणि पर्यावरण संवर्धन यावर प्रभावी मार्गदर्शन करण्यात आले. कीर्तनातील सामाजिक संदेशांनी उपस्थितांना विचार करण्यास भाग पाडले. उपस्थितांनी कीर्तनाचा मनापासून आनंद घेतला.

कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून नागनाथ पाटील, लक्ष्मणराव शिरगिरे, हनुमंतराव मुंडकर पाटील, सूर्यकांत पाटील शिंदे, अभियंता राजू गोनेकर, बाबुराव बोधनकर सर, शिवराज शिंदे,कल्याण गायकवाड, नामदेव पाटील, गणपतराव पाटील, युसुफ शेख, अॅड. आकाश लघुळकर, रत्नदीप धोत्रे, लक्ष्मण मेहरेकर, बसवंन्ना बरबडे, साईनाथ छप्पेवार, शंकर सामंते, किरण बळगारे, कपिल पाटील हुंडेकर, अविनाश पाटील पतके, माधव पाटील यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साहेबराव डोंगरे (पोलीस पाटील) यांनी केले.

## छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात 'मॅग्लुमी' मशीनचे लोकार्पण

ठाणे : (स. गांवकरी)

सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशन आणि गोपाळराव पाटील शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या वतीने कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाला अत्याधुनिक अशा दोन `मॅग्लुमी ८०० व 'मॅग्लुमी' २००० सीएलआयए विश्लेषक' मशीन सीएसआर उपक्रमांतर्गत प्रदान करण्यात आल्या असून त्याचे लोकार्पण आज ठाणे मनपा सभागृह नेते हणमंत जगदाळे यांच्या हस्ते झाले. या मशीनमुळे रुग्णालयातील रक्त निदान क्षमता अधिक वेगवान आणि परिणामकारक होणार असून हजारो रुग्णांना त्याचा थेट लाभ मिळणार आहे.



यावेळी शिवसेना कल्याण जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, नगरसेवक मिलिंद पाटील, मा. नगरसेविका मनाली पाटील, नगरसेवक गणेश कांबळे, नगरसेवक योगेश जानकर, नगरसेविका चंद्रकांता साळवी, शाखाप्रमुख रवींद्र पाटील, समाजसेवक जगदीश भोईर, किशोर भोईर, मिलिंद सिन्नरकर, राधे वराडकर, निनाद बोराडे, रोहन शिंदे, मा. नगरसेवक सचिन म्हात्रे आदी उपस्थित होते.


'मॅग्लुमी' ८०० आणि 'मॅग्लुमी' २००० या दोन्ही मशीन पूर्णपणे स्वयंचलित (फुली ऑटोमेटिक) असून त्यांची तपासणी क्षमता अत्यंत वेगवान आहे. एका तासात सुमारे २०० चाचण्या करण्याची क्षमता या मशीनमध्ये आहे. तसेच एकाच वेळी ४० रुग्णांचे नमुने तपासता येणार आहेत. कर्करोग, थायरॉईड, ट्युमर यांसारख्या गंभीर आजारांच्या चाचण्या अधिक अचूक आणि जलद पद्धतीने करता येणार असल्याने रुग्णांच्या उपचार प्रक्रियेला मोठी मदत होणार आहे. हे रुग्णालय सर्व सुविधांनी परिपूर्ण असावे, अशी भूमिका राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची असल्याचे यावेळी सभागृह नेते हणमंत जगदाळे यांनी सांगितले. "डॉ. श्रीकांत शिंदे फाऊंडेशन आणि गोपाळराव पाटील शिक्षण प्रसारक मंडळ यांनी दिलेल्या या दोन मशीनमुळे रुग्णालयाची सेवा अधिक सक्षम होईल.

मात्र मशीन सातत्याने कार्यरत ठेवण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध व्हावे यासाठी आयुक्तांशी चर्चा करण्यात येईल, जेणेकरून नागरिकांना या सुविधेचा पूर्ण लाभ मिळू शकेल," असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## ९६ वर्षांच्या इतिहासात प्रथमच एमबँकेची विक्रमी कामगिरी

पुणे : (स. गांवकरी)

महाराष्ट्रातील विश्वासार्ह नागरी सहकारी बँकांपैकी एक असलेल्या एमबँक अर्थात द मुस्लिम सहकारी बँक लिमिटेड, पुणे यांनी आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये आपल्या ९६ वर्षांच्या इतिहासातील सर्वोत्तम कामगिरीची नोंद केली आहे. बँकेने यंदा प्रथमच ₹७०० कोटींहून अधिक ठेवींचा टप्पा पार करताना ₹११०० कोटींपेक्षा जास्त व्यवसाय केला असून शून्य एनपीए राखण्यातही यश मिळवले आहे. बँकेने दिलेल्या माहितीनुसार, आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये एमबँकेने ९६ वर्षांतील सर्वाधिक नफा नोंदवला असून मजबूत बॅलन्स शीट कायम राखली आहे. तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, डिजिटल सेवांचा विस्तार आणि ग्राहकांना अधिक जलद व सुलभ बँकिंग सुविधा उपलब्ध करून देण्याच्या धोरणामुळे ही कामगिरी शक्य झाल्याचे सांगण्यात आले.



- शून्य एनपीए, ₹७०० कोटींहून अधिक ठेवी; ₹११०० कोटींच्या व्यवसायाचा टप्पा पार

एमबँकेचे अध्यक्ष तन्वीर इनामदार म्हणाले, "९६ वर्षांच्या प्रवासात ग्राहक, शेअरधारक, संचालक मंडळ आणि कर्मचाऱ्यांनी आम्हाला दिलेला विश्वास अमूल्य आहे. त्यांच्या सहकार्यामुळेच आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये आम्ही सर्वोत्तम कामगिरी करू शकलो. या यशासाठी मी सर्वांचा मनापासून ऋणी आहे."

# वीज पुरवठ्याच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आंदोलन

- अधिकाऱ्यांना काळे फासण्याचा इशारा
- उन्हाळ्यात अधिकारी स्वतःची काळजी घेतात, जनतेची कधी घेणार? – संपत बारस्कर

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

शहरामध्ये कोणतीही पूर्वसूचना न देता विद्युत विभागाच्या वतीने वारंवार वीज पुरवठा खंडित केला जात असल्यामुळे भर उन्हाळ्यात नागरिक त्रस्त झाले आहेत. दिवसा आणि रात्री सतत होणाऱ्या वीजखंडितीमुळे नागरिकांना उष्माघाताचा त्रास सहन करावा लागत असून लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्णांचे मोठे हाल होत आहेत. वारंवार लाईट जात असल्यामुळे व्यावसायिकांचे आर्थिक नुकसान होत असून शहराचा पाणीपुरवठाही विस्कळीत होत आहे. या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने महावितरण विभागाविरोधात आंदोलन करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांनी अधीक्षक अभियंता रमेश कुमार पवार यांना निवेदन देत येत्या आठ दिवसांच्या आत वीज पुरवठ्याबाबत ठोस उपाययोजना न केल्यास कोणत्याही क्षणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने अधिकाऱ्यांना काळे फासण्यात येईल, असा तीव्र इशारा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांनी अधीक्षक अभियंता रमेश कुमार पवार यांना निवेदनाद्वारे दिला.



यावेळी नगरसेवक कुमारसिंह वाकळे, सुरेश बनसोडे, प्रकाश भागानगरे, प्राध्यापक माणिक विधाते, संभाजी पवार, साधना बोरुडे, रोहिणी अंकुश, सागर गुंजाळ, सुरज कोतकर, सुरत शिंदे, दीपक खेडकर, नितीन घोडके, रणजीत सत्रे, मनोज नन्नवरे, दीपक गांगर्डे, मारुती पवार, ऋषिकेश ताठे, शैलेश मते आदींसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संपत बारस्कर म्हणाले की, अहिल्यानगर शहरामध्ये दिवस-रात्र कोणतीही पूर्वसूचना न देता वीज पुरवठा खंडित केला जात आहे. भर उन्हाळ्यात नागरिक त्रस्त झाले असून अधिकारी मात्र एसी कार्यालयात बसून स्वतःची काळजी घेत आहेत. जनतेच्या हालअपेष्टांकडे दुर्लक्ष केले जात आहे. लाईट गेल्यामुळे व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान होत असून पाणीपुरवठाही विस्कळीत होत आहे.

नागरिकांनी वीजबिल एक दिवस जरी भरले नाही तर महावितरण विभाग तत्काळ कनेक्शन कट करतो. मात्र वारंवार होणारी ट्रिप लाईट सुरू करण्यासाठी विभागाकडे वेळ नसतो. त्यामुळे हा सर्व प्रकार जाणीवपूर्वक होत असल्याचे दिसून येते. ते पुढे म्हणाले की, "पावसाळ्यापूर्वी महावितरण विभागाने आवश्यक उपाययोजना कराव्यात. नागरिकांच्या तक्रारी तत्काळ सोडवण्यासाठी स्वतंत्र टोल फ्री नंबर जाहीर करावा. नागरिकांना योग्य सेवा देणे ही विभागाची जबाबदारी आहे. मात्र त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले जात आहे. येत्या आठ दिवसांत परिस्थितीत सुधारणा झाली नाही तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कोणतीही पूर्वसूचना न देता तीव्र आंदोलन करेल आणि संबंधित अधिकाऱ्यांना काळे फासण्यात येईल. निवेदनात पुढे म्हटले आहे की, "अहिल्यानगर शहर व उपनगरामध्ये वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे नागरिकांना मानसिक आणि शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे. उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये दिवसा तसेच रात्री होणाऱ्या वीजखंडितीमुळे उष्माघाताचा धोका वाढला आहे. ही गैरसोय महावितरण विभागाकडून जाणीवपूर्वक केली जात असल्याचे दिसून येते.

# दै. समर्थ गांवकरीमधील बातमीनंतर पोलिसांचा ॲक्शन मोड



किनवट : (स. गांवकरी)

"ऑपरेशन क्रॅक डाऊन" अंतर्गत किनवटमध्ये केवळ किरकोळ कारवाई होत असल्याचा प्रश्न उपस्थित करणारी "ऑपरेशन क्रॅक डाऊन की केवळ दिखाऊ कारवाई?" ही बातमी दिनांक १३ मे २०२६ रोजी दैनिक समर्थ गावकरी मध्ये प्रकाशित झाल्यानंतर किनवट पोलिसांनी अवैध धंद्यांविरोधात अचानक आक्रमक पवित्रा घेतल्याचे चित्र समोर आले आहे. या बातमीमध्ये जिल्हाभर मोठ्या कारवाया होत असताना किनवटमध्ये फक्त ५ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून "मोठी कारवाई" दाखवली जात असल्याचा सवाल उपस्थित करण्यात आला होता. त्यानंतर अवघ्या काही दिवसांत किनवट पोलिसांनी लागोपाठ तीन ठिकाणी धडक कारवाया करत जुगार, अवैध दारू निर्मिती आणि अन्य बेकायदेशीर व्यवहारांवर मोठा प्रहार केला आहे. त्यामुळे या कारवायांचा संबंध प्रसिद्ध झालेल्या वृत्ताशी जोडून पाहिला जात असून, परिसरात याची जोरदार चर्चा रंगली आहे.

दत्तनगर-गोकुंदा येथे जुगार अड्ड्यावर मोठी धाड

दि. १६ मे २०२६ रोजी रात्री ७.३५ वाजण्याच्या सुमारास दत्तनगर-गोकुंदा परिसरात सुरू असलेल्या "तिरट" जुगार अड्ड्यावर किनवट पोलिसांनी अचानक धाड टाकली. गौतम बेलाजी येरेकर यांच्या घरासमोरील टिनपत्र्याच्या शेडमध्ये हा जुगार सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. धाडीदरम्यान पोलिसांनी तब्बल ९ आरोपींना रंगेहात पकडले. आरोपींकडून रोख रक्कम, मोबाईल फोन, जुगार साहित्य आणि दुचाकी वाहने असा मोठा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जप्त मुद्देमाल : रोख रक्कम – ६४ हजार ९०० रुपये, ९ मोबाईल फोन – अंदाजे ७४ हजार रुपये, ५२ बदक छाप पत्ते, ६ दुचाकी वाहने – अंदाजे २ लाख ८५ हजार रुपये एकूण ४ लाख २३ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. या प्रकरणी किनवट पोलीस ठाण्यात गुरनं १०४/२०२६ अंतर्गत महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्याच्या कलम १२(अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भूलजा शिवारात अवैध हातभट्टीवर कारवा

याच दिवशी सकाळी किनवट पोलिसांनी मौजे भूलजा शिवारात आणखी एक मोठी कारवाई केली. वीटभट्टीजवळील झोपडीच्या अंगणात अवैधरित्या हातभट्टी दारूसाठी तयार करण्यात आलेले मोहफुलाचे रसायनयुक्त फसफस साठवून ठेवण्यात आल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. छापा टाकल्यानंतर पोलिसांना तीन मोठ्या प्लास्टिक टाक्यांमध्ये साठवलेले तब्बल ६०० लिटर फसफस आढळून आले. या फसफसाची किंमत अंदाजे ३६ हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणी नानंग गोबरा ढमाळ (रा. बोधडी खुर्द, ता. किनवट) याच्याविरोधात गुरन क्र. १०३/२०२६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

"लहान कारवाया"च्या टीकेनंतर पोलिसांची मोठी मोहीम

विशेष म्हणजे, काही दिवसांपूर्वी झालेल्या कारवाईत पोलिसांनी फक्त ८५ देशी दारूच्या बाटल्या आणि मटका साहित्य जप्त करून एकूण ५ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला होता. त्या तुलनेत आता लाखोंच्या मुद्देमालासह मोठे जुगार अड्डे उद्ध्वस्त होत असल्याने "पूर्वी अशा कारवाया का होत नव्हत्या?" असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, किनवट शहर आणि ग्रामीण भागात अवैध दारू, मटका, जुगार, गुटखा विक्री तसेच वाळू तस्करी यांसारखे धंदे अनेक वर्षांपासून उघडपणे सुरू आहेत. मात्र, यापूर्वी कारवाया प्रामुख्याने छोट्या विक्रेत्यांपुरत्याच मर्यादित असल्याचा आरोप होत होता. त्यामुळे आता सुरू झालेल्या धडक मोहिमेमुळे नागरिकांमध्ये समाधानासोबतच उत्सुकताही निर्माण झाली आहे.

### पोलिसांचा इशारा : "मोहीम सुरूच राहणार

पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या या कारवायांमुळे अवैध धंदे चालविणाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. "अवैध धंद्यांमुळे सामाजिक वातावरण बिघडते व युवक व्यसनाधीनतेकडे वळतात. त्यामुळे अशा व्यवसायांवर कठोर कारवाई सातत्याने सुरू राहील," असा स्पष्ट इशारा पोलिसांकडून देण्यात आला आहे. दरम्यान, "ऑपरेशन क्रॅक डाऊन" अंतर्गत आता खरोखर मोठ्या रॅकेटवर निर्णायक कारवाया होणार का, की ही मोहीम काही दिवसांपुरतीच मर्यादित राहणार, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### श्री विष्णुसहस्त्रनाम पठण, श्री विष्णू पुजा व याग सुरूवात

अहिल्यानगर (स. गांवकरी) : सनातन धर्मसभेच्या वतीने अधिकमासानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आजपासून सुरूवात झाली आहे. श्री विष्णुसहस्त्रनाम पठण,श्री विष्णू पुजा व यागास आज सकाळी ऑटोमोबाईल मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह अभिजीत दंडवते व सौ. कल्पना दंडवते यांच्या हस्ते प्रारंभ करण्यात आला . वे.शां.स. बंडोपंत धर्माधिकारी, वे.शां.स.उमेश वाळुंजकर , वे.शां.स बंडोपत मुळे. यांच्या मार्गदर्शनाखाली सदर कार्यक्रम सुरू झाला आहे. यावेळी निळकंठ देशमुख, दत्तोपंत पाठक आदी मान्यवर उपस्थित होते. सकाळी स्वस्ति पुण्यवाचन, , मातृका पूजन, सर्वता भद्रपीठ,नवग्रह, रुद्र कलश याची पूजा करून विष्णू याग प्रारंभ करण्यात आला. संध्याकाळी ६ ते ८ यावेळेत ह भ प सतिष कुलकणी व सहकारी यांचे संगीत गुरू चरित्र पारायण होत आहे ते २३ मेपर्यंत आहे जास्तीत जास्त भाविकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजकांनी केले आहे. ज्यांना कोणाला श्री विष्णुसहस्त्रनाम पठण,श्री विष्णू पुजा व यागाला बसायचं असेल त्यांनी वे.शां.स. चकारे मुळे, वे.शां.स. बंडोपंत धर्माधिकारी, वे.शां.स.उमेश वाळुंजकर, वे.शां.स.सोमनाथ मुळे, यांच्याशी संपर्क साधावा.

### रामायणाचार्य हभप घुगे महाराजांच्या राम कथेस प्रारंभ



अहिल्यानगर (स. गांवकरी) : छत्रपती संभाजीनगर रोडवरील सूर्यनगर येथील हरिहरेश्वर मंदिरात हभप श्री रामायणाचार्य श्रीनिवास महाराज घुगे (आळंदी देवाची) यांच्या रसाळ वाणीतून श्री रामायण कथा ज्ञानयज्ञ कथेचे आयोजन करण्यात आले असून त्याचा शुभारंभ दीप प्रज्वलनाने करण्यात आला. याप्रसंगी महापौर ज्योतीताई गाडे, नगरसेविका रोशनीताई त्र्यंबके, नगरसेवक निखिल वारे, आकाश त्र्यंबके तसेच सूर्यनगर परिसरातील नागरिक उपस्थित होते. सूर्यनगर परिसरातील सर्व नागरिक या सप्ताहाचे संयोजक असून श्रीराम कथा व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा सप्ताहाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. रोज सायंकाळी ५.३० ते ८.३० असे ३ तास संगीतमय रामकथेचे निरूपण हभप घुगे महाराज करीत आहेत. दररोज सकाळी ९ ते दुपारी १ पर्यंत ज्ञानेश्वरी पारायण हभप खंडेराव मगर यांच्या रसाळ वाणीतून होत आहे. दि. १५ मे ते २१ मे पर्यंत रामकथेतील दैनिक उत्सवामध्ये मंगलाचरण, वंदना प्रकरण, शिवपार्वती विवाह कथा, श्रीराम जन्मोत्सव, बाललीला, विश्वमित्र राम संवाद, अहिल्या उद्धार व धनुष्यबाण कथा, सीता स्वयंवर, वनगमन कथा, चित्रकूट निवास, श्रीराम भरत भेट - संवाद, सीता हरण, शाबरी कथा, सीता शोध, लंका दहन,सेतुबंध,राम रावण युद्ध, रामराज्याभिषेक असे कार्यक्रम होणार आहेत. श्रीराम कथा व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याची सांगता गुरुवार दि. २१ मे रोजी सायंकाळी ७ ते ९ हभप श्रीनिवास महाराज घुगे यांचे काल्याचे किर्तनाने होणार असून नंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होईल.तरी भाविकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन श्यामराव बुधवंत यांनी केले आहे. या कथेसाठी सिंध वादक कृष्णा महाराज व्यवहारे, तबलावादक पृथ्वीराज देशमुख, ताकभाते सर, तर हार्मोनियम सहगायक अजित गाडेकर, गणेश महाराज गायकवाड,सनई वादक राजेंद्र साळुंखे यांचे सहकार्य लाभत आहे.

## देवस्थान जमिनींसाठी नवा कुळकायदा

(स. गांवकरी)

शासनाने नुकतेच महाराष्ट्र देवस्थान ईनाम निर्मूलन प्रारुप अधिनियम, २०२६ नुसार देवस्थानांच्या ज्या जमिनी आणि स्थावर मिळकती आहेत, त्या, त्यातील कुळांना व भाडेकऱ्याना या मिळकती मालकी हक्काने त्यांच्या नावाने करून देण्याचे प्रस्तावित केले आहे. त्यानुसार असा कायदा झाला तर कुळांच्या ताब्यातील मिळकतींवर संबंधित देवस्थानांचा अथवा मठांचा मालकी हक्क संपुष्टात येणार आहे. या कायद्यानुसार मुद्रांक अधिनियमातील तरतुदीनुसार शिघ्रगणकातील मूल्यांकन तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे देवस्थान मिळकतींचे धारणा मूल्य (खरेदी किंमत) ठरवण्याचे अधिकार जिल्हाधिकार्यांना अथवा त्यांचे तर्फे प्राधिकृत अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. एक जानेवारी २०११ पूर्वी जे अधिकृत कब्जेदार, कुळ, मिरासदार त्या देवस्थान मिळकतींमध्ये नोंद होते त्यांना धारणा मूल्याचा भरणा केल्यावर अशी जमीन या कुळांना पूर्ण मालकी हक्काने देण्यात येणार आहे. प्रस्तावित कायद्यामध्ये अशीही तरतूद आहे की जर कोणी अनाधिकाराने देवस्थान मिळकतींचा कब्जा केला असेल त्याच्याकडून जिल्हाधिकारी ती मिळकत कागदोपत्री जप्त करणार. पण त्याने खरेदी मूल्य भरले तर ती मिळकत बेकायदेशीर कब्जेदाराचे नावाने मालकी हक्काने करून देण्यात येईल. सदर तरतुदी देवस्थानच्या मालकीच्या शहरातील अथवा रहिवासी भागात बांधकाम केलेल्या इमारतीमधील भाडेकऱ्यांना सुद्धा लागू होणार असल्याने भाडेकरूंच्या ताब्यातील घरे अथवा दुकाने त्यांना मालकी हक्काने देण्याचे प्रस्तावित आहे. इनाम हक्क निर्मूलन अधिनियमांतर्गत कोणतेही कायदेशीर मुद्दे उपस्थित झाले तर दिवाणी न्यायालयाकडे अथवा इतर सक्षम प्राधिकरणाकडे दाद मागता येणार नाही. त्यामुळे या प्रस्तावित कायद्यानुसार फक्त जिल्हाधिकारी अथवा त्यांचे तर्फे प्राधिकृत अधिकाऱ्यांना या बाबत पूर्ण निर्णय घेण्याचे अधिकार मिळणार आहेत.

सदर प्रारुप अधिनियमाबाबत संपूर्ण राज्यातील सर्व देवस्थानच्या वतीने कोणत्याही सूचना व हरकती असल्यास त्या संबंधित विभागीय आयुक्त कायालया कडे पाच जून २०२६ रोजी सायंकाळी पाच वाजेपर्यंत सादर करता येतील.

सुमारे ७० वर्षांपूर्वी खाजगी मालकीच्या जमिनी कुळांना मालकी हक्काने देण्यासाठी मुंबई कुळवहीवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ नुसार एक एप्रिल १९५७ हा कृषी दिन मानून त्या दिवसापासून कसले त्याची जमीन या तत्त्वानुसार जमिनीतील कुळांना नियंत्रित सत्ता प्रकाराने मालकी हक्क देण्यात आले होते. तसाच प्रकार आता देवस्थान जमिनींबाबत होणे प्रस्तावित आहे आहे. मात्र यावेळी पूर्ण हक्काने कुळांना व भाडेकऱ्यांना मालकी देण्यात येणार आहे.

- ॲड. शिवराज प्र. कदम जहागिरदार

## शनि मारुती मंदिराला आकर्षक विद्युत रोषणाई



अहिल्यानगर : (स. गांवकरी)

स्वयंभू शनि–मारुती देवस्थान येथे वैशाख कृष्ण अमावास्या, शनिवार आणि भगवान शनिदेवांचा जन्मोत्सव असा त्रिवेणी महापुण्यपर्वकाळ योग तब्बल १३ वर्षांनी जुळून आल्याने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शनि मारुती मंदिराला आकर्षक विद्युत रोषणाई तसेच शनि व मारुतीला मोगरा गजराची सजावट करण्यात आली होती. श्री रामचंद्र खुंट परीसरातील शनी गल्ली येथील प्राचीन स्वयंभू शनि–मारुती मंदिर भाविकांचे श्रद्धास्थान असल्याने भाविकांची सकाळपासूनच गर्दी होती.मंदिरात सकाळी ७ वाजता श्री शनि महाराजांच्या मुख्य गाभाऱ्यात सामूहिक महाअभिषेक, जलाभिषेक, पंचद्रव्याभिषेक, तैलाभिषेक तसेच जपअनुष्ठान करण्यात आले. त्यानंतर सकाळी ९ वाजता वे. शा. सं. चकोर मुळे गुरूजी व शनिमंदीर पुजारी ओम पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली व ११ वैदिक ब्रह्म वृंदाच्या मदतीने लघुरुद्राभिषेक, महापूजा व मध्याह्न आरती, होमहवन व पूर्णाहुतीने धार्मिक विधींची सांगता झाली. सायंकाळी ७ वाजता सूर्यास्तसमयी श्री शनिमहाराजांचा जन्मोत्सव सोहळा व महाआरती उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते करण्यात आली.शनि मंदिर पुजारी ओम पांडे यासह मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. महाप्रसाद व भंडाऱ्याचे वाटप झाले . रात्री हनुमान चालीसा पठण व भजन संध्या कार्यक्रम झाला. श्री शनि सेवा संघ तसेच सर्व सेवेकरी भक्तवृंद यांच्या वतीने सदर कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

## चणकापुर धरणात बुडून १८ वर्षीय तरुणाचा मृत्यू



कनाशी (स. गांवकरी)

कळवण तालुक्यातील चणकापुर धरण परिसरात कळवण नगरपंचायतीच्या पाणीपुरवठा विहिरीचे काम सुरू असलेल्या ठिकाणी पाण्याचा अंदाज न आल्याने बुडून १८ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. अभोणा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मयत तरुणाचे नाव धनराज नितीन महाले, वय १८ वर्षे, रा. गावठाण मानुर, ता. कळवण असे आहे. दि. १७ मे २०२६ रोजी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास धनराज हा आपल्या मित्रांसोबत चणकापुर धरणावर फिरण्यासाठी गेला होता.

- मित्रांसोबत फिरायला गेला असता घडली दुर्घटना
- चनकापूर धरणाला लागले ग्रहण दरवर्षी होताहेत अशा घटना

त्यावेळी धरण परिसरात कळवण नगरपंचायतीच्या पाणीपुरवठा विहिरीचे काम सुरू होते. या ठिकाणी धनराज पाण्यात उतरला असता पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने तो बुडाला. सदर घटनेची माहिती मिळताच अभोना पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली त्यानंतर रेस्क्यू टीमला पाचारण करण्यात आले तब्बल २४ तासांनंतर मृतदेह मिळून आला


त्यानुसार अभोणा पोलीस ठाणे अमृ. रजि. नं. १८/२०२६, भारतीय नागरीक सुरक्षा संहीता कलम १९४ प्रमाणे अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. घटनेचा तपास पोहवा/२२९४ एस. एम. चौधरी हे करत असून दाखल अंमलदार पोहवा/२६२४ एस. एस. वाघेरे आहेत. घटनास्थळी सपोनि योगिता कोकाटे यांनी भेट देऊन पाहणी केली. दि. १८ मे २०२६ रोजी या प्रकरणाची नोंद करण्यात आली.

### नागरिकांना आवाहन

चणकापुर धरण परिसरात पर्यटनासाठी येणाऱ्या तरुणांची संख्या मोठी आहे. मात्र धरणातील पाण्याची खोली व धोकादायक ठिकाणांची माहिती नसल्याने अशा दुर्घटना घडतात. नागरिकांनी व विशेषतः तरुणांनी पाण्यात उतरताना काळजी घ्यावी, खोल पाण्याचा अंदाज नसल्यास पाण्यात उतरू नये, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. तसेच काम सुरू असलेल्या ठिकाणी सूचना फलक लावण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## अक्षय कर्डिले यांची आमदारपदी निवड झाल्याबद्दल सत्कार

- स्व. शिवाजीराव कर्डिले साहेबांनी जपलेली विकासाची परंपरा पुढे नेण्याचा मी पूर्ण प्रयत्न करेन - आमदार अक्षय कर्डीले



अहिल्यानगर : (स. गांवकरी)

अक्षय कर्डिले यांची आमदारकी पदी निवड झाल्याबद्दल सत्कार भाजपा कार्यालयीन मंत्री मुकुल गंधे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी व्यंकटेश कुलकर्णी , रोहन भुजबळ , अभिषेक नरसाळे, अजिंक्य गुरावे आदी उपस्थित होते. नुकत्याच राहुरी पोट निवडणुकीत विजयी होऊन अक्षय कर्डिले हे आमदार झाल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. शिर्डी येथे होणाऱ्या अखिल भारतीय विद्यार्थी परिषदे च्या कार्यक्रमास येण्याचे निमंत्रणही देण्यात आले. सत्कार ला उत्तर देताना अक्षय कर्डिले म्हणाले, दहावी व बारावीचा यशस्वी मुलांचे अभिनंदन जे काही मदत लागेल ती करण्यास मी तयार आहे हीच पिढी भारताचे भविष्य आहे तरुण पिढी शिकली तरच भारत देश पुढे जाईल. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद करत असलेले काम आदर्शवत आहे. ते पुढे म्हणाले "राहुरी तालुक्यातील जनतेने माझ्यावर दाखवलेला विश्वास हा माझ्यासाठी खूप मोठा सन्मान आणि जबाबदारी आहे. स्व. आमदार शिवाजीराव कर्डिले साहेबांनी आयुष्यभर जनतेची सेवा केली, विकासाची कामे केली आणि सर्वसामान्य माणसाशी नाळ जोडून ठेवली. त्यांचा आशीर्वाद आणि जनतेचे प्रेम यामुळेच मला हा विजय मिळाला आहे. हा विजय माझा नसून राहुरी तालुक्यातील प्रत्येक कार्यकर्त्याचा, ज्येष्ठांचा, माताभगिनींचा आणि युवकांचा आहे. निवडणुकीत सर्वांनी अहोरात्र मेहनत घेतली, त्याबद्दल मी मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. पुढील काळात राहुरीच्या विकासासाठी प्रामाणिकपणे काम करणार असून शिक्षण, पाणी, शेती, रस्ते आणि रोजगार या प्रश्नांना प्राधान्य देणार आहे. स्व. शिवाजीराव कर्डिले साहेबांनी जपलेली विकासाची परंपरा पुढे नेण्याचा मी पूर्ण प्रयत्न करेन. जनतेच्या विश्वासाला कधीही तडा जाऊ देणार नाही आणि सर्वसामान्यांच्या सेवेसाठी सदैव उपलब्ध राहीन."

## अहिल्यानगर महानगरपालिकेच्या सफाई कामगार महिलेला मारहाण

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

महानगरपालिकेच्या सफाई कामगार महिलेला घरात बोलावून घेऊन त्यांच्यावर हल्ला करत गैरवर्तन केल्याची घटना समोर आली आहे. या हल्ल्यात पीडित ३१ वर्षीय महिला जखमी झाल्या असून त्यांच्यावर रूग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांनी दिलेल्या जबाबावरून तोफखाना पोलीस ठाण्यात चार महिलांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. येथील वारूळाचा मारूती परिसरात राहणाऱ्या चार महिलांविरूध्द शनिवारी (१६ मे) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची घटना १३ मे रोजी दुपारी १२ वाजताच्या सुमारास घडली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिला महानगरपालिकेत सफाई कामगार म्हणून काम करतात. त्या आपले काम संपवून घरी परतल्या असता, संशयित आरोपी महिला तेथे आली व माझ्या बहिणीच्या घरात चल असे म्हणून फिर्यादीला घरामध्ये नेले. फिर्यादी महिला तिथे गेल्या असता, तुझे आधारकार्ड माझ्या पतीच्या मोबाईलमध्ये कसे आले. या कारणावरून वाद उकरून काढण्यात आला. आधारकार्डचा जाब विचारत तिथे उपस्थित असलेल्या चार संशयित महिलांनी फिर्यादीला मारहाण केली. हा वाद इतक्यावरच थांबला नाही, तर संशयित महिलांनी फिर्यादीचे कपडे फाडून त्यांना जमिनीवर पाडले. डोके जमिनीवरील फरशीवर आदळून जखमी केले. लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. महिलांनी संगनमत करून फिर्यादीला विवस्त्र करत त्यांची विटंबना केली आणि शिवीगाळ करून लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले. या हल्ल्यानंतर फिर्यादी महिलेला तातडीने उपचारासाठी रूग्णालयात दाखल करण्यात आले. रूग्णालयात उपचार सुरू असताना पीडितेने तोफखाना पोलिसांकडे आपला जबाब नोंदवला.

## कापूस पिक विम्याच्या प्रतीक्षेत किनवट तालुक्यातील शेतकरी हवालदिल



### कृषी विभागाची उदासीनता; विमा कंपन्यांवरही संताप

किनवट : (स. गांवकरी)

खरीप हंगाम २०२५-२६ मध्ये अतिवृष्टी, अनियमित पाऊस, रोगराई व उत्पादन घट यामुळे किनवट तालुक्यातील कापूस उत्पादक शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. शासनाच्या पीक विमा योजनेत सहभाग घेऊनही अद्याप कापूस पिकाचा विमा मिळालेला नसल्याने शेतकरी प्रचंड चिंतेत असून अनेक कुटुंबांवर आर्थिक विवंचनेची वेळ आली आहे. विशेष म्हणजे सोयाबीन पिकाचा विमा काही प्रमाणात वितरित झाल्याची माहिती असताना कापूस विम्याबाबत मात्र प्रशासनाकडून स्पष्टता दिली जात नसल्याने संताप व्यक्त होत आहे. या संदर्भात तालुका कृषी अधिकारी चंद्रकांत निमोड यांच्याशी दूरध्वनीवर संपर्क साधून विचारणा करण्यात आली असता, "सोयाबीनचा भेटला, कापसाचा पाहू... मी मिटिंगमध्ये आहे," अशी उडवाउडवीची उत्तरे देण्यात आली. शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर जबाबदार अधिकाऱ्यांकडून अशी अनुत्साही व निष्काळजी भूमिका घेतली जात असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. गेल्या हंगामात तालुक्यातील अनेक भागांमध्ये कापूस पिकाचे मोठे नुकसान झाले होते. सुरुवातीला पावसाअभावी पिके करपली, तर नंतर अचानक झालेल्या मुसळधार पावसामुळे बोंड सड, गुलाबी बोंडअळी व इतर रोगांनी कापसाचे मोठे नुकसान झाले. उत्पादन खर्च वाढलेला असताना बाजारात कापसाला अपेक्षित दर मिळाला नाही. अशा परिस्थितीत पीक विमाच शेतकऱ्यांसाठी शेवटचा आधार होता; मात्र तोही अद्याप मिळालेला नाही. तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी बँक कर्ज, सावकारी व खाजगी उसनवारी करून शेती केली होती. विमा रक्कम मिळाल्यास पुढील हंगामाची तयारी करता येईल, अशी अपेक्षा होती; मात्र विमा कंपन्यांची संथ गती आणि कृषी विभागाचा ढिसाळ पाठपुरावा यामुळे शेतकरी अडचणीत आले आहेत. अनेकांना बँकांचे हप्ते, खत-बियाण्यांचे देणे आणि घरखर्च भागविणेही कठीण झाले आहे.

शेतकऱ्यांचा आरोप आहे की, पीक विमा काढताना मोठ्या प्रमाणात प्रचार केला जातो, ऑनलाइन नोंदणीसाठी शेतकऱ्यांना त्रास दिला जातो, बँक खात्यातून प्रीमियम तत्काळ कापला जातो; मात्र नुकसानभरपाई देण्याची वेळ आली की विमा कंपन्या आणि प्रशासन दोघेही हात झटकतात.

विमा मंजुरी, पंचनामे, अहवाल व वितरण प्रक्रियेत नेमका अडथळा कुठे आहे, याबाबत कोणतीही पारदर्शक माहिती दिली जात नसल्याने संशय वाढत आहे. कृषी विभागाने शेतकऱ्यांना स्पष्ट माहिती देणे, विमा कंपन्यांशी समन्वय साधून प्रलंबित विमा तत्काळ वितरित करणे आणि तालुकानिहाय स्थिती जाहीर करणे आवश्यक असताना अधिकारी मात्र बैठका व कागदी प्रक्रियांमध्ये व्यस्त असल्याचे चित्र दिसत आहे. शेतकरी संघटनांनीही या प्रश्नावर तीव्र आंदोलनाचा इशारा दिला असून, "पीक विमा ही शेतकऱ्यांची मदत नसून त्यांचा हक्क आहे," अशी भूमिका घेतली आहे.

दरम्यान, किनवट तालुक्यातील हजारो कापूस उत्पादक शेतकरी अजूनही विम्याच्या प्रतीक्षेत असून, प्रशासन व विमा कंपन्या नेमकी जबाबदारी कधी स्वीकारणार? असा संतप्त सवाल शेतकरी वर्गातून उपस्थित केला जात आहे.

# मोबाईलवरून थेट पोलिसांपर्यंत तक्रार

## नाशिक ग्रामीण पोलिसांचे 'Rakshak AI' ठरतंय नागरिकांचे डिजिटल संरक्षण कवच

नाशिक : (स. गांवकरी)

आजच्या डिजिटल युगात तंत्रज्ञानामुळे अनेक गोष्टी अधिक वेगवान, सुलभ आणि परिणामकारक होत आहेत. याच आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत नाशिक ग्रामीण पोलिसांनी नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी एक महत्त्वपूर्ण आणि लोकहिताचा उपक्रम सुरू केला आहे. "Rakshak AI" या कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित चॅटबॉटच्या माध्यमातून आता नागरिकांना थेट आपल्या मोबाईलवरून पोलिसांपर्यंत तक्रार पोहोचविणे शक्य झाले आहे. विशेष म्हणजे, यासाठी पोलिस स्टेशनमध्ये प्रत्यक्ष जाण्याची गरज भासत नाही.

ग्रामीण भागात अनेकदा छोट्या-मोठ्या घटना, बेकायदेशीर प्रकार किंवा सामाजिक समस्या यांची माहिती वेळेवर पोलिसांपर्यंत पोहोचत नाही. काही नागरिक भीतीपोटी किंवा गोपनीयतेच्या कारणामुळे तक्रार करण्यास धजावत नाहीत. परिणामी अनेक घटना दडपल्या जातात किंवा वेळेवर कारवाई न झाल्याने गंभीर स्वरूप धारण करतात. मात्र आता "Rakshak AI" मुळे ही परिस्थिती बदलताना दिसत आहे.

हा AI चॅटबॉट वापरण्यास अत्यंत सोपा असून सर्वसामान्य नागरिकांनाही सहज समजेल अशा पद्धतीने विकसित करण्यात आला आहे. मोबाईलच्या माध्यमातून काही मिनिटांतच कोणतीही माहिती किंवा तक्रार पोलिस प्रशासनापर्यंत पोहोचविता येते. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिक आणि पोलिस यांच्यातील संवाद अधिक सुलभ आणि वेगवान होत असल्याचे चित्र आहे.

या प्रणालीतील सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे "Confidential Complaint Feature". या सुविधेमुळे नागरिकांनी दिलेली माहिती अत्यंत सुरक्षित पद्धतीने थेट वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचते. विशेष बाब म्हणजे, तक्रारदाराची ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवली जाते. त्यामुळे नागरिक कोणत्याही दबावाशिवाय, भीतीशिवाय आणि निर्धास्तपणे माहिती शेअर करू शकतात.

गावातील भांडणे, छेडछाड, अपघात, संशयास्पद हालचाली, अवैध धंदे तसेच इतर सामाजिक समस्यांची माहिती आता नागरिक सहजपणे "Rakshak AI" वर नोंदवू शकतात. नाशिक ग्रामीण पोलीस विभाग या तक्रारींवर सातत्याने लक्ष ठेवून तातडीने कारवाई करत असल्याने नागरिकांमध्ये या डिजिटल उपक्रमाबद्दल विश्वास वाढत आहे.

याचे ताजे उदाहरण म्हणजे, गेल्या आठवड्यात एका गावातून काही व्यक्तींकडून बेकायदेशीर दारू विक्री सुरू असल्याची गोपनीय माहिती "Rakshak AI" वर प्राप्त झाली होती. या माहितीची तातडीने दखल घेत नाशिक ग्रामीण पोलिसांनी

■ गोपनीय तक्रारींपासून अवैध धंद्यांवरील कारवाईपर्यंत 'Rakshak AI' ची प्रभावी कामगिरी

संबंधित ठिकाणी धाड टाकून पुढील गैरप्रकार रोखण्यासाठी कारवाई केली. या घटनेमुळे गावकऱ्यांमध्ये या प्रणालीबाबत सकारात्मक भावना निर्माण झाली असून, पोलिसांपर्यंत माहिती पोहोचविण्यासाठी हा एक सुरक्षित आणि विश्वासार्ह मार्ग असल्याचे अधोरेखित झाले आहे.

ग्रामीण भागातील नागरिक आणि पोलिस प्रशासन यांच्यातील दरी कमी करून परस्पर विश्वास दृढ करण्यासाठी "Rakshak AI" महत्त्वाची भूमिका बजावत आहे. तक्रार नोंदविण्याची सुरक्षित, जलद आणि गोपनीय व्यवस्था उपलब्ध करून देत हा उपक्रम केवळ तांत्रिक नव्हे, तर सामाजिकदृष्ट्याही अत्यंत उपयुक्त ठरत आहे.

या अभिनव आणि लोकहिताच्या तंत्रज्ञानाच्या उभारणीत नाशिकचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक आदित्य मिर्खेलकर (IPS), IP Cyber नागेश मोहिते, तसेच KK Wagh टीममधील निरज बावा, सौरभ शिंदे, श्रीनाथ कदम, यश वडनेरे आणि ओम निकम यांचे विशेष योगदान लाभले आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत त्यांनी विकसित केलेले हे तंत्रज्ञान ग्रामीण भागासाठी एक सकारात्मक आणि प्रभावी पाऊल ठरत असल्याचे बोलले जात आहे.

आजच्या काळात तंत्रज्ञानाचा वापर केवळ मनोरंजनापुरता मर्यादित न ठेवता समाजहितासाठी आणि सुरक्षिततेसाठी केला जाणे ही काळाची गरज आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे



## भारतीय लहुजी सेना या सामाजिक संघटनेमध्ये सहभागी व्हा

मुखेड (स. गांवकरी) : मुखेड येथील शासकीय विश्राम ग्रहामध्ये भारतीय लहुजी सेना कार्यकर्ता आढवा बैठक मोठ्या उत्साहात पडली या बैठकीमध्ये नवनिर्वाचित पदाधिकारी यांची निवड करण्यात आली कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून लाभलेले मानवी हक्क अभियानाचे तुकाराम गुरुजी बारहाळीकर, यांच्या अध्यक्षतेखाली ही आढावा बैठक घेण्यात आली या बैठकीमध्ये नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार व सन्मान करण्यात आला यावेळी भारतीय लहुजी सेनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष मा. रंजीत बारहाळीकर, तसेच भारतीय लहुजी सेनेचे गणपत गायकवाङ, भारतीय लहुजी सेनेचे सल्लागार मा.प्रसराम गवाले, मराठवाडा युवा उपाध्यक्ष ,विकास अंधुरे, अमोल वाघमारे, सोशल मीडियाचे जिल्हाध्यक्ष अनिल कावडे, लहुजी सेनेचे तालुका अध्यक्ष आत्माराम गायकवाड, यां सर्वांच्या उपस्थितीमध्ये ही बैठक घेण्यात आली. भारतीय लहुजी सेनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष रणजित बाराहळीकर, यांनी मातंग समाजाच्या जवलंत समस्यावर प्रकाश टाकत ते पुढे म्हणाले की मातंग समाजाचे अनेक प्रश्न आहेत ते सुटले पाहिजे मातंग समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे अनेक ठिकाणी मातंग समाजावर अन्याय अत्याचार होत आहेत ते थांबले पाहिजेनं जे गायरानधारक आहेत अशा लोकांचा सातबारा झाला पाहिजे असे बरेचसे काही मुद्दे आहेत जोपर्यंत आमचे प्रश्न सुटणार नाहीत तोपर्यंत आमची संघटना स्वस्त बसणार नाही असा इशाराही त्यांनी या सरकारला दिला आहे. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक पत्रकार, प्रशांत पवित्रे, यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्र संचालन ऍड प्रमोद कांबळे, यांनी केले तर या बैठकीचे आयोजन भारतीय लहुजी सेनेचे सर्व कार्यकरते यांनी केले.

## सुशिक्षित बेरोजगारांसाठी उद्योग उभारणीची सुवर्णसंधी

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : राज्यातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींना उद्योग व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रोत्साहन देणारी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP) ही महत्वाकांक्षी योजना जिल्हा उद्योग केंद्र व ग्रामोद्योग मंडळामार्फत ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत पात्र अर्जदारांना उद्योग उभारणीसाठी 50 लाख ते 1 कोटी रुपयांपर्यंतच्या प्रकल्पांना अनुदान दिले जाते. जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र युवक-युवतींनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अमोल इंगळे यांनी केले आहे. महाराष्ट्र शासनाने शहरी व ग्रामीण भागातील वाढती सुशिक्षित बेरोजगारांची संख्या लक्षात घेऊन स्वयंरोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी ही योजना सुरू केली आहे. उत्पादन, सेवा व कृषीपूरक उद्योग व्यवसायांसाठी ही योजना लागू आहे.

## देगलूर येथील अपंग प्रशिक्षण केंद्रात ३० जून पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : दिव्यांग कल्याण आयुक्तालय पुणे यांच्यामार्फत शासन मान्यता प्राप्त तुळजा भवानी अपंग प्रशिक्षण केंद्र देगलूर या संस्थेत म.रा. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण परीक्षा मंडळ मुंबई मार्फत मान्यताप्राप्त अभ्यासक्रमासाठी 18 ते 40 वयोगटातील दिव्यांग, अस्थिव्यंग, मुकबधीर, अंध, मतिमंद, मुला-मुलींना प्रवेश देण्यात येत आहे. या प्रशिक्षण केंद्रात विद्युत तारतंत्री, सर्व्हिसिंग ऑफ इलेक्ट्रीक डोमेस्टिक ऍप्लायसेंस, मोबाईल रिपेअरिंग अँड सर्व्हिसिंग, फीटर, एलिमेंट ऑफ कॉम्प्युटर इंजिनिअरींग, कॉम्प्युटर ऑपरेशन विथ एम.एस.ऑफिस, डेस्क टॉप पब्लिशिंग (DTP) कॉम्प्युटर अकौंटिंग व ऑफिस ऑटोमेशन व अगरबत्ती, खडु, धुप बनवणे इत्यादी अभ्यासक्रमांना प्रवेश देण्यात येत आहे. इच्छूक दिव्यांग, अस्थिव्यंग, मुकबधीर, अंध, मतिमंद मुला-मुलींनी किंवा पालकांनी 30 जून 2026 पर्यंत प्राचार्य तुळजा भवानी अपंग प्रशिक्षण केंद्र, भायेगाव रोड, देगलूर जि. नांदेड येथे पत्रव्यवहार करावा किंवा समक्ष भेटावे. अधिक माहितीसाठी मो. 9960900369, 9403207100, 7378641136 वर संपर्क साधावा, असे आवाहन कर्मशाळा अधिक्षक तुळजा भवानी अपंग प्रशिक्षण केंद्र देगलूर यांनी केले आहे.

## निमगाव तर्फे म्हाळुंगे येथे पत्नीला ठार मारले : पतीला अटक

शिवनेरी (स. गांवकरी) : निमगाव तर्फे म्हाळुंगे येथे नवनाथ बाजीराव पारखे वय ४३वर्ष रा.निमगाव तर्फे म्हाळुंगे याने पत्नी रूपाली नवनाथ पारखे वय ३५ वर्षे हिला शेतातील गोठ्यात नेऊन ठार मारले आहे. सदर घटनास्थळी धनंजय पाटील उपविभागीय पोलीस अधिकारी व किरण अवचर पोलीस निरीक्षक भेट दिली. या घटनेबाबत रुपालीचा भाऊ विकास वसंत पवार रा. बल्लाळवाडी याने जुन्नर पोलीस स्टेशन येथे खबर दिली की , माझी बहिण रुपाली नवनाथ पारखे हिला शेतातील गोठ्यात नेवुन तिचा दोन्ही हाताने गळा दाबला . त्यानंतर तिला जीवे ठार मारुन टाकुन पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. माझ्या बहिणीला गोठ्यातील खंडी पाईपाला लटकावुन तिने गळा गळफास घेतला असे भासवले आहे. या घटनेबाबत स्टेशनने नवनाथ बाजीराव पारखे यांच्या विरुध्द तक्रार रजिस्टर नंबर १४३ / २०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०३[ १] , २३८ प्रमाणे पुन्हा दाखल करण्यात आला आहे . या घटनेचा तपास पोलीस निरीक्षक किरण अवचर यांच्या मार्गदर्शनाखाली स . पो .नि . गटकूळ पुढील तपास करीत आहेत.

## ठाणे महानगरपालिकेतील शिवसेना गटनेता कार्यालयाचे उद्घाटन



ठाणे (स. गांवकरी) : ठाणे महानगरपालिकेतील शिवसेना पक्षाच्या गटनेता कार्यालयाचे उद्घाटन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याहस्ते आज मोठ्या उत्साहात संपन्न झाले. या कार्यालयातून नागरिकांचे प्रश्न सोडवण्याचे काम होईल असा विश्वास याप्रसंगी शिंदे यांनी बोलताना व्यक्त केला. ठाण्याने शिवसेनेला कायम साथ दिली असून, ठाण्याच्या विकासासाठी शिवसेना कटिबद्ध आहे. शहरात आज मेट्रोसह विविध विकासकामे वेगाने सुरू असल्याचे याप्रसंगी नमूद केले. या कार्यालयांच्या माध्यमांतून पक्षाच्या सर्व नगरसेवकांनी जनतेसाठी कार्यरत राहावे असे आवाहन यावेळी शिंदे यांनी केले. वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे ठाण्यावर विशेष प्रेम होते आणि ठाण्याने शिवसेनेला मोठे करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यामुळे शिवसेनेच्या माध्यमातून ठाणेकरांसाठी काम करताना, नव्याने निवडून आलेल्या नगरसेवकांना जुन्या नगरसेवकांनी मार्गदर्शन करावे असा सल्लाही याप्रसंगी शिंदे यांनी दिला.

# तालयज्ञ २०२६ कार्यशाळेतून लय-तालाचे संस्कार


नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

नांदेड येथे आयोजित करण्यात आलेल्या 'तालयज्ञ २०२६' या तबला-पखवाज कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. तालयोगी तबला विद्यालयाचे संचालक व प्रख्यात तबलावादक प्रशांत गाजरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या तीन दिवसीय कार्यशाळेत नांदेड, परभणी व लातूर येथील सुमारे ४० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. तबलावादनातील लय, ताल, गणित, व्याकरण आणि रियाज यांचा सखोल अभ्यास विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष सरावातून करून घेण्यात आला. प्रारंभिक स्तरावरील विद्यार्थ्यांपासून ते अलंकारपर्यंतचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना एकत्रितपणे शिकविताना प्रशांत गाजरे यांनी दाखविलेली तळमळ आणि समर्पण उपस्थितांच्या मनाला भिडणारे ठरले. कार्यशाळेत कायदा, रेला, तिहाई, दिव्य संकीर्ण, तिश्र जाती, चतुःश्र जाती, निकास, बल यांसारख्या तबल्यातील विविध पैलूंवर मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांकडून तासनतास अक्षरांचा रियाज, लयकारीचे गणित आणि समेवर येण्याचे प्रत्यक्षिक करून घेताना निर्माण होणारा रोमांचक अनुभव सर्वांसाठी संस्मरणीय ठरला. तबल्याचे गणित आणि व्याकरण हाच त्याचा आत्मा असून तो विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे हा कार्यशाळेचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. तबला, पखवाज आणि कथ्थक नृत्य या तिन्ही कलांचा सुंदर संगम या कार्यशाळेत अनुभवायला मिळाला. संगीत ही गुरु-शिष्य परंपरेतून हृदयातून हृदयात पोहोचणारी विद्या असून त्यासाठी दोघांचेही समर्पण महत्त्वाचे असते, असा सूर मान्यवरांनी व्यक्त केला. या उपक्रमामुळे तबल्याचा प्रचार-प्रसार निश्चितच वाढेल, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला.

# खासदारांचा फोन जाताच गुत्तेदार लाईनवर

अर्धापूर : (स. गांवकरी)

गेल्या सहा महिन्यांपासून संथ गतीने काम झालेला व रखडलेला रस्त्यामुळे त्रस्त झालेल्या तालुक्यातील पिंपळगांव महादेव येथील ग्रामस्थांच्या संयमाचा अखेर बांध सुटला. लग्नसराईत गावकऱ्यांना आणि पाहुण्यांना मोठी कसरत करावी लागली तर इतकेच नव्हे तर एका निष्पाप बालकाला गंभीर दुखापतही झाली. मात्र ढिम्म प्रशासनाला जाग येत नसल्याचे पाहून गावकऱ्यांनी थेट वरून सुत्रे हलवली. खासदार तथा माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या दरबारात तक्रार पोहोचताच दुसऱ्याच मिनिटाला चक्र फिरली आणि रडतखडतलेल्या रस्त्याचे काम सायंकाळी सुरूवात झाली.



रखडलेला रस्ताचे काम सुरू

पिंपळगांव महादेव येथील मुख्य रस्त्याचे काम गेल्या सहा महिन्यांपासून अत्यंत संथ गतीने चालू होते. संबंधित गुत्तेदाराने रस्त्यावर गिट्टी टाकलेली काम रखडल्याने ती तशीच उघडी सोडून दिली होती. त्यामुळे संपूर्ण रस्त्याची चाळण झाली असून वाहनचालकांना अक्षरशः तारेवरची कसरत करावी लागत होती. सध्या लग्नसराईचे दिवस असल्याने गावात पाहुण्यांची मोठी वर्दळ होती. गावकऱ्यांनी गुत्तेदाराला हात जोडून विनंती केली बाबा रे लग्नकार्य आहेत रस्ता नीट कर. पण गुत्तेदाराने याकडे साफ दुर्लक्ष केले. गुत्तेदाराच्या या मनमानीचा फटका एका पाहुण्या कुटुंबाला बसला. गावात लग्नसोहळ्यासाठी आलेल्या एका पाहुण्यांची दुचाकी या उखडलेल्या गिट्टीवरून घसरली. या भीषण अपघातात एक निष्पाप बालक गंभीर जखमी झाला. या घटनेमुळे पिंपळगांवच्या ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली. अखेर आता विनंत्या पुरे थेट कारवाई हवी असा पवित्रा गावकऱ्यांनी घेतला. ग्रामस्थांनी थेट खासदार अशोकराव चव्हाण यांची भेट घेतली. त्यांनी गुत्तेदाराच्या कारभाराचा पाढाच चव्हाणांसमोर वाचला. खासदारांनी प्रकरणाचे गांभीर्य ओळखून तात्काळ संबंधित यंत्रणेला आणि गुत्तेदाराला कडक शब्दांत सुनावले. असता ज्या रस्त्याकडे गुत्तेदार ढुंकूनही पाहत नव्हता त्याच रस्त्यावर त्याच दिवशी सायंकाळी डांबर, खडी आणि मजुरांचा ताफा हजर झाला आणि काम युद्धपातळीवर सुरू झाले.

# शेतकऱ्यांचे भोकर येथे अमरण उपोषण सुरू



भोकर : (स. गांवकरी)

रेणापूर सुधा बृ.ल.पा. तलाव प्रकल्पासाठी भूसंपादित करण्यात आलेल्या जमिनीचा उर्वरित ७० टक्के मावेजा तात्काळ द्यावा तसेच शेतकऱ्यांसाठी रस्ता व पुलाची सुविधा उपलब्ध करून द्यावी, या प्रमुख मागण्यांसाठी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी सोमवार दि.१८ मे २०२६ पासून भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी भोकर यांच्या कार्यालयासमोर अमरण उपोषण सुरू केले आहे. प्रकल्पासाठी बोरगाव, किन्हाळा, थेरबन, बटाळा, रेणापूर व सोमठाण या सहा गावांतील ३७.०७ हेक्टर जमीन संपादित करण्यात आली असून एकूण २३ कोटी ३४ लाख रुपयांचा मावेजा निश्चित करण्यात आला होता. मात्र, यापैकी केवळ ३० टक्के रक्कम देण्यात आली असून उर्वरित १५ कोटी ३७ लाख रुपये अद्यापही प्रलंबित असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. दरम्यान, प्रस्तुत प्रकरणी उर्वरित रक्कम संबंधित शेतकऱ्यांना मिळावी यासाठी विद्यमान आमदार श्रीजया चव्हाण यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याशी पत्रव्यवहारही केला आहे आणि मंत्री महोदयांनी त्यास प्रतिसाद देत उर्वरित रक्कम लवकरच जमा करण्याचे आश्वासनेही दिले. परंतु अद्यापही त्यांनी आश्वासनाची पूर्तता केलेली नाही तसेच संपूर्ण मावेजा न देता जमीन ७/१२ वरून कमी करण्यात आल्याने शेतकऱ्यांमध्ये संताप व्यक्त होत आहे. खरीप हंगाम तोंडावर असताना प्रलंबित मावेजा, रस्ता व पुलाच्या प्रश्नामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.

नईमोद्दीन शेख, बालाजी वनलवाड, प्रशांत शिवेवार, मोहम्मद रेहान कुरेशी, मारोती देवकर यांच्यासह अनेक शेतकरी उपोषणात सहभागी झाले असून मागण्या तातडीने मंजूर न झाल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

तसेच सदरील उपोषणा विषयी सर्व संबंधितांना प्रस्तुत निवेदनाच्या प्रती देण्याचा आल्या असून निवेदनावर प्रकल्पग्रस्त शेतकरी उत्तम बाबळे,तानाजी शिवेवार,गणपत चिलेवार, प्रशांत शिवेवार, अब्दुल रहीम अब्दुल करीम, शेख नईमुद्दीन हमीद मिया, गोदावरीबाई नाईकवाडे,दत्ता नवटक्के,मारुती देवकर,माधव देवकर, दिलीप सूर्यवंशी, शिवाजी, हुबेवाड,समीउल्ला बेगअ. बेग, बालाजी वनलवाड, सुरेश आरकलवाड, नारायण आरकलवाड यासह आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत

# २० मेच्या औषध विक्रेता बंद दरम्यान रुग्णांची गैरसोय होऊ नये

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

अखिल भारतीय औषध विक्रेता संघटनेने (AIOCD) देशभरात तसेच राज्यात बेकायदेशीररीत्या इंटरनेट फार्मसीद्वारे होणारी ऑनलाईन औषध विक्री, ई-पोर्टल तसेच GSR 817(E) दि. 28 ऑगस्ट 2018 आणि कोविड संदर्भातील GSR 220(E) दि. 26 मार्च 2020 हे आदेश मागे घेण्याच्या मागणीसाठी 20 मे रोजी एक दिवसीय देशव्यापी बंद पुकारला आहे. या पार्श्वभूमीवर रुग्णांची गैरसोय टाळण्यासाठी नांदेड शहरासह तालुका व ग्रामीण भागातील केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनला आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कोणत्याही रुग्णाला औषधांच्या उपलब्धतेबाबत अडचण निर्माण होऊ नये, यासाठी आवश्यक व्यवस्था ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच जिल्हा परिषदेचे जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय नांदेड, नांदेड-वाघाळा महानगरपालिका आरोग्य विभाग तसेच डॉ. शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय प्रशासनालाही त्यांच्या औषध भांडारात पुरेसा औषधसाठा उपलब्ध ठेवण्याबाबत कळविण्यात आले आहे. बंदच्या कालावधीत गरजू रुग्णांना औषधे उपलब्ध न झाल्यास अथवा अत्यावश्यक औषधांची गरज भासल्यास त्यांनी अन्न व औषध प्रशासन कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त (औषधे) अ. तु. राठोड यांच्याशी भ्रमणध्वनी क्रमांक 8369027068 वर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच नागरिकांनी आवश्यक औषधे आगाऊ खरेदी करून ठेवावीत, जेणेकरून संभाव्य गैरसोय टाळता येईल, असेही अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त अ.तु. राठोड यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# ऑनलाईन औषध विक्रीविरोधात २० मे रोजी औषध विक्रेत्यांचा देशव्यापी बंद




पुणे : (स. गांवकरी)

बेकायदेशीर ऑनलाईन औषध विक्री आणि कॉर्पोरेट कंपन्यांकडून होत असलेल्या अव्यावसायिक स्पर्धेविरोधात अखिल भारतीय औषध विक्रेता संघटनेने (AIOCD) दि. 20 मे 2026 रोजी देशव्यापी बंदची घोषणा केली आहे. देशभरातील सुमारे 12.50 लाख औषध विक्रेते या बंदमध्ये सहभागी होणार असल्याची माहिती संघटनेचे पुणे अध्यक्ष संदीप पारख यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी संघटनेचे पुणे सेक्रेटरी अनिल बेलकर, खजिनदार रोहित करपे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. अधिक माहिती देताना पारख म्हणाले, औषध व्यवसाय हा Drugs and Cosmetics Act 1940 आणि Rule 1945 अंतर्गत नियंत्रित केला जातो. मात्र ऑनलाईन औषध विक्रीसंदर्भात अद्याप स्पष्ट कायदेशीर तरतूद नसताना देशभरात मोठ्या प्रमाणावर ऑनलाईन विक्री सुरू आहे. याविरोधात दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल असून न्यायालयाने ऑनलाईन औषध विक्रीस स्थगिती दिलेली असतानाही सरकारकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

# बीएसएचने नवीन श्रेणी केली लाँच

पुणे : (स. गांवकरी)

होम अप्लायन्सेस उद्योगातील जागतिक आघाडीची कंपनी बीएसएच हाऊसगेरेट जीएमबीएच ची उपकंपनी असलेल्या बीएसएच होम अप्लायन्सेस प्रायव्हेट लिमिटेड'ने आपल्या टॉप लोड वाशिंग मशीन विभागातील वाढीला गती देण्यासाठी नवीन श्रेणी लाँच केली आहे. कंपनीने ७ किलो ते १२ किलो क्षमतेच्या बॉश टॉप लोड वाशिंग मशीन वॉशिंग मशीन्ससह आपल्या पोर्टफोलिओचा विस्तार केला आहे. हा लॉन्च भारतातील सर्वात मोठ्या आणि वेगाने वाढणाऱ्या लॉन्ड्री विभागांपैकी एक असलेल्या टॉप लोड वॉशिंग मशीन सेगमेंटमध्ये बॉशच्या धोरणात्मक विस्ताराचे प्रतीक आहे. किफायतशीर ते प्रीमियम किंमत श्रेणीपर्यंत




पसरलेल्या नव्या ऑटोमॅटिक टॉप लोड पोर्टफोलिओद्वारे, बॉश चे उद्दिष्ट या श्रेणीचा स्वीकार अधिक वेगाने वाढवणे तसेच उच्च-वॉल्यूम टॉप लोड वाशिंग मशीन बाजारातील आपली उपस्थिती अधिक मजबूत करणे आहे. उद्योग अहवालांनुसार, सोयीसुविधा, प्रीमियम अनुभव आणि स्मार्ट फीचर्सकडे वाढता कल टॉप लोड वाशिंग मशीनच्या स्वीकाराला वेग देत आहे. अधिक सक्षम पोर्टफोलिओ, प्रगत तंत्रज्ञान आणि विविध किंमत श्रेणींमध्ये वाढलेली उपलब्धता यांच्या जोरावर, बीएसएच भारतातील टॉप लोड वाशिंग मशीन सेगमेंटमधील पुढील वाढीच्या टप्प्यावर आक्रमकपणे भक्कम पकड निर्माण करण्यासाठी सज्ज आहे. भारतामधील बीएसएचच्या लॉन्ड्री व्यवसायाला मिळत असलेल्या मजबूत गतीच्या पार्श्वभूमीवर हा विस्तार करण्यात आला आहे. २०२६ च्या पहिल्या तिमाहीत, बॉश ने ऑटोमॅटिक टॉप लोड विभागात मागील वर्षाच्या तुलनेत दमदार दुहेरी अंकातील वाढ नोंदवली. याचबरोबर, सर्व विक्री चॅनेल्समधून मिळालेल्या मजबूत प्रतिसादामुळे एकूण लॉन्ड्री व्यवसायातही तब्बल ५० टक्क्यांची उल्लेखनीय वाढ नोंदवण्यात आली.

लाँचच्या निमित्ताने बोलताना बीएसएच होम अप्लायन्सेसचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, सैफ खान म्हणाले, "भारतातील लाँड्री श्रेणी वेगाने विकसित होत आहे आणि बीएसएच होम अप्लायन्सेस एक भक्कम आणि अधिक संतुलित पोर्टफोलिओसह या बदलाचे नेतृत्व करण्यासाठी सज्ज आहे.

आमच्या टॉप लोड श्रेणीच्या विस्तारासह, आम्ही प्रीमियम बॉश तंत्रज्ञान विविध किंमतींच्या पर्यायांमध्ये उपलब्ध करून देत आहोत. याद्वारे आम्ही वेगाने वाढणाऱ्या टायर 2 आणि टायर 3 शहरांमधील ग्राहकांपर्यंत पोहोचत आहोत, जिथे सेमी-ऑटोमॅटिककडून फुली ऑटोमॅटिक मशीन्सकडे वळण्याचे प्रमाण वेगाने वाढत आहे."

# थोडक्यात पण महत्वाचे



## जनजागृती कार्यशाळेला डॉ. सुधा कांकरिया यांचे मार्गदर्शन

अर्धापूर (स. गांवकरी) : ग्रामीण रुग्णालयाच्या वतीने 'स्त्री जन्माचे स्वागत करा' या कार्यक्रमात जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेस प्रमुख मार्गदर्शक म्हणून पीसीपीएनडीटी स्टेट सुपरवायजरी बोर्ड सदस्या डॉ. सुधा कांकरिया उपस्थित होत्या. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून नगराध्यक्षा सौ. वैशालीताई देशमुख, नगरसेविका सौ. डॉ.पल्लवीताई लंगडे,चेअरमन प्रवीण देशमुख, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.श्रीकांत देसाई, डॉ.उत्तमराव इंगळे,ग्रामीण रुग्णालयाच्या अधिक्षीका डॉ.विद्या झिने,डॉ.युवराज डाहाळे,डॉ.विशाल लंगडे, डॉ.आनंद शिंदे आदी सह अनेक मान्यवर उपस्थित होते.उपस्थीत मान्यवरांच्या सत्कार ग्रामीण रुग्णालयाच्या वतीने करण्यात आला. यावेळी बोलतांना डॉ.सुधा कांकरिया म्हणाला की या चळवळीअंतर्गत ११ कलमी कार्यक्रम राबवून स्त्री जन्माचे नुसते स्वागत नको प्रत्येक घरोघरी जाऊन मानसिकता बदलण्यासाठी जनजागृती करणे गरजेचे आहे.तसेच स्त्री भ्रुण हत्या प्रतिबंध कायद्याची अंमलबजावणी व मुलगी जन्माचे स्वागत कशा पद्धतीने केले पाहिजे यासाठी प्रखरभुमीका घेण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन उपस्थितांना डॉ.सुधा कांकरिया यांनी केले आहे.यावेळी अनेक मान्यवरांची संमोचित भाषणे झाली. या कार्यशाळेस आरोग्य विभागाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांना,अंगणवाडी सेविका,आशा वर्कर्स यांच्या सह अनेकांची उपस्थिती होती.



## भारतराव सोले पाटील यांच्याशी डॉ. विश्वासराव आरोटे यांची चर्चा!

अहिल्यानगर (स. गांवकरी) : अहिल्या नगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे जनसंपर्क अधिकारी तथा केडर जिल्हा संघटनेचे मुख्याधिकारी भारतराव सोले पाटील यांची नुकतीच सदिच्छा भेट घेण्यात आली. मैत्रीपूर्ण स्वभाव आणि सहकार क्षेत्रातील अभ्यासू व्यक्तिमत्व म्हणून ओळख असलेल्या सोले पाटील यांच्याशी विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या भेटीदरम्यान सहकार चळवळीची सध्याची स्थिती, केडर सचिवांच्या कामकाजात पारदर्शकता आणण्यासाठी सुरू असलेले प्रयत्न तसेच संघटनात्मक कामकाज अधिक प्रभावी करण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. या भेटीत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे आणि दैनिक समर्थ गांवकरी समूहाचे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर यांनी भारतराव सोले पाटील यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

# पूरनियंत्रणासाठी ठोस कृती आराखड्याची

## राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांची मागणी

पुणे : (स. गांवकरी)

पावसाळा तोंडावर आलेला असताना पुणे शहरातील पूरनियंत्रणासाठी प्रशासनाने नेमके कोणते नियोजन केले आहे, याची स्पष्टता आवश्यक आहे. मुळा-मुठा नदी सुधार प्रकल्पाच्या सुरू असलेल्या कामांमुळे नदीची वहनक्षमता कमी होत असून, त्यामुळे पुराचा धोका वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या प्रकल्पामुळे अधिकृत सोसायट्या व घरांना फटका बसणार नाही, यासाठी प्रशासनाने विशेष खबरदारी घ्यावी, अशी मागणी राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी केली. पुणे जिल्हा नियोजन समितीची बैठक शुक्रवारी पार पडली. या बैठकीत खासदार कुलकर्णी यांनी पुणे शहर व जिल्ह्यातील विविध प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले. नदीपात्रातील




भरावामुळे पावसाळ्यात पाणी सोसायट्यांमध्ये शिरण्याची भीती व्यक्त करत, दरवर्षी पुराचा फटका बसणाऱ्या वसाहतींसाठी प्रशासनाने ठोस कृती आराखडा जाहीर करावा, अशी मागणी त्यांनी केली. नसरापूर येथील घटनेच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील शाळा, सार्वजनिक ठिकाणे, बसस्थानके तसेच गर्दीच्या भागांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्यासाठी विशेष निधीची तरतूद करावी, अशी मागणी त्यांनी केली. सीसीटीव्हीच्या मदतीने आरोपीचा शोध लागल्याचे उदाहरण समोर आले असल्याने महिला व विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठी ही यंत्रणा प्रभावी ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले. शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी तसेच सार्वजनिक स्वच्छतेच्या दृष्टीने स्वच्छतागृहे, पिण्याच्या पाण्याच्या सुविधा आणि अन्य मूलभूत सोयींसाठी निधी वाढविण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. 'जेंडर बजेट' अंतर्गत महिला व विद्यार्थिनींसाठीच्या सुरक्षाविषयक उपाययोजनांमध्ये वाढ करण्याची मागणीही त्यांनी केली. पुणे शहर व ग्रामीण भागातील शासकीय जागांवरील अतिक्रमणांचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला. दर्गे, मजारी तसेच अन्य धार्मिक अतिक्रमणे आणि वक्फ नोंदींच्या संदर्भातील प्रश्नांवर प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली. जिल्ह्यातील युनेस्को वारसा स्थळे, गड-किल्ले आणि ऐतिहासिक वास्तूंवरील अतिक्रमणे रोखून त्या ठिकाणी आवश्यक सुविधा, दुरुस्ती आणि विकासकामांसाठी वाढीव निधी उपलब्ध करून द्यावा, असेही त्यांनी बैठकीत सांगितले. शहर आणि परिसरातील टेकड्या फोडण्याच्या वाढत्या प्रकारांबाबत चिंता व्यक्त करत त्यांनी अवैध उत्खनन, बेकायदेशीर बांधकामे आणि पर्यावरणीय हानी रोखण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याची मागणी प्रशासनाकडे केली.

# उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी केला मेट्रोने प्रवास

पुणे : (स. गांवकरी)

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधून विधान परिषदेवर निवडून द्यायच्या १७ जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर होताच राज्यभर निवडणूक आचारसंहिता लागू झाली. याची माहिती पुणे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेदरम्यान पदाधिकाऱ्यांना मिळाली. आचारसंहिता लागू झाल्यानंतर शासकीय वाहनांचा वापर थांबवून ती प्रशासनाकडे जमा करणे बंधनकारक असते. याच पार्श्वभूमीवर पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी तत्काळ आपले शासकीय वाहन प्रशासनाकडे जमा करत आचारसंहितेचे पालन केले. त्यानंतर त्यांनी पुणे महानगरपालिका ते बोपोडी असा प्रवास मेट्रोने केला. वाडेकर यांनी पुणे मनपा मेट्रो स्थानकातून प्रवास सुरू केला. शिवाजीनगर कोर्ट स्थानकावर



मेट्रो बदलून त्यांनी पुढील प्रवास बोपोडी पर्यंत पूर्ण केला. निवडणूक आचारसंहिता लागू होताच शासकीय सुविधांचा वापर टाळून सार्वजनिक वाहतुकीचा पर्याय स्वीकारणाऱ्या उपमहापौर वाडेकर यांच्या या कृतीची महापालिका वर्तुळात चर्चा रंगली आहे.

# कांदा उत्पादकांना २००० रुपये प्रतिक्विंटल दर द्या

पुणे : (स. गांवकरी)

केंद्र सरकारच्या कांदा, साखर व इतर शेतीमालावरील दीर्घकालीन निर्यातबंदी धोरणामुळे राज्यातील शेतकरी आर्थिकदृष्ट्या खचला असून, कांदा उत्पादक शेतकऱ्यांना तातडीने किमान २००० रुपये प्रतिक्विंटल खरेदी दर द्यावा, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी केली. ही मागणी मान्य न झाल्यास काँग्रेसतर्फे राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

सासवड येथील जयप्रकाश चौकात "पुरंदर तालुका काँग्रेस कमिटी" आणि "पुणे जिल्हा काँग्रेस"तर्फे कांदा उत्पादक शेतकरी, नीट परीक्षा पेपरफुटी आणि विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या निषेधार्थ आयोजित आंदोलनात ते बोलत होते. गोपाळदादा तिवारी म्हणाले की, केंद्र सरकारच्या वारंवार होणाऱ्या कांदा व साखर निर्यातबंदीमुळे शेतकऱ्यांना



मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. सरकारच्या लहरी आणि आडमुठ्या धोरणांमुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी आखाती देशांमधील हक्काची बाजारपेठ गमावली आहे. तसेच निवडणुकीपूर्वी शेतमाल हमीभावाबाबत दिलेली आश्वासने सरकारने तातडीने पूर्ण करावीत, अशी मागणीही त्यांनी केली. यावेळी वक्त्यांनी नीट प्रवेश परीक्षा प्रक्रियेतील गोंधळ आणि पेपरफुटी प्रकरणावरून केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. शिक्षणाचे व्यापारीकरण करून विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ केला जात असल्याचा आरोप करत, विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या घटनांबद्दलही संताप व्यक्त करण्यात आला.

# 'नेक्सस वेस्टएंड' मॉलतर्फे 'शिपरेक वंडर्स'चे अनावरण

पुणे : (स. गांवकरी)

पुणे (दैनिक संध्या) : या उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये 'नेक्सस वेस्टएंड मॉल' मध्ये नऊ मेपासून सुरू झालेल्या 'शिपरेक वंडर्स' (Shipwreck Wonders) या अथांग आणि भव्य अनुभवाच्या माध्यमातून सर्व पुणेकरांना गुप्त खजिने, चाच्यांच्या दंतकथा आणि सागरी सफरीच्या दुनियेत सफर करण्याची संधी मिळणार आहे. किनाऱ्याला लागलेल्या एका गूढ चाच्यांच्या जहाजाचे अवशेष (शिपरेक), जुने झालेले जहाजाचे डेक, चमकणारे खजिन्यांचे बॉक्स, लाकडी डॉक्स, अँकर्स (नांगर), बॅरल्स आणि नाट्यमय सागरी देखावे हे सर्व काही मनमोहक प्रकाशयोजना आणि बारकाव्यांसह जिवंत करण्यात आले आहे. यामुळे येथील प्रत्येक कोपरा एखाद्या चाच्यांच्या गोष्टीसारखा भासतो! हा संपूर्ण 'वॉक-थ्रू' अनुभव असून, यामध्ये सर्व वयोगटांसाठी चाच्यांच्या थीमवर आधारित विविध आकर्षक झोन्स तयार करण्यात आले आहेत.

# 'लक्ष्मी निवास'च्या कलाकारांसाठी आवडती परंपरा

मुंबई : (स. गांवकरी)



झी टीव्हीवरील 'लक्ष्मी निवास' ही मालिका मध्यमवर्गीय कुटुंबाचे जीवन, नातेसंबंध आणि माणसांना एकत्र बांधणाऱ्या आपुलकीचे भावपूर्ण चित्रण करून प्रेक्षकांच्या मनाला भिडत आहे. विशेष म्हणजे हीच आपुलकी आणि जिव्हाळा फक्त पडद्यावरच नाही, तर सेटवरही खास करून जेवण आणि एकत्र येण्याच्या क्षणांमध्ये दिसून येतो. या मालिकेत लक्ष्मीची भूमिका साकारत असलेल्या अनुभवी अभिनेत्री मानसी जोशी रॉय यांनी नकळत झी टीव्हीच्या एका सेटवरून दुसऱ्या सेटपर्यंत एक गोडशी परंपरा पुढे चालू ठेवली आहे. 'माँ भी सास बहू थी' या मालिकेदरम्यान त्या नेहमी घरचे बनवलेला उंधियू सेटवर आणायच्या आणि त्याची कलाकार आणि टीममधील सगळेचजण आतुरतेने वाट पाहायचे. अनेक वर्षांनी 'लक्ष्मी निवास'च्या सेटवरही त्यांनी हीच परंपरा कायम ठेवली आहे आणि त्यामुळे जेवणाची वेळ ही आता संपूर्ण टीमसाठी एका छोट्या उत्सवासारखी असते. याबद्दल बोलताना मानसी जोशी रॉय म्हणाल्या, "मला मनापासून लोकांना खायला घालायला आवडतं. त्यामुळे मी घरी काही खास बनवते, विशेषतः उंधियू. आणि तो सेटवर आणून सगळ्यांसोबत शेअर करायला मला खूप आनंद होतो. खरं तर यामुळे मला 'माँ भी सास बहू थी'च्या काळाची आठवण होते, तेव्हाही ही गोष्ट सेटवर एक प्रकारची खास परंपरा बनली होती. आणि आता 'लक्ष्मी निवास'च्या सेटवरही तीच परंपरा कुठेतरी पुढे चालू राहिली आहे. मी उंधियू आणला आहे हे कळताच सगळ्यांसाठी तो क्षण छोट्या सणासारखा बनतो. आम्ही सगळे एकत्र बसतो, जेवतो, गप्पा मारतो आणि त्या क्षणांमुळे सेटवर एका कुटुंबासारखी भावना निर्माण होते. मला वाटतं, अन्नामध्ये लोकांना जोडण्याची एक सुंदर ताकद असते आणि हीच आपुलकी पडद्यावरही नैसर्गिकपणे दिसून येते." पहा 'लक्ष्मी निवास' ही मालिका दर सोमवार ते शुक्रवार संध्याकाळी 7 वाजता फक्त झी टीव्हीवर!

# लहान तोंडी मोठा घास...!

कोपरगाव : (स. गांवकरी)

**जिल्ह्यासह राज्यातील धरणात मोठ्या प्रमाणात गाळ साचल्याने साठवण क्षमता कमी झाली. यासाठी तंत्रज्ञानाच्या सहाय्याने धरणांचे सर्व्हेक्षण करुन गाळ काढण्याचे नियोजन केले जाणार आहे.शेतकऱ्यांना धरणातील गाळ मोफत दिला जाणार आहे,असल्याची माहिती जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी नुकतीच त्यांच्या कार्यालयातील एका पत्रकार परिषदेत दिली आहे. त्यावरून नेहमीप्रमाणे श्रेयवादाची लढाई जिल्ह्यात जुंपली आहे. ही बाब या जिल्ह्याला नवी नाही. पण ज्यानी अद्याप विधानपरिषदेत पाऊलही ठेवले नाही अशा अक्षय कर्डिले या नवोदित आमदाराने या लढाईत भाग घेऊन आपले सुरुवातीलाच लहानतोंडी मोठा घास घेऊन आपले हसे करून घेतले असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.याबाबत आमच्या प्रतिनिधीने घेतलेला आढावा.**




राज्यात कुठलाही प्रकल्प म्हटला तर त्यात अनेक हौसे,नवशे,गवसे यांचे हात लागतात.आणि नाही लागले तरी ते त्या मांडवाखालून गेल्याचा आव तरी आणतात यात अहिल्यानगर जिल्हा वाकबगार मानला जातो तो उगीच नाही.येथे कालव्याचे आवर्तन सोडण्याचा प्रश्न असो की,एकाद्या रस्त्याचे खड्डे बुजविण्याचा विषय असो की,चारीला पाणी सोडण्याचा प्रश्न.ही मंडळी श्रेयासाठी आपापसात किमान माध्यमात उणीदुणी काढल्याशिवाय आणि स्वतःचीच काठी कशी मोठी आहे हे सांगितल्याशिवाय रहात नाही.ज्यांचे यात कवडीचे मोल नाही अशी मंडळी किमान मतदारांत संभ्रम करण्याची एकही संधी सोडत नाही हे विशेष ! त्यामुळेच पूर्वी या जिल्ह्याच्या (अहमदनगर) या नावावरून या नावात काना,मात्र,वेलांटी,अनुस्वार नसलेला जिल्हा म्हणून ओळखला जात असला तरी येथील राजकारण भलतेच वाकडेतिकडे आहे याची अनेकांना जाणीव झाल्याशिवाय राहत नाही.असाच ताजा अनुभव मुळा धरणाचा गाळ काढण्याच्या प्रश्नावरून अनुभवता न आला तर नवल.या प्रश्नाची सुरुवात केली ती माजी खा.प्रसाद तनपुरे यांनी सन-२०१७ साली केली होती.त्यासाठी त्यांनी सातत्याने लेखी पाठपुरावाही केला आहे. त्याला कारणही तसेच होते.राज्याच्या जलसंपदा विभागाच्या 'मेरी' संस्थेने सन -२००९ मध्ये सर्वेक्षण करून मूळ धरणात २.४० दशलक्ष घनफूट गाळ जमा झाल्याचा अहवाल दिला होता.त्यास आता १७ वर्षे झाली आहे.आता ०३ दशलक्ष घनफूट गाळ असण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.तेवढी साठवण क्षमता कमी झाली आहे. त्यामुळे २६ दशलक्ष घनफूट क्षमतेचे धरण २३ दशलक्ष घनफुटांचे झाले असल्याचे मानले जात आहे.त्याचा फटका लाभक्षेत्रातील सिंचनाला आणि शेतकऱ्यांना बऱ्यापैकी बसत असल्याचे उघड झाल्यावर माजी खा.प्रसाद तनपुरे यांनी सर्वप्रथम हा प्रश्न उचलून धरला होता.

राहुरी,नेवासा,पाथर्डीसाठी जीवनरेखा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुळा धरणात १९७२ साला पासून पाणी साठविण्यास सुरवात झाली आहे.धरणाचा मूळ आराखडा ३१ हजार ५०० द.श.लक्ष घनफूट क्षमतेचा होता.मात्र,धरण २६ हजार दशलक्ष घनफूट क्षमतेचे करण्यात आले.त्याचे पाणलोट क्षेत्र मोठे आहे.पावसाळ्यात धरणात पाणी जमा होताना,या नदीतून माती,दगड-गोटे,रेती असे अनेक पदार्थ वाहून येतात.त्यामुळे मागील ४८ वर्षांत त्याची साठवण क्षमता बऱ्यापैकी घटली असल्याचे मानले जाते.त्यामुळे ही जलसाठवण क्षमता अशीच कमी होत राहिली तर मुळाचे लाभक्षेत्र उध्वस्त होईल ही बाब त्यांनी हेरली होती.याबाबत वारंवार माध्यमांचे लक्ष वेधून शेतकऱ्यांत जागृती घडवली असल्याचे दिसून आले आहे.त्यांना या प्रलंबित कामासह निळवंडे धरणाचे गेली ५० वर्षे प्रलंबित ठेवलेले कालवे आणि पश्चिम सह्याद्री घाटाचे अरबी समुद्राला जवळपास ४०० टी.एम.सी.वाहून जाणारे (एकट्या उर्ध्व गोदावरी खोऱ्यात ११५ टी.एम.सी.) पाणी पूर्वेस वळविण्याची व हे प्रश्न मार्गी लावण्याची नामी संधी २०१९ साली शेवटी शेवटी राज्यात महाआघाडीचे मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांचे सरकार राज्यात स्थापन झाल्यावर मिळाली.त्यात जलसंपदा खाते माजी खा.तनपुरे यांचे मेहुणे जयंत पाटील यांचेकडे आल्याने ती अनासायेच उपलब्ध झाली.त्यांनी तत्कालीन जलसंपदामंत्री जयंत पाटील यांना वारंवार राहुरी आणि नगर जिल्ह्याचा दौरा करण्यास भाग पाडुन हा प्रश्न धसास लावण्याचा प्रयत्न केला आहे.आणि सुदैवाने याचा साक्षीदार म्हणून मला निळवंडे धरण कालव्यांच्या प्रश्नासह उपस्थित राहण्याची वारंवार संधी मिळाली होती.त्याबाबत सुदैवाने माझ्याकडे याबाबत तत्कालीन इतिवृत उपलब्ध आहे.अन्यथा हे फुकटचे श्रेय घेणाऱ्या मंडळींनी खोट्याचे खरे करून दाखवले असते हे सांगण्यास कोणा ज्योतिषाची गरज नाही.काळ्याचे पांढरे करण्यात ही मंडळी वाकबगार आहे हे सांगण्याची गरज नाही.

या प्रश्नावर राहुरीत माजी खा.प्रसाद तनपुरे यांचे वाड्यावर तत्कालीन वरिष्ठ जलसंपदा अधिकाऱ्यांसमवेत अनेक बैठका झाल्या आहेत.कोरोना काळात याची सुरुवात झाली होती. अनेक अधिकारी आणि तत्कालीन जलसंपदामंत्री जयंत पाटील हे स्वतः मास्क लावून निवडक कार्यकर्ते आणि अधिकाऱ्यांसमवेत उपस्थित होते.त्याची छायाचित्रे आजही आमच्या शेतकरी संघटना आणि निळवंडे कालवा समितीकडे उपलब्ध आहेत.मुख्य म्हणजे यातील काही अधिकारी आजही या विभागात कार्यरत आहेत.

त्यावेळी इगतपुरीत तत्कालीन मंत्री जयंत पाटील यांनी सह्याद्रीच्या घाटमाथ्यावरील पाणी तुटीच्या गोदावरी खोऱ्यात वळविण्यासाठी ही पहिली बैठक घेतली होती. आणि त्यांनी त्यातही मुख्य अभियंता दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करून नाशिक विभागीय कार्यालयात त्याची फलक लावून सुरुवात केली होती.मात्र दुर्दैवाने शिवसेनेचे मंत्री एकनाथ शिंदे यांचे त्यांच्याच पक्षप्रमुखाविरुद्ध बंड झाले आणि त्यांनी आसाम मध्ये धूम ठोकली होती.त्यानंतर भाजप-शिवसेनेचे महायुतीचे मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे हे विराजमान झाले होते.त्यानंतर सदरचे खाते गिरीश महाजन यांचेकडे पुन्हा एकदा गेले होते.

त्यानंतर ही योजना बारगळली होती.त्याला पुन्हा एकदा वर्तमान जलसंपदा मंत्र्यांनी स्थान दिले आहे हे खरेच आहे.पण याबाबत सतत जागृती करण्यात आणि जनमानसात हा प्रश्न जागृत ठेवण्यात माजी खा.प्रसाद तनपुरे यांचे निर्विवाद योगदान असल्याचे कोणीही नाकारू शकत नाही.त्यांनी,"मुळा धरणातील रेती (वाळू) उत्खननातून जलसंपदा विभागास आजच्या दरसूचीनुसार ५०० कोटींचा महसूल मिळेल. हे किमान काम १५ वर्षे चालेल. धरणातील गाळ शेतकऱ्यांना मोफत दिल्यास त्यांच्या जमिनीची सुपीकता वाढण्यास मदत होईल. धरणाची साठवण क्षमता पूर्ववत होऊन,सिंचनासाठी ०३ दशलक्ष घनफूट जास्तीचे पाणी उपलब्ध होईल,ही बाब मंत्री जयंत पाटील यांच्या निदर्शनास आणून दिली दिली होती.त्याबाबत वर्तमानपत्रात त्यांच्या पत्रकार परिषदा आजही अनेकांच्या स्मरणात असतील.त्यानंतर मुळा धरणातील गाळ काढण्याची मागणी माजी खा.प्रसाद तनपुरे यांनी तत्कालीन जलसंपदामंत्री जयंत पाटील यांच्याकडे केली होती.त्यावर हालचाली सुरू केल्या होत्या.त्यासाठी जलसंपदा विभागाने समिती (स्वतंत्र प्राधिकरणाची) स्थापना केली होती.धरणातील एकूण गाळ व रेती किती आहे,याचा अहवाल तयार करण्यासाठी त्याचे नमुने गोळा करून,दोन महिन्यांत अहवाल सादर करण्याचे निर्देश मुळा पाटबंधारे विभागाला प्राप्त झाले होते. त्यानुसार,धरणातील गाळ काढण्यासाठी प्रमाणित स्वरूपातील सुधारित प्रारूप निविदा काढली होती मात्र त्यानंतर काही न्यायिक अडचणी निर्माण झाल्याने त्याला काही काळ अडचणी आल्या होत्या.मात्र आज याबाबत श्रेय घेणाऱ्या मंडळींची घाई गडबड पाहिली की हसू आवरणे कठीण जाते.निळवंडे धरणाच्या कालव्याबाबत हाच अनुभव आमच्या गाठीशी आहे.निळवंडे कालवा कृती समितीने जिवाचे रान करून हा प्रश्न रस्त्यावरील लढाई करून शेवटी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात विक्रांत रूपेंद्र काले व पत्रकार नानासाहेब जवरे आदींनी जनहित याचिकेद्वारे (क्रं.१३३/२०१६) नेला होता.त्याला शेतकरी संघटनेचे ॲड.अजित काळे यांनी मोलाचे आणि मोफत विधीसहाय्य केले होते.त्यानंतर ऑक्टोबर २०२२ पर्यंत आर्थिक तरतूद करून कालवे पूर्ण करण्याचे न्यायालयाचे आदेश झाले होते. मुदत संपल्यावर उच्च न्यायालयाने जलसंपदा विभागाचे आर्थिक अधिकार गोठवल्यावर निळवंडे कालव्यात ३१ मे २०२३ रोजी नाईलाजाने सरकारला पाणी सोडावे लागले होते.तरीही आजही पाणी चोरी करणारी मंडळी स्वतःच्या पाठीवर थाप मारून गुलाल उधळून कालव्यांचे पाणी आम्हीच कसे आणले अशा निलाजऱ्या भूलथापा मारताना दिसत आहे.याला काय म्हणायचे ?

राज्याच्या जलसंपदा मंत्र्यांनी निळवंडे कालव्यांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी कोरोना काळात एक बैठक दि.२९ऑक्टोबर २०२० रोजी लावली होती.त्यावेळी तत्कालीन जलसंपदा मंत्री जयंत पाटील,प्रधान सचिव- लोकेश चंद्र,सचिव-एन. व्ही.शिंदे,स्वीय सहाय्यक-संजय जाधव,स्वीय सचिव बाळासाहेब देशमुख आदीसह लेखक,निळवंडे कालवा कृती समितीचे अध्यक्ष रूपेंद्र काले,गोरक्षनाथ शिंदे आदी मंडळी उपस्थित होतो.तर राहुरी तालुक्यातील कानडगाव येथील निळवंडे कालव्यांचे काम पाहणी दौऱ्यात दि.२२ मे २०२१ दुपारी २.३० वाजेच्या सुमारास स्वतः जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी कालव्याचे कामास भेट दिली त्यावेळी कालवा कृती समितीने मंत्र्यांचा सत्कार केला होता.यावेळी कालवा कृती समितीचे मार्गदर्शक नानासाहेब जवरे,अध्यक्ष रुपेंद्र काले, गोरक्षनाथ शिंदे,सोन्याबापू उर्हे,चंद्रकांत मुसमाडे,ज्ञानदेव पा.हारदे आदी मान्यवर मंडळी उपस्थित होती.

याबाबत श्रेय घेणाऱ्या मंडळीबाबत एक घटना आवर्जून सांगितली पाहिजे.२०१९ च्या विधानसभा निवडणुका जाहीर व्हायला थोडासा अवधी असताना त्यावेळी माजी आ.स्व.शिवाजी कर्डिले यांनी राहुरी तालुक्यातील तांभेरें या ठिकाणी तत्कालीन जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांचे प्रमुख उपस्थितीत एक शेतकरी मेळावा ठेवला होता.अर्थातच त्या ठिकाणी प्रशासकीय मंजुरी नसलेल्या कामाचे भूमिपूजन होणार होते.याच्या बातम्या निळवंडे कालवा समितीपर्यंत पोहचल्या होत्या. त्याबाबत आमच्या कार्यकर्त्यांना हा डाव उधळून लावायचा ठरवला होता.ते निषेधाचे फलक घेऊन छुपा डाव साधत काळे ध्वज घेऊन ऐन व्यासपिठासमोर बसले होते.मंत्र्याचे भाषण सुरू होताच त्यांनी निषेधाचे फलक फडकावून सरकारचा निषेध केला.सभास्थळी एकच गोंगाट झाला होता.त्यावेळी पोलिस कार्यकर्त्यांना अटक करण्यास धावले होते.मात्र जलसंपदा मंत्री महाजन हे माझेसह आणि समितीच्या प्रमुख कार्यकर्त्यांना ओळखत असल्याने त्यांनी त्यांना थांबण्यास सांगितले व ते आपलेच माणसे आहे,त्यांचे काही चुकले नाही.ते पाणी तर मागतात" असा बचाव करून वातावरण शांत करण्याचा प्रयत्न केला होता.त्यावेळी प्रिंट माध्यमात आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमात आमच्या बातम्या भरून गेल्याने माजी आ.शिवाजी कर्डिले अस्वस्थ झाले होते.आणि त्यात त्यांनी एक मार्मिक टिपणी करून त्यांचे प्रयत्न निळवंडे कालवा कृती समितीने कसे फोल ठरवले हे सांगताना,"नवरदेव आमचा,मंडप आमचा,वऱ्हाड आमचे,वाजंत्री आमचे,आणि लग्न भलतेच लावून गेले " अशी मिश्किल टिपणी केली होती.ती बरंच काही सांगून गेली होती आणि ती त्यांचा निवडणूकपूर्व बेत फसल्याची जाहीर कबुली देऊन गेली होती.त्या निवडणुकीत पुढे त्यांचा पराभव झाला हे वेगळे सांगण्याची गरज नाही.आज स्व. कर्डिले आज नाहीत मात्र यांचे सुपुत्र आज विधानपरिषद आमदार झाले त्याबद्दल त्यांचे नक्कीच अभिनंदन आहे.मात्र त्यांनी त्यांनी अभ्यासून प्रकटावे हे त्यांच्यासारख्या नवख्या उमेदवारासाठी उत्तम.मुळा धरण आणि त्याच्या संबंधित प्रश्नांचे लगेच श्रेय घेणे लहानतोंडी मोठा घास ठरू शकतो याचे भान ठेवणे उत्तम. शहाण्यास वेगळे सांगणे न लगे!

माजी खा.प्रसाद तनपुरे यांनी आपल्या कार्यकाळात विधानसभा मतदार संघात कोल्हापूर पद्धतीचे बंधारे,पाझर तलाव,साठवण तलाव,साखळी बंधारे,नाला बन्डिंग आदी केलेली कामे आजही त्यांच्या कार्याची साक्ष देत असून हा मतदार संघ सुजलाम सुजलाम करण्यात आजही अहंम भूमिका निभावत आहेत.परिणामी या तालुक्यात अन्य तालुक्यापेक्षा नक्कीच भूजल पातळी वरचढ ठरत आहे.त्याचे श्रेय निर्विवाद त्यांनाच जाते हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

सह्यादीच्या घाटमाथ्यावरील पश्चिमेस समुद्रास वाहून जाणाऱ्या पाण्याबाबत निळवंडे धरणाच्या कालव्यासारख्या केवळ निवडणुकात घोषणा होत होत्या,सरकारे बदलली की धोरणे बदलत असत. परिणामी निवडणुका संपल्या की त्या घोषणा हवेत विरत होत्या. परिणामी हे महाकाय काम प्रत्यक्षात आणण्यासाठी शेतकरी संघटनेने प्रदेश प्रसिद्धीप्रमुख नानासाहेब जवरे व रूपेंद्र काले यांच्या नावाने मुंबई उच्च न्यायालयात ॲड.अजित काळे यांचे मोफत विधी सहाय्याने जनहित याचिका (क्रं.०५/२०२४) दि.०५ जानेवारी २०२४ रोजी दाखल केली होती.त्याची गंभीर दखल उच्च न्यायालयाने घेतली असून त्याचा परिणाम आता समोर आहेच. उठता बसता मंत्रिमंडळ आणि उत्तर महाराष्ट्रातील नेते या योजनेचा हरिणामासारखा जप करत आहेत. आता या मंडळींच्या या योजनेचे परतीचे दोर कापले गेले आहे.त्यांना आता शर्यतीच्या बैलासारखे आता पुढे जाण्याखेरीज पर्याय राहिलेला नाही हे वेगळे सांगण्याची गरज उरत नाही.